# अशी ही अजब अमेरिका




पंढरीनाथ रेगे

म ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र.
REFBK-0026292

म. ग्रं. सं. ठाणे
विषय ...........
सं. क्र.

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 MAR 1991
24 APR 1991
24 APR 1991
25 MAY 1991
6 JUL 1991
30 OC 1991
3 NOV 1992

2 OCT 1991
20 NOV 1991
11 DEC 1991
29 APR 1992
9 MAY 1992
16 MAY 1992
19 AUG 1992
18 NOV 1992
(क्र. मा. पहा)
5 DEC 1992
26 JUN 1993
13 AUG 1994
23 FEB 1994

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. क.

13 AUG 1994
26 JUN
1994

# अशी ही अजब अमेरिका

( अमेरिकेचे प्रवास-वर्णन )

पंढरीनाथ रेगे

REFBK-0026292

सुवर्णा प्रकाशन

# अशी ही अजब अमेरिका

( अमेरिकेचे प्रवास-वर्णन )

पंढरीनाथ रेगे

REFBK-0026292

REFBK-0026292

सुवर्णा प्रकाशन

प्रकाशक :
सुरेश जोशी
सुवर्ण प्रकाशन
७९०, सदाशिव पेठ
'साई कृपा' पुणे ३०.

मुद्रक :
द. स. पोळेकर
विजय प्रिंटर्स
म. फुले वसाहत, स. नं. ९३,
लक्ष्मीनगर, पर्वती, पुणे ९.

© प्रकाशकाधीन

प्रकाशन : विजया दशमी २९ सप्टें. १९९०

प्रकाशन क्र. ६३

मूल्य : पंचेचाळीस रुपये

# अर्पणपत्रिका

मला अमेरिकेचं दर्शन घडविण्याच्या बाबतीत
ज्यांचा मुख्य हातभार लागला, त्या माझ्या कन्या
अरुणा व शुभदा, आणि त्यांचे पती अनुक्रमे
शिवाजी आसवले व सिद्धार्थ शास्त्री,
आणि
माझा भाचा दत्ता मणेरीकर
यांना
हे पुस्तक प्रेमपूर्वक अर्पण.

रशियात १८ वर्षे वास्तव्य केलेले

मराठी नट, पत्रकार, अनुवादक

## अनिल हवालदार

यांच्या ओघवत्या शैलीतील आत्मकथन

नववर्षाच्या सुमुहूर्तावर याच पुस्तकाबरोबर

प्रकाशित होत आहे.

*

संपर्क :

सुवर्णा प्रकाशन
७९०, सदाशिव पेठ, पुणे ३०.

लोकप्रिय कादंबरीकार

## देवदत्त पाटील

यांची

# बानू

या अत्यंत गाजलेल्या कादंबरीची तिसरी आवृत्ती आम्ही याच पुस्तकाबरोबर प्रकाशित केली आहे. प्रती मर्यादित आहेत. कृपया आपली ऑर्डर आजच पुढील पत्त्यावर पाठवा.

सुवर्णा प्रकाशन

प्रकाशन

**सुवर्णा प्रकाशन**
७९०, सदाशिव पेठ, पुणे ३०.

# अनुक्रमणिका


१. आंबट कैरीचा गोड शेवट ! ९
२. वॉशिंग्टन–दर्शन १४
३. जादूचं साम्राज्य : डिस्ने वर्ल्ड १८
४. कल्पनारम्य नगरी : एप्कॉट सेंटर २९
५. फ्लोरिडामधील मनोवेधक सागरी दुनिया ३६
६. शिकागोतील सुंदर बहाई प्रार्थनामंदिर ४३
७. ब्रूकफील्ड प्राणिसंग्रहालय ४७
८. आकाशाशी हितगुज करणारी सीअर्स टॉवर्स ५५
९. शिकागो शहर ६०
१०. नायगाराची नवलाई ७०
११. निसर्गरम्य शिल्पांची भव्य गुहा–लुरे ७५
१२. अमेरिकेतील तत्पर सेवा ८०
१३. अमेरिकेतील वेश ८५
१४. अफाट बाजारपेठा ८९
१५. मुलांची कुचंबणा ९३
१६. अमेरिकेतील ग्रंथविक्रीचे व्यवहार ९९
१७. रद्दीची सद्दी, पण...कचऱ्याची भरती १०४
१८. अमेरिकेतील वनसंपत्ती १०८
१९. गड्या, आपुला गाव बरा ! ११४

# प्रस्तावना

मी अमेरिकेला गेलो होतो, १९८४ सालच्या जूनच्या १ दिनांकाला. अमेरिकेला गेलेल्या महाराष्ट्रीयांनी आजवर तिथल्या ज्या स्थळांना भेट दिली नाही, अशा स्थळांना मुख्यत: मी भेटी दिल्या. उदा. फ्लोरिडामधील डिस्नेवर्ल्ड, एप्कॉट सेंटर, सी-वर्ल्ड, शिकागोमधील मत्स्यालय, बहाई प्रार्थना मंदिर, ब्रूकफील्ड प्राणिसंग्रहालय, जगातली सर्वांत उंच इमारत 'सीअर्स टॉवर्स,' अशी काही स्थळं मी अगत्यानं पाहिली. नायगाराचा नावाजलेला धबधबा बहुतेक सर्वंजणच बघतात. अर्थात मीही तो पाहिला. एकूण अमेरिकेतल्या निवडक, वेचक आणि वेधक अशा गोष्टी मी कटाक्षानं पाहिल्या त्यांच्याबद्दल या पुस्तकात मी थोडंफार लिहिलंय. अमेरिकी जीवनाचे, जाता-जाता दृष्टीस पडलेले काही ओझरते नमुनेही मी नोंदवलेले आहेत.

अमेरिकेत अनेक ठिकाणी अनेक प्रेक्षणीय सौंदर्यस्थळं आहेत हे खरं; पण तिथलं एकूण जीवन एवढं धांदली-धावपळीचं अन् गडबडीचं आहे, की तिथं राहण्याच्या दृष्टीनं, 'नको त्या अमेरिकेत राहणं' असं होऊन जातं. तशी तिकडे खायच्या प्यायच्या पदार्थांची चंगळ, आणि आरामशीरपणं राहण्याच्या सोयी-सुविधा, घरी-दारी-बाहेरी मुबलक नाण्यांची चिल्लर, पोस्टाची तिकिटं सिगारेटची, पाकिटं, कोकाकोलाचे (कोकचे) आणि लेमनचे भरलेले टिनचे डबे अशा गोष्टी शहरांत अनेक ठिकाणी ठेवलेल्या पत्र्याच्या पेट्यांतून मिळतात ठराविक किंमतीची नाणी पेटीच्या खाचेत टाकायची म्हणजे ठराविक बटन दाबताच ठराविक वस्तू खालच्या फटीतून बाहेर पडते. म्हणजे कुठं कसली टंचाई म्हणून नाही. पण आरामशीरपणं राहायच्या सुखसोयींचा हव्यास ज्यांना असेल त्यांचं काय समाधान होत असेल तें होवो ! पण तिथल्या शीघ्र धावपळीच्या जीवनात माणसाला आवश्यक असणाऱ्या मन:स्वास्थ्याचं वावडं असल्यानं तिथं जास्त दिवस राहायला मन घेईना.

शिवाय तिकडच्या जीवनात आपण एकपरी उपरे आहो ह्याची वारंवार जाणीव होते. तसं विमानाचं परतीचं तिकीट एकदमच काढलेलं होतं. म्हणजे चार महिने तिकडे खुशाल राहता आलं असतं. पण माझ्या मुली—जावयानं आणि भाच्यानं दाखवायची ती प्रेक्षणीय स्थळं ऑगस्टच्या मध्यापर्यंत दाखवून पुरी केली होती. मग तिकडे केवळ खायची-प्यायची चंगळ म्हणून घरी टी. व्ही. बघत दिवस काढणं मनाला पटलं नाही. म्हणून ऑगस्टच्या मध्यानंतर लगेच मी भारताला परतलो.

अमेरिकेचा प्रवास करून आलेल्या बहुतेक लेखकांनी ज्या गोष्टींबद्दल आज वर लिहिलेलं नाही, त्याबद्दलच मुख्यतः मी वाचकांना इथं परिचय घडवलाय. तो त्यांना वेधक वाटेल, असा विश्वास वाटतो.

**पंढरीनाथ रेगे**

८२७ २६२०२ ८५२०६

# आंबट कैरीचा गोड शेवट !

तीनेक वर्षापूर्वी मी अमेरिकेला गेलो होतो तेव्हाची गोष्ट. ठरल्या दिवशी एअरइंडियाच्या विमानाचं तिकीट मिळू शकलं नाही, म्हणून अमेरिकेतल्या माझ्या मुलीनं टेलेक्सनं पॅन-अॅम या अमेरिकी विमान कंपनीच्या परतीच्या तिकिटाची व्यवस्था केली होती. या विमानातून जावं लागल्यानं झालं काय, की विमानातल्या प्रवासापासूनच अमेरिकी इंग्रजीनं मला आपला इंगा दाखवायला सुरुवात केली. एरवी मला कामचलावू, व्यवहारापुरती इंग्रजी भाषा बोलता येत असली, तरी अमेरिकी इंग्रजीपुढं माझा निभाव लागणं कठीण जाऊ लागलं. विमानातल्या एअर-होस्टेस मंडळींची वेगळ्या उच्चारांची वेगळी धबधबी भाषा, मुश्किलीनं झालं तरी हळूहळू थोडीफार कळायला लागली. पण अस्मादिकांचे इंग्रजी उच्चार त्यांच्या डोक्यात शिरून माझ्या म्हणण्याचा त्यांना बोध होणं दुष्कर झालं. तेव्हा पुनःपुन्हा बोलून माझ्या बोलण्याच्या मतलबाचा प्रकाश पाडण्याचा प्रयास करावा लागला. आपण भारतीय लोक इंग्रजी शब्दांचे उच्चार काहीसे ब्रिटिश वळणाचे करतो. तर अमेरिकी इंग्रजीचा काही वेगळाच सवतासुभा आढळून आला.

(पुढं अमेरिकेतल्या माझ्या तीनेक महिन्यांच्या वास्तव्यात तिकडचे दूरचित्रवाणीवरचे कार्यक्रम पाहून अमेरिकी इंग्रजी उच्चारांची वेगळी धाटणी हळूहळू कळू लागली. पण तिचं थोडंफार आकलन होत आहे, तोच भारताला परतण्याची वेळ आलेली होती.) आपणाला साधारणपणे स्पेलिंगनुसार शब्दाचा उच्चार करण्याची सवय असते. उदाहरणार्थ MIAMI या तिथल्या शहराच्या नावाचा उच्चार बहुतेक

सर्व भारतीय लोक ' मियामी ' असा करतात. पण अमेरिकेत या शब्दाचा उच्चार ' मायामी ' असा करतात. PLYMOUTH या शब्दाचा उच्चार आपण ' प्लायमाउथ ' असा करतो. तर तिकडे ' प्लीम्थ ' असा उच्चार केला जातो. शिवाय इंग्रजी बोलण्याची अमेरिकी लोकांची पद्धतही तोंडातल्या तोंडात अन् धवधब्यासारखी जलदगतीची.

असा हा एकूण मामला असल्यामुळं विमानाच्या प्रवासापासूनच अमेरिकी इंग्रजीची धास्तीच अस्मादिकांनी घेतली. त्यामुळं न्यू यॉर्कच्या प्रचंड विमानतळावर उतरलो तेव्हा, दुसरा कुणी जाणकार भारतीय माणूस सोबतीला न मिळाल्यानं अस्मादिकांची एकांडी स्वारी भांबावून गेली. तरीपण मार्गदर्शक पाट्या नि ध्वनिक्षेपकावरच्या सूचनांचा जमला तेवढा मागोवा घेत-घेत आमच्या विमानातील प्रवाशांच्या सामानांची देवाण करणाऱ्या विशिष्ट फिरत्या पट्ट्यापाशी जाऊन पोहोचलो आणि क्रमाक्रमानं लागोपाठ येणाऱ्या बॅगांतून आपली मोठी बॅग एकदाची हस्तगत केली. तर त्या नवीनच बॅगेचे कडक प्लॅस्टिकचे दोन्ही हँडल्स मुळासकट गायब झालेले आढळले. विमान कंपनीच्या नोकरांच्या सामान हाताळण्याच्या अनासक्त वृत्तीचा तो परिणाम होता. प्रवाशांच्या बॅगा नीट उचलून ठेवण्याऐवजी उचलून बेदरकारपणे फेकण्याच्या कलेत ते तरबेज असतात आणि त्यांच्या या धसमुसळ्या वृत्तीपायी शेवटी आपली बॅग कोणत्या अवस्थेत आपल्या हाती पडेल ते सांगता येत नाही. या गोष्टीची कुणकुण प्रवास सुरू होण्याआधीच मला लागलेली होती. म्हणून सावधगिरीनं मी माझ्या बॅगेभोवती नायलॉनची रस्सी गुंडाळलेली होती. ही खबरदारी घेतली असल्यामुळं रस्सीला धरून ती बॅग उचलता आली. (विमानतळावर सामान उचलून न्यायला हमाल वगैरे नसतात. तिथं स्वावलंबनाचा धडाच गिरवावा लागतो. आपल्याला घ्यायला येणारे नातलग किंवा मित्र यांना कस्टमच्या त्या कक्षाबाहेरच्या वेटिंगरूममध्येच वाट बघत बसावं लागतं. म्हणजे त्यांच्याकडे जाऊन पोहोचेपर्यंत आपण एकाकीच असतो.)

आपलं सामान घेऊन प्रथम कस्टमच्या अधिकाऱ्यांपुढं हजर व्हावं

लागतं आणि सामान तपासणीची साग्रसंगीत ‘ हजेरी ’ त्यानं घेतल्यावर मगच त्याच्या तावडीतून आपली सुटका होते. तर इतर प्रवाशांचं अनुकरण करीत मी माझ्या बॅगेसह एका कस्टम अधिकाऱ्याच्या समोरच्या प्रवाशांच्या रांगेत जाऊन दाखल झालो. एक म्हणजे त्या अधिकाऱ्यानं काही विचारलं तर ते समजून घेऊन, त्याला समजेल असं उत्तर कसं द्यावं ही धास्ती होतीच. शिवाय माझ्या मोठ्या बॅगेत आक्षेपार्ह असं काही नसलं, तरी माझ्या खाकोटीच्या छोट्या बॅगेत चार-पाच कैऱ्या होत्या. अमेरिकेतल्या माझ्या मुलीच्या सांगण्यावरून त्या मी आणलेल्या होत्या. दुसऱ्या मुलाच्या वेळचे कैरी खाण्याचे डोहाळे तिला लागलेले होते आणि तिकडे, कैऱ्या मिळत नसल्यानं त्या मुद्दाम आणायला मला तिनं फोनवर सांगितलं होतं. क्षुल्लक कैऱ्यांचं काय एवढं चर्पटपुराण मी लावलंय्, असं एखाद्याला वाटेल. पण ग्यानबाची मेख या कैऱ्यांतच होती. कस्टमच्या कचाट्यातून कैऱ्या सुतराम सुटत नसत. कच्ची व पिकलेली फळं वा कंद प्रवाशांनी अमेरिकेत आणायला बंदी होती. (त्या फळांबरोबर जीवजंतू अमेरिकेत प्रवेश करतात, असं मानलं जातं.) तुमच्या सामानात फळं सापडली, तर ती काढून घेऊन बेधडक फेकून दिली जातात. मला ही गोष्ट ऐकून माहीत होती. एवढंच नव्हे, तर आधल्याच वर्षी माझ्या एका नातेवाईकाला तसा प्रत्यक्ष अनुभवही आलेला होता. तो गेली पंधरा-एक वर्ष अमेरिकेत वास्तव्य करून आहे. त्याला आळूची भाजी भारी आवडते. पण तिकडे आळू मिळत नाही. म्हणून रजेत तो इकडे येई, तेव्हा कटाक्षानं आळूची भाजी करून घेऊन तो त्यावर ताव मारायचा. तर मागच्या खेपेला तो इकडे आला, तेव्हा आळूचे कांदे तिकडे नेऊन आपल्या घराच्या बागेत लावायचे, अशी कल्पना त्याला सुचली. म्हणून परत जाताना त्यानं आळूचे थोडे कांदे बरोबर घेतले. अंगावरच्या डगलेवजा वरकोटात-आतल्या खिशात त्यानं ते कांदे चाखल ठेवले. कारण वरकोटाची तपासणी फारशी केली जात नाही, असा अनुभव होता. पण दुर्दैवानं याचवेळी न्यू यॉर्कच्या विमानतळावरच्या कस्टम अधिकाऱ्याला काय बुद्धी झाली कुणास ठाऊक !

त्यानं त्याच्या वरकोटाचीही यथासांग तपासणी केली की ! मग काय विचारता ? आळूचे कांदे साहजिकच त्यांच्या हाती लागले. ते त्यानं अर्थातच काढून घेऊन चक्क फेकून दिले.

ही गोष्ट मला माहीत असल्यानं माझ्या जवळच्या कैऱ्यांची काळजी मला लागून राहिली होती. विशेष म्हणजे माझ्या मुलीचे डोहाळे पुरे करण्यासाठी त्या कैऱ्या मी आणलेल्या असल्यानं त्या कैऱ्यांशी भावना निगडीत झालेल्या होत्या.

तर, माझ्याकडच्या कैऱ्यांचं आता काय होणार या धाकधुकीनं मी भांबावून गेलेलो होतो. तेवढ्यात माझ्या पुढच्या प्रवाशाच्या सगळ्या बॅगा त्या अधिकाऱ्यानं संशयानं उस्कटून तपासल्या. हे पाहून तर मी हबकलोच. माझी फक्त मोठी बॅग उस्कटून पाहिली असती तरी ती पुन्हा नीट भरायला मला थोडा त्रास झाला असता. पण त्याचं तेवढं वाटलं नसतं. मात्र माझी खाकोटीची बॅग तपासली गेली, तर अर्थातच कैऱ्यांची धडगत नव्हती. तसं घडलं तर त्यालाही इलाज नव्हता. माझ्या पुढचा प्रवासी बाजूला होऊन माझी पाळी आली. तेव्हा 'आलिया भोगासी असावं सादर' असं मनाशी म्हणत कसायापुढच्या बोकडानं काकुळतीनं त्याच्याकडं बघावं तसा मी त्या अधिकाऱ्याकडे बघत राहिलो. कैऱ्यांवर संक्रांत ओढवते की काय, या धास्तीनं मनाची साहजिकच चलबिचल झाली होती. पण–

– पण दैवानं खैर केली. माझा पासपोर्ट चाळून बघत, त्या अधिकाऱ्यानं माझ्याकडं काही क्षण पाहिलं आणि रस्सी बांधलेल्या बॅगेसह माझा एकंदर 'अवतार' पाहून त्याला काय वाटलं कुणास ठाऊक ! थोड्याच वेळापूर्वी कसायासारखा वाटणारा तो अधिकारी, भक्ताला पावणाऱ्या देवासारखा माझ्यावर प्रसन्न झाला आणि 'वर' दिल्यासारखा हातानं खूण करता झाला– 'वत्सा, खुशाल जा तू !'

– हा आनंदाचा अनपेक्षित धक्का पचवायला मला काही क्षण लागले. पण लगेच मी भानावर आलो. सावरलो. कसनुसं हसत, पुटपुटत

मी त्या सज्जन अधिकाऱ्याचे आभार मानले आणि पडत्या फळाची आज्ञा मानून, माझी मोठी बॅग सावरीत, झटकन त्याच्यापुढून सटकलो· हाताशी मिळालेल्या एका हातगाडीवर बॅग टाकली, अन् ती ढकलत झपाझप चालत एकदाचा त्या कक्षाबाहेर पडलो. हो ! आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्याची बुद्धी लगेच त्याला झाली, तर काय घ्या ? म्हणून शक्य तेवढ्या तातडीनं मी बाहेर पळ काढला होता.

आणि कैऱ्या सुखरूप वाचल्याच्या आनंदात, बाहेरच्या वेटिंगरूम-मध्ये मुलगी नि जावई यांना मी टेहळू लागलो. तर तीच मला टेहळून पुढं आली. हसतमुखानं त्यांनी माझं स्वागत केलं. ते स्वीकारीत मी आजू-बाजूला पाहिलं नि हलक्या स्वरात मुलीला हर्षभरानं म्हणालो– ‘ अग, तुझ्या कैऱ्या सुखरूप सुटल्या बघ.’

– माझे हे शब्द कानी पडताच तिची कळी अशी काही खुलली की खुशीनं उजळलेला तिचा चेहरा पाहून, प्रवासातल्या तोपर्यंतच्या दगदगीचा माझा सारा शीण मी पार विसरून गेलो !

⁂ ⁂

# वॉशिंग्टन - दर्शन

वॉशिंग्टन ही अमेरिकेची राजधानी पण न्यूयॉर्क किंवा शिकागो या मोठ्या शहरांतल्याप्रमाणं उंचच-उंच अशा इमारती इथं नाहीत. उलट बेताच्या उंच पण डौलदार अशा इमारती आहेत. या शहरात नाही– तरी न्यू यॉर्क किंवा शिकागो या शहरांतल्या बहुतेक इमारती उंचच-उंच पण काड्यापेटया एकमेकांवर रचल्यासारख्या ठराविक ठोकळेवाज साच्याच्या आहेत.

वॉशिंग्टन शहरात न्यू यॉर्क शहरातल्यासारखा बकालपणाही नाही. झाडं आणि बागबगिचे यामुळं या शहराला शोभा आली आहे.

राजधानीच्या या शहरात 'व्हाईट हाऊस' हे राष्ट्राध्यक्षांच निवासस्थान. (नावाप्रमाण पांढऱ्या रंगाचं) आहे. तसंच 'कॅपिटॉल' ही अमेरिकेच्या सर्वोच्च कायदे मंडळाची काँग्रेसची इमारतही आहे. या इमारतीत सिनेट व प्रतिनिधिगृह अशा काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांची अधिवेशनं भरतात.

'व्हाईट हाउस' हे राष्ट्राध्यक्षांचं निवासस्थान बाहेरून साधं दिसतं खरं, पण आतून प्रशस्त आहे. ही इमारत अठराव्या शतकाच्या अखेरी-अखेरीला बांधण्यात आली. या वाड्यात प्रथम राहणारा राष्ट्राध्यक्ष होता, जॉन ॲडम्स. १८१४ मध्ये अमेरिकेविरुद्धच्या युद्धात ब्रिटिश सेनेनं या इमारतीला आग लावली. त्यानंतर तीन वर्षांनी राष्ट्राध्यक्ष मन्रो यांच्या कारकीर्दीत इमारतीची दुरुस्ती झाली. याच वेळी इमारत वाढवून मोठीही करण्यात आली. इमारतीचा मुख्य भाग अदमासे १७० फूट लांब व ८५ फूट रुंद आहे.

अमेरिकी काँग्रेसच्या बैठका जिथं भरतात, ती भव्य इमारत 'कॅपिटॉल' जवळच्या पॉटॉमॅक नदीच्या पातळीपासून ८८ फूट उंच असलेल्या पठारावर उभारलेली आहे. इमारतीचा व्याप ७५१ फूट लांब व ३५० फूट रुंद असा आहे. तर उंची चौथऱ्यापासून जवळजवळ २८८ फूट आहे. मूळ इमारतीचा आग्नेय कोपरा जॉर्ज वॉशिंग्टनने १७९३ मध्ये बांधला. बाकीचं बांधकाम पुढं टप्प्या-टप्प्यानं १८०० व १८११ मध्ये झालं. व्हाइट हाऊसप्रमाणं या इमारतीचा आतला भागही ब्रिटिश सेनेनं जाळून टाकला होता. पण त्याची दुरुस्ती नंतर झाली. पुढं १८५१ मध्ये राष्ट्राध्यक्ष फिलमोर यांनी इमारतवाढीची कोनशिला बसवली आणि हे बांधकाम पूर्ण होताच प्रतिनिधिगृह व सिनेट यांना मोठाली सभागृहे मिळाली.

स्मिथ्सोनियम इन्स्टिटचूट ही विख्यात संस्था वॉशिंग्टनमध्येच आहे. विज्ञानाच्या प्रगतीचे टप्पे या संस्थेत पाहायला मिळतात. विमानाच्या रचनेचे पहिल्यापासून अद्ययावत प्रकारचे नमुने इथं आढळतात. विमानांची आतील रचना तपशीलवार पाहायला मिळते. एका खास प्रेक्षागृहात, दिवसातून काही वेळा (वेगळं मूल्य घेऊन) जगावरचा रगीत चित्रपट विशाल पडद्यावर दाखवण्यात येतो. या चित्रपटात निरनिराळ्या देशांतील वैशिष्टचपूर्ण गोष्टी चित्रित करण्यात आलेल्या आहेत. भारताचा समावेशही यात केलेला आहे. मात्र आफ्रिकेतील वन्य प्राण्यांच्या जीवनावरील दृश्ये विशेष मनमोहक आहेत.

### युनायटेड स्टेटस् कॅपिटल

वॉशिंग्टनमधील पूर्वाध्यक्षांच्या निवडक स्मारकांत अब्राहम लिंकन याचं स्मारक विशेष वैशिष्टचपूर्ण आहे. पॉटॉमॅक पार्कमधील शुभ्र संगमरवरी दगडाचं हे स्मारक ८० फूट उंच असून त्याला तीन विशाल पायऱ्या आहेत. १० फूट उंच, १६ फूट रुंद व १७ फूट खोल अशा चबुतऱ्यावर १९ फूट उंचीचा लिंकनचा पुतळा उभारलेला आहे. पुतळ्याचा मोहरा 'कॅपिटॉल'कडे वळलेला आहे. हे स्मारक बघायला

लिफ्टमधून वर जावं लागतं. आणि उन्हाळ्याच्या दिवसांत प्रेक्षकांची मोठी लांब रांग लागते.

जॉर्ज वॉशिंग्टन व थॉमस जेफर्सन या पूर्वाध्यक्षांची स्मारकही देखणी आहेत. वॉशिंग्टन शहराचं दर्शन घ्यायचं म्हणजे अशा महत्त्वाच्या स्थळांना भेटी द्यायच्या. तर हे वॉशिंग्टन-दर्शन, शहरातल्या मुख्य हम_रस्त्यांवरून सतत फेऱ्या मारणाऱ्या बसेसमधून सहजपणे साधता येतं. म्हणजे असं की, या बसकंपनीचं आठ डॉलर्सचं एक तिकीट सकाळी एकदा घेतलं की, त्या कंपनीच्या कुठल्याही बसमधून आलटून पालटून बसून सबंध दिवसभर शहरातून फिरता येतं आणि जरुरीप्रमाणे ठिक-ठिकाणी उतरून जवळपासची प्रेक्षणीय स्थळ बघता येतात.

राजधानीकडे दूर वरून येणाऱ्या-जाणाऱ्या बसेस आहेतच. शिवाय राजधानीपासून काही उपनगरांपर्यंत ट्यूब रेल्वे–भुयारी रेलगाडी आहे. ही रेलगाडी पाच–सहा डब्यांची आटोपशीर अशी असते. कारण या गाडीतून प्रवास करणारे फार थोडे. (एकूण दूर पल्ल्याच्या रेल्वेतूनही प्रवास करणारे थोडेच) याचं कारण बहुसंख्य लोक आपापल्या कार-मधून जास्त सोयीस्करपणे प्रवास करतात.

उपनगरापुरती मर्यादित असलेली ही भुयारी रेलगाडी न्यूयॉर्क शहरात आहे. या गाड्यांच्या स्टेशनवर तिकीट-खिडकी नसते, की कुणी तिकीट तपासनीसही नसतो. गाडीतसुद्धा तिकीट तपासनीस येत नाही. कारण तिकिटाला पैसे (७५ सेंट किंवा जे काही ठरलेले असतील तेवढे) लोखंडी कठड्याच्या प्रवेशद्वारावरच्या पेटीच्या फटीत टाकल्याखेरीज फलाटावर जाताच येत नाही मुळी. ठराविक नाणी पेटीत टाकावीत तेव्हा कुठं दारावरची हातभर लांबीची आडवी लोखंडी दांडी ढिली पडते. आणि ती बाजूला सारून एकट्याला तेवढं दारातून बाहेर पडता येतं. तो माणूस बाहेर पडला म्हणजे ती लोखंडी दांडी पुन्हा प्रवेशालय आडकाठी होऊन राहते. दांडीची आडकाठी पार करून बाहेर पडल्यावर त्या उताराला सरकता जिना उतरून भुयारातल्या फलाटावर जाव

लागतं. हव्या त्या स्टेशनवर उतरल्यावरही असाच सरकता जिना चढावा लागतो. चढण्या-उतरण्याच्या या सरकत्या जिन्यावर पहिलं पाऊल ठेवताना व शेवटचं पाऊल पुन्हा जमिनीवर ठेवताना जपावं लागतं. कारण जिना अखंड झरझर सरकत असतो. गफलतीनं पाऊल वाकडं पडल्यास ते अडकण्याचा धोका असतो. अर्थात् सरावानं हे जमून जातं. अखंड झरझर सरकत राहणारा हा जिना म्हणजे अमेरिकेतल्या धावपळीच्या व गडबडीच्या जीवनाचं जसं काही प्रतीक आहे.

गाडी फलाटावर येऊन उभी राहिली की...डब्यांची काचेची दारं आपोआप दोन्ही बाजूंना सरकतात. आतले काही उतारू खाली उतरतात, मग फलाटावरचे जाणारे उतारू झटपट गाडीत चढतात, चढणं–उतरणं झटपट उरकावं लागतं कारण डब्याची सरकती दारं मोजक्या क्षणात पुन्हा आपोआप बंद होतात. या गाडीचे डबे वातानुकूलित असतात. डब्यांना खिडक्या नसतात. तर दोन्ही अंगांना पारदर्शक अशा जाड काचांची मोठाली तावदानं असतात. या गाडीतून, मार्गावरील कुठल्याही स्टेशनवर जाण्यासाठी एकच दर ठरलेला असतो.

या गाडीच्या डब्यात एक बाक अपंग व ज्येष्ठ नागरिक (साठीवरचे) यांच्यासाठी राखून ठेवलेलं असतं.

* *

# जादूचे साम्राज्य

अमेरिकेत कधी जाण्याची संधी लाभली, तर तिथली 'वॉल्ट डिस्ने दुनिया' (वॉल्ट डिस्ने वर्ल्ड) आवर्जून बघायची, असं मी मनोमन ठरवलेलं होतं. दुसरं एखादं प्रेक्षणीय स्थळ पहायचं एकवेळ राहून गेलं तरी चालेल पण ही जादूची नगरी चुकवून चालणार नाही, असा माझा निश्चय झाला होता.

आणि 'निश्चयाचे ऐसे बळ । तुका म्हणे तेचि फळ ।।' या उक्तीचा प्रत्यय, नुकताच मी अमेरिकेत गेलो, तेव्हा मला आला. माझी मुलगी अरुणा हिच्याकडं मी गेलो होतो. ती आपल्या पतीसह न्यू जर्सी राज्यातल्या जर्सी सिटीमध्ये राहते. न्यूयॉर्कपासून जवळच असलेल्या या शहरापासून, पूर्व अमेरिकेच्या दक्षिण टोकाशी फ्लोरिडा राज्य आहे. त्याच्या मध्यभागी आहे ही डिस्ने दुनिया. म्हणजे अंतर तसं बरंच होतं. विमानानं जायचं झालं तरी जवळजवळ तीन तासांचा प्रवास होता. पण माझी प्रबळ इच्छा पाहून माझी कल्पना त्या अगत्यशील कन्या-जामातांनी उचलून धरली. त्यांचा पाचेक वर्षांचा मुलगा अमोल म्हणून आहे. त्याच्यासह आम्ही सर्वांनी डिस्ने दुनियेची सफर करायची, हे त्यांनी निश्चित केलं.

प्रवासी कंपन्यांकडून माहिती-पत्रकं मिळवली, तेव्हा असं आढळून आलं, की डिस्ने दुनियेचा व्याप अलीकडं बराच वाढलाय. अनेकानेक प्रेक्षणीय घटना-स्थळांचा समूह असलेली ही अजब दुनिया अफाट अशी दुहेरी नगरी आहे. तपशिलात जाऊन पाहिलं, तर एखाद-दुसऱ्या दिवसात घाई-गडबडीत उरकता येण्यासारखा हा मामुली मामला नाही, असं

दिसून आलं. तेव्हा या दुनियेत किमान तीन दिवस घालवायचे अन् ती मनासारखी पाहून घ्यायची, असं ठरलं. या दुनियेच्या परिसरातच 'सी वर्ल्ड' (सागरदुनिया) ही आणखी एक प्रेक्षणीय नगरी होती. एवढ्या जवळ जाऊन तिचं दर्शन घेतल्याशिवाय परतणं अरसिकपणाचं झालं असतं म्हणून एखादा विश्रांतीचा दिवस जमेस धरून एकूण सहा दिवसांची सफर मुक्रर केली. त्याप्रमाणं, विमानानं जिथं उतरायचं त्या ऑरलँडो विमानतळाजवळच्या एका हॉटेलात दुहेरी खोली राखून ठेवण्याची व्यवस्था केली.

आणि एके दिवशी हवाईप्रवास करून आम्ही मंडळी मुक्कामावर जाऊन पोहोचलो.

विमानतळावर भाड्यानं मिळणारी मोटार आठवडाभरासाठी घेतलीच होती. (आमचे जावईबापू चक्रधर.) तिच्यात बसून 'डिस्ने दुनिया' गाठली.

सरोवरांनी नटलेल्या तब्बल २७ हजार एकरांच्या अफाट वनभूमीवर वॉल्ट डिस्ने दुनिया ऐसपैस पसरलेली आहे. 'मॅजिक किंग्डम' (जादूचं साम्राज्य) व 'एप्कॉट सेंटर' हे या दुनियेचे दोन विशाल भाग असून ते आपापल्यापरी दोन वेगवेगळी नगरंच आहेत. आमच्या मुक्कामापासून एका दिशेला, पाच किलोमीटरवर 'एप्कॉट सेंटर' होता, तर दुसऱ्या दिशेला सहा किलोमीटरवर जादूचं साम्राज्य होतं. या दोहोंमध्ये अंतर पाच किलोमीटर आहे. पण या दोन्ही नगरींना जोडणारी 'मोनोरेल' ही पुलावरून चाकांविना सरकत जाणारी विद्युत् रेलगाडी आहे. समोरासमोर दोघा-दोघांना आरामात बसता येईल अशा बैठका असलेले छोटे छोटे खण असलेल्या या रेलगाडीचे खणा-खणाचे दरवाजे गाडी थांबली की आपोआप उघडतात व ती सुरू झाली म्हणजे आपोआप बंद होतात. अशा या अनेक रेलगाड्यांची ये-जा दोन्ही नगरींच्या दरम्यान दिवसभर, एवढंच काय, मध्यरात्रीपर्यंत चालू असते. हा प्रवासही विनामूल्य करता येतो. स्थानकावर गाडीच्या एकेका खणापाशी

चारचार जणांच्या रांगा लावल्या जातात. या व्यवस्थेसाठी माणसं नेमलेली असतात, त्यामुळे गर्दी, घुसाघूस न होता शिस्तीत वाहतूक सुरळीतपणे चालते. गाडीच्या दोन्ही अंगांना भल्या मोठ्या (जाडजूड) काचा लावलेल्या असल्यानं आजूबाजूचं सृष्टिसौंदर्य सुखेनैव पाहता येते. या गाडीतून होणारा प्रवास हाही लहान–थोर प्रवाशांना सुखद अनुभव देऊन जातो. रोज सहस्रावधी प्रवासी या गाड्यांतून जा–ये करतात. उन्हाळ्याच्या दिवसांत शाळा–कॉलेजांना सुटी असल्यानं ही दुनिया पहायला प्रवाशांची विशेष गर्दी होते. आमच्या वेळी सहस्रावधी प्रेक्ष-कांची रीघ लागली होती. पण कितीही गर्दी झाली, तर कोठेही प्रेक्षकांची झुंबड उडत नाही. कारण सर्व ठिकाणी पद्धतशीर रांगा लावण्यात येतात.

'वॉल्ट डिस्ने दुनिया' म्हणजे बालमनातील स्वप्नसृष्टीचं–कल्पना सृष्टीचं नयनरम्य प्रतीक आहे. सर्व वयांच्या मुलांच्या (आणि प्रौढ-पणीही ज्यांनी आपलं शैशव जपून ठेवलंय, अशा त्यांच्या पालकांच्याही) स्वप्नाळू डोळ्याचं पारणं फेडणारी ही अलौकिक, अद्भूत जादूनगरी आहे. अमेरिकेत प्रवास करणारी भारतीय मंडळी क्वचितच कुणी या दुनियेकडे वळतात, 'केवळ मुलांसाठी ही दुनिया आहे.' असा सोईस्कर समज करून घेऊन ती या अलौकिक स्थळाकडे पाठ फिरवीत असावीत. अर्थात ते एका बहुमोल अनुभवाला मुकतात. 'एप्कॉट सेंटर' तर मोठ्या मुलांचं व प्रौढांचंही विशेष ज्ञानरंजन करणारं आहे. बहुसंख्य अमेरिकी व इतर पाश्चात्त्य मंडळी, तशीच जपानी, कोरियन आदि पौर्वात्य मंडळी, मात्र हौशी तसेच ज्ञानपिपासू असल्यानं आपल्या मुलां-बरोबर ते उत्साहाने या दुनियेत येऊन रमत असलेले दिसतात. खरं तर वॉल्ट डिस्नेच्या बहारदार व्यंगपटांनी कैक रसिक प्रौढांचंही मनोरंजन केलं आहे. तसंच मनोरंजन ही डिस्ने दुनियाही करणारी आहे.

वॉल्ट डिस्ने दुनियेतली 'जादूचं साम्राज्य' (मॅजिक किंग्डम) ही नगरी म्हणजे मुलांच्या दृष्टीनं एकपरी परीसृष्टीच होय. बालमनाला आकर्षून घेणाऱ्या नि रमवणाऱ्या एकाहून एक सरस अशा कल्पनारम्य चमत्कृतींनी ही नवलनगरी विनटलेली आहे.

मुलांच्या ज्ञानात व अनुभवात भर घालून त्यांच्या कल्पक बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या असंख्य गोष्टी या नगरीत आहेत.

'जादूच्या साम्राज्या 'च्या बाहेर 'रिव्हर कंट्री' (नदी–प्रदेश) आहे, तिथं कमी–अधिक उंच लवचिक फळयांवरून उडी घेऊन पाण्यात बुडी घेण्याची पोहोण्याची व घसरगुंडी करीत पाण्यात खेळण्याची उत्तम सोय असून धवधव्यांचे सौंदर्यही लुटता येतं. दुसरं आकर्षण आहे 'डिस्कव्हरी आयलंड' (शोधक बेट) सुंदर वनश्रीनं व फुलझाडांनी घेरलेल्या बे सरोवरातून या बेटावर छविन्यातून जाता येतं. ६० वेगवेगळया जातीच्या पाचेकशे पक्ष्यांचं दर्शन इथं घडतं. मात्र या स्थळांना भेट देण्यासाठी वेगळं मूल्य पडतं. हा भाग डिस्ने दुनियेच्या बाहेरचा आहे.

अमेरिकेच्या अगदी पश्चिमेला पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यालगत असलेल्या कॅलिफोर्नियात उभारलेली 'डिस्ने–लॅंड' ही पहिली नवलनगरी. तिच्याच धर्तीवर पण अधिक विस्तृत व व्यापक स्वरूपात १९७१ साली फ्लॉरिडामध्ये ही भव्य डिस्ने–दुनिया (डिस्ने वर्ल्ड) उभारलेली आहे. या दुनियेत 'एप्कॉट सेंटर' या आणखी एका आगळया वेगळया कल्पनारम्य नगरीची भर पडली ती १९९२ च्या ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभी. सिमेंटच्या अफाट पार्कमधे आपली बस किंवा मोटार सोडून दिल्यावर रेलगाडीखेरीज 'जादूच्या साम्राज्या 'च्या अलीकडं असलेल्या विशाल सरोवरातून मोठाल्या छबिन्यासारख्या बोटीतून व बसमधूनही तिथंपर्यंत जाता येतं.

(ही वाहतूकसेवा विनामूल्य आहे.)

'जादूचं साम्राज्य' किंवा 'एप्कॉट' सेंटर' या दोन्ही नगरीचे पासपोर्ट (तिकीट) काढून आत प्रवेश केल्यावर (शूटिंग गॅलरी, रिव्हर कंट्री व डिस्कव्हरी आयलंड वगळता) आतली कोणतीही प्रेक्षणीय स्थळं, प्रदर्शने, चित्रपट वा प्रयोग पाहण्यासाठी, किंवा कृत्रिम जंबो हत्तीच्या पाठीवर वसून किंवा रॉकेटमधून फेरफटका मारण्यासाठी कोणतंही वेगळं मूल्य आकारलं जात नाही. (काही विशेष लोकप्रिय

आकर्षणासाठी गर्दी होते, तेव्हा कमी–अधिक लांब रांगेत उभं राहावं लागतं एवढंच.)

एका दिवसाच्या संयुक्त पासपोर्टला साधारणपणे १८ डॉलर पडतात. तीन दिवसांचा सवलतीचा संयुक्त पासपोर्ट ४२ डॉलरना मिळतो. दोन्ही नगरीतल्या सर्व प्रेक्षणीय गोष्टी नीट पाहायच्या व अनुभवायच्या झाल्या तर तीन दिवसांचा अवधी लागतो. तशा वर्षभर खुल्या असणाऱ्या दोन्ही नगरी उन्हाळ्याच्या दिवसात रोज सकाळी ९ वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत यथेच्छ पाहता येतात. एरवीच्या दिवसांत मात्र सुट्यांचे हंगाम किंवा काही खास प्रसंगी संध्याकाळची वेळ वाढवलेली असते. एकाच दिवसात पुन्हा यायचं असल्यास बाहेर पडताना हातावर शिक्का मारून घ्यावा लागतो. तो पाहून पुन्हा प्रवेश मिळतो. ज्या काळात या नगरी मध्यरात्रीपर्यंत खुल्या असतात, त्या दिवसांत रोज रात्री दारूकामाची आतषबाजी हे एक आकर्षण असते.

'जादूच्या साम्राज्या'त तर रोज रात्र पडल्यावर वॉल्ट डिस्नेच्या विशेष प्रसिद्ध पावलेल्या कार्टून्समधल्या व्यक्तिरेखा-मिकी माउस, डोनाल्ड डक, व इतर प्राणी आणि पऱ्या, राक्षस, ड्रॅगन, हिमगौरी अन् सात बुटके इत्यादींची रोषणाईसह सजवलेल्या अनेक रथांतून सजीव स्वरूपात सवाद्य मिरवणूक निघते ही भव्य मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा प्रेक्षकांची प्रचंड गर्दी उसळते.

'जादूच्या साम्राज्या'त प्रवेश करताच भव्य प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूस जुन्या पद्धतीची वाफेच्या इंजिनाची रेलगाडी तुमच्या स्वागताला सज्ज असते. ती गोलाकार फिरून तुम्हाला सबंध 'जादूच्या साम्राज्या'चा फेरफटका घडवून आणते. शेवटी ही गाडी निघायच्या ठिकाणी परत येऊन थांबते. मग पुन्हा नवीन फेरीला निघते. प्रवेशद्वारातून आत शिरलो म्हणजे उजवीकडं एका टुमदार हवेलीत जाऊन आपणाला वॉल्ट डिस्नेच्याच शब्दांत–स्वरात त्याची जीवनगाथा ऐकता येते. बाहे-

रच्या दिवाणखान्यात डिस्नेच्या आयुष्यातल्या हरएक घटना, प्रदर्शनाच्या रूपानं आपल्याला पाहायला मिळतात आणि ते दालन ओलांडलं म्हणजे पलीकडल्या प्रेक्षागारात जाऊन डिस्नेची बालपणापासूनची जीवनकहाणी, माहितीपटाच्या स्वरूपात पाहायला, ऐकायला मिळते. मोठेपणी आगळी-वेगळी अप्रतिम कार्टून्स–व्यंगपट–हास्यपट काढून जागतिक कीर्ती संपादणाऱ्या या जादूगार चित्रमहर्षीची घडण कशी झाली याचं आटोपशीर दृक्–श्राव्यदर्शन आपणाला अवघ्या वीसएक मिनिटांत घडतं.

याच्यापुढचा उजवीकडचा विभाग आहे ' मेन स्ट्रीट यु. एस्. ए. हा. जुन्या काळच्या अमेरिकेचं दर्शन घडवणाऱ्या या विभागात मुक्या चित्रपटांच्या काळातले काही अभिजात अमेरिकी चित्रपट एकामागून एक असे अखंड दाखवले जातात.

याच्या समोरच्या अंगाला असलेल्या दालनात काही चित्रपटदर्शक यंत्रं रांगेत बसवलेली आढळतात. एकेका यंत्रात ठराविक नाणं टाकून, त्याच्या समोरच्या स्टुलावर बसून त्या यंत्रातला चित्रपट, छिद्राला डोळा लावून पाहता येतो.

याशिवाय दुसऱ्या एका दालनात ' डोनाल्ड डक ' या बदकाच्या व्यक्तिरेखेवर आधारलेले जे विविध व्यंगपट डिस्नेनं काढलेले आहेत त्यांचं कृष्ण–धवल रंगांतील दर्शन १०–१२ छोटचा-छोटचा पडद्यांवर एकाच वेळी घडवण्यात आलं आहे. दालनात मध्यभागी उभं राहून वा बसून भोवतालच्या भिंतीवरील पडद्यावर हे चित्रपट हवा तेवढा वेळ पाहता येतात. ' डोनाल्ड डक 'वरील पहिला व्यंगपट डिस्नेनं काढला, त्याला यंदा (१९८४) पन्नास वर्षं पूर्ण झाली. म्हणून त्याच्या सुवर्ण-महोत्सवानिमित्त यंदा हे खास दालन उघडण्यात आलं आहे.

वॉल्ट डिस्नेचे इतर व्यंगपट दुसऱ्या एका प्रेक्षागृहात एकापाठोपाठ एक असे दाखवण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. हवा तेवढा वेळ हे चित्रपट पाहात बसता येतं. मूल्य मात्र काहीच वेचावं लागत नाही.

या प्रेक्षागृहाबाहेर डिस्नेच्या विविध व्यंगपटांतल्या, मिकी माऊस,

मिनी माऊस, डोनाल्ड डक, ससा, कोल्हा, लांडगा अशा व्यक्तिरेखा सजीव स्वरूपात मुलांना भेटतात. त्यांच्याशी हस्तांदोलन करतात. त्यांना जवळ घेऊन फोटो काढून घेतात. या प्राण्यांचे पोशाख पेहरणाऱ्या माणसांशी दोस्ती करण्यात, त्यांच्याशी लगटून आपले फोटो काढून घेण्यात मुलांची चढाओढ लागते. हे ' प्राणी 'ही कधी मुलांच्या खोडचा काढीत, तर कधी त्यांची करमणूक करीत त्यांना रंजवतात.

या विभागात पुढं जुन्या काळच्या घोडागाडीतून, तसंच बिन-घोड्याच्या गाडीतून वा दुमजली बसमधून या विभागाचं बाह्यदर्शन घेता येतं. जुन्या काळच्या फायर-इंजिनमध्ये बसून छोटी सफरही करता येते. राणी व्हिक्टोरिया हिच्या काळातलं उपाहारगृहही या भागात आहे.

या विभागानंतर आपण वळतो ' ॲड्व्हेंचर लँड ' (साहस भूमी) कडं. दूरवरच्या भूमींवरची साहसं यात दाखविलेली आहेत.

पहिलं दर्शन—होतं ते, फुटलेल्या जहाजातून वाचून निर्जन किनाऱ्यावर येऊन पडलेल्या एका स्विस कुटुंबानं एका भल्या मोठ्या झाडावर बांधलेल्या घराचं. झाडाच्या एकेका आडव्या मोठाल्या फांदीवर स्वयंपाकघर, शय्यागृह, विश्रांतीची खोली, खालच्या आडाचं पाणी काढण्यासाठी दोरखंडाचा राहाट, इत्यादींची केलेली उभारणी, झाडावर लाकडी फळ्यांच्या जिन्यानं वर-वर चढत जाताना दृष्टीस पडते.

' एन्चॅन्टेड बर्ड्स ' (भारलेले पक्षी) या दालनात संगीताच्या पार्श्वभूमीवर गाणारे विविध तऱ्हेचे पक्षी आणि फुलं, रंगीबेरंगी प्रकाश-झोतात चित्तवेधक दर्शन घडवतात तर ' जंगल क्रूझ ' दालनात संशोधकाच्या लाँचमध्ये बसून जगातल्या उष्ण कटिबंधातल्या नद्यांतून ' धोकादायक ' पर्यटन करता येतं.

समुद्रावरच्या चाचेगिरीचं दर्शन घडवणारंही एक दालन या विभागात आहे. चाच्यांचे बालेकिल्ले व खजिना ठेवण्याच्या कोठ्या पाहणं हा रोमांचकारी अनुभव आहे.

या विभागानंतर आपण 'फ्रंटीअर लँड' (सरहद्दीरचीव भूमी) या विभागात प्रवेश करतो. इथं डोंगराळ, खडकाळ भागातून धडकत जाणाऱ्या दणकट रेलगाडीतून धाडसी सफर करण्याचा आनंद साहसी मुलांना लुटता येतो. वटवाघळांची झुंबड, घोंगावता धबधबा, गडगडणारे भूकंप व कोसळता कडा थरारून सोडतात.

याच विभागात तराफ्यातून 'टॉम सॉयर आयलंड'चा प्रवास करता येतो. अस्वलांचे रानटी चाळेही पुढल्या दालनात कसरतीच्या स्वरूपात पाहता येतात.

या विभागातल्या 'शूटिंग गॅलरी'त २५ सेंट (पाव डॉलरचं नाणं) देऊन नेमबाजीतल्या आपापल्या नैपुण्याची परीक्षा घेता येते.

या विभागात 'लिबर्टी स्क्वेअर' (स्वतंत्र चौक) म्हणून पोट-विभाग आहे. त्यात असलेल्या राष्ट्राध्यक्षांच्या दिवाणखान्यात, रंगमंचा-वर अमेरिकेच्या जुन्या इतिहासाचं, सजीव स्वरूपात नाट्यमय दर्शन घडवण्यात येतं. त्यात जुने प्रमुख राष्ट्राध्यक्षही 'प्रकट' होतात.

छबिन्यातून (लाँचमधून) नदीवरून सफर करण्याचीही संधीही या विभागात मिळते.

या विभागातलं आणखी एक आकर्षण म्हणजे ९९९ भुतं–पिशाच्चं-राक्षसांची भेसूर पण गंमतीदार साहसं 'हॉन्टेड मॅन्शन'मध्ये (भुताट-कीच्या हवेलीत) बघायला मिळतात. हा अनुभव अतिशय चित्तथरारक असतो.

यानंतर 'फँटसी लँड' (कल्पनारम्य सृष्टी) हा भव्य विभाग परिकथेतल्या उंचउंच मनोऱ्यांच्या भव्य राजवाड्याच्या दर्शनी प्रवेश-द्वारासह आपलं स्वागत करतो.

'२०,००० लीग्ज अंडर द सी' (खोल–खोल समुद्रातील सृष्टी) हे या विभागातलं प्रमुख आकर्षण. मगरीच्या आकाराच्या अर्धपाणबुडीत बसून एका खोल समुद्रसदृश सरोवरातून ही सागरसफर होते. खोल समु-

द्रात दिसणारे मासे आदी प्राणी, विशिष्ट वनस्पती, सागरतळाची उंच सखल जमीन, गुहा, टेकाडं वगैरेचं दर्शन पाणबुडीच्या गोल झरोक्यातून बसल्या जागेवरून घेता येतं. खोल पाण्यातल्या या प्रतिमांचं दर्शन सुलभ व्हाव म्हणून जरूर ती प्रकाशयोजना अर्थातच केलेली आहे. वीस एक मिनिटांची ही सागरसफर वेगळ्याच मनोवेधक दर्शनाचा अनुभव प्रेक्षकाला देते.

वॉल्ट डिस्ने यांच्या काही सुप्रसिद्ध कार्टून्सवर (व्यंगपटांवर) आधारलेल्या कल्पनारम्य सृष्टीचं दर्शनही काही दालनांतून घडवण्यात आलं आहे. ' मि. टोड्स वाइल्ड राइड ' (बेडकाची बेफाम दौड) ' स्नो–व्हाइट अँड सेव्हन ड्वार्फस ' (हिमगौरी आणि सात बुटके) ' डम्बो, द फ्लाइंग एलिफंट ' (उडता डम्बो हत्ती) ' सिंडरेलाचा सोनेरी अवतार ' पीटर पॅन्स फ्लाइट ' (पीटर पॅनचं उड्डाण) या कथांतील कल्पनारम्य वातावरण दृश्य स्वरूपात घडवणारी ही दालनं आहेत. हिमगौरीच्या साहसाचं दर्शन अरण्यातल्या फेरफटक्यानं होतं. तर डम्बो हत्तीवर बसून उंच उड्डाण करता येतं. सिंड्रेलाच्या दालनात रंग व संगीत यांच्या पार्श्वभूमीवर ९० पैकी एखाद्या उडत्या घोड्यावर बसून मौज लुटता येते. पीटर पॅनच्या दालनात लंडन शहरावर चांदण्या रात्री उड्डाण करण्याचा कल्पनारम्य अनुभव घेता येतो.

' इटस ए स्मॉल वर्ल्ड' (इटुकली दुनिया) या दालनात देशो-देशीच्या शेकडो बाहुल्या नृत्य–नायन करीत मजेत समुद्रपर्यटन करताना दिसतात.

या बाजूकडून ' टुमॉरोलॅन्ड ' (उद्याचं–भावी जग) या विभागा-कडे जाण्यासाठी तारांच्या रज्जूवरून विजेच्या पाळण्यातून सरकत येणारा ' स्काय-वे ' (आकाशमार्ग) आहे. मात्र ही वाहतूक एकमार्गी होते. या मार्गाने माघारी परतता येत नाही. या मार्गानं प्रवास करताना ' जादूच्या साम्राज्याचं ' विहंगम दर्शन घडतं.

' फॅन्टसी फेअर ' (कल्पनारम्य मेळा) या दालनात डिस्ने–

कार्टून्समधील लोकप्रिय व्यक्तिरेखा सजीव स्वरूपात अभिनय करून दाखवतात. अर्थात या प्राण्यांच्या हुबेहूब वेषभूषेचे जाडजूड डगले चढवलेली लहान–मोठी सोंगाडी माणसंच या प्राण्यांचे अवतार घेऊन वावरतात.

आता पुढे येतो, भावी काळातल्या गंमतीजमतीचा दर्शन घडवणाऱ्या 'टुमारो लँड' (उद्याचं भावी जग)चा विभाग. यात मंगळावर स्वारी करणाऱ्या अग्निबाणाचं उड्डाण दाखवलंय मॅक्डोनल–डग्लस यांनी.

नंतर मनोवेधक दर्शन घडतं जगाचा फेरफटका करून आणणाऱ्या वॉल्ट डिस्ने यांच्या 'मॅजिक कार्पेट' (जादूचा गालिचा) या भव्य चित्रपटाचं. एका गोलाकार उंच प्रेक्षागृहात सभोवारच्या सगळ्या भिंतींवर हा चित्रपट जगाचं अक्षरश: भव्य दर्शन घडवतो. त्या–त्या प्रसंगात आपण सामील झालो आहोत, असा भास चित्रपट पाहताना प्रेक्षकांना सतत होत राहतो, अशी या चित्रपटदर्शनाची किमया आहे. आफ्रिकेतल्या जंगलातले वन्यपशू, अमेरिकेतील नायगाराचा धबधबा, चीनमधली प्रचंड भिंत...अशा, जगातल्या प्रमुख महत्त्वाच्या घटना व स्थळं यांचं नयनरम्य रंगीत दर्शन घडवणाऱ्या या चित्रपटात भारतातल्या ताजमहाल, बनारस, काठेवाड–राजस्थानातील उंट, मुंबईच्या चौपाटीवर विसर्जनासाठी जातेवेळेच्या गणेशमूर्तीची भव्य मिरवणूक, अशा शेलक्या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. हे भारतीय प्रेक्षकांच्या दृष्टीने विशेष आकर्षण.

याच विभागात, भावी जगातल्या क्रांतिकारक वाहनांची कल्पना देणाऱ्या वेगळ्याच बनावटीच्या वाहनात बसून आरामशीर प्रवास कसा करता येईल याचा अनुभव आणून दिलाय् एडिसन इलेक्ट्रिक इन्स्टिटयूट या संस्थेनं.

स्वत: विमान चालविण्याचा, हवाई साहसाचा अनुभवही दुसऱ्या एका दालनात घेता येतो.

विद्युत्क्षेत्रातील संशोधनामुळं, गेल्या शतकभरात अमेरिकी लोकांच्या जीवनात ज्या सुखसोई निर्माण झाल्या आहेत त्यांचं प्रात्यक्षिक एका दालनात दाखविण्यात येतं. जनरल इलेक्ट्रिक या कंपनीमार्फत हा प्रयोग सादर करण्यात येतो.

एका दालनात विजेवर चालणाऱ्या छोटया छोटया अनेक मोटारी वळणं–वळसे घेत भरधाव जातात. या मोटारींत प्रेक्षकांना आळीपाळीनं सुकाणूचं चाक धरून बसता येतं आणि काही एका धाडसाचा अनुभव घेता येतो.

दुसऱ्या एकेठिकाणी भव्य रंगमंचावर नृत्य–गायन करून भपके-दार वेषभूषेत कैक नट–नटी भावी रंगभूमीची कल्पना आणून देण्याचा प्रयत्न करतात. लागोपाठ चालू असलेल्या प्रवेशांत एका वेळी पंचवीस–तीस नट–नटींचंसुद्धा हरप्रकारचं नृत्य–गायन चाललेलं असतं. नट–नटींच्या या ताफ्यात अधूनमधून मिकीमाऊस, डोनाल्ड डक यांसारखी डिस्ने कार्टूनमधील काही पात्रं सजीव होऊन सामील झालेली दिसतात. नृत्य–संगीताचा हा सोहळा डोळे व कान यांचं पारणं फेडणारा असतो.

या सर्व विभागांत जागजागी उपाहारगृहं, गार पाण्याचे उडते झरे, स्वच्छतागृहं तर आहेतच शिवाय नानातऱ्हेच्या वस्तूंच्या संग्रहाची दुकानंही ठिकठिकाणी आहेत. बहुतेक प्रवाशांकडे कॅमेरे असतात. आवड-णारी दृश्यं टिपणं, त्यांच्या पार्श्वभूमीवर आपल्या मुलामाणसांची छबी काढणं असं त्यांचं सारखं चालू असतं. तर एखाद्या प्रेक्षणीय स्थळाचं दृश्य कोणत्या ठिकाणावरून टिपलं असता विशेष चांगलं निघेल, अशी विशिष्ट ठिकाणं–त्या ठिकाणी बोर्ड लावून कोडॅक कंपनीनं दाखवून दिलेली आहेत. या सोईचाही काही प्रवासी फायदा घेतात.

अपंग प्रेक्षकांसाठी व्हील–चेअर (दुचाकी खुर्ची) अल्प भाड्यानं पुरविली जाते. त्याचप्रमाणे प्रवेशद्वारालगतच एका ठिकाणी प्रवाशांच्या सोईसाठी लॉकर्सही ठेवलेले आहेत. 'जादूचं साम्राज्य' हे असं आहे.

* *

*0*

# कल्पनारम्य नगरी : एप्कॉट सेंटर

'मॅजिक किंग्डम' (जादूचं साम्राज्य) पाहून झाल्यावर वॉल्ट डिस्ने दुनियेच्या दुसऱ्या विभागाकडं–'एप्कॉट सेंटर' कडं वळायचं. अर्थात हा विभाग म्हणजेसुद्धा एक विशाल नगरी आहे. या नगरीतील बहुतेक कल्पनारम्य दृश्यं मात्र मुख्यत: मोठी मुलं व प्रौढ माणसं रस घेऊ शकतील अशी आहेत. जादूच्या साम्राज्याकडून मोनोरेलनं या विभागाकडं पंधरावीस मिनिटांत जाता येतं. परस्पर येणाऱ्या प्रवाशांना मात्र आपल्या मोटारी किंवा बसेस मैलभर अलीकडं असलेल्या सिमेंटच्या अफाट मैदानावर उभ्या कराव्या लागतात. आखून दिलेल्या भल्यामोठ्या लंब-चौरस तुकड्यात गाड्या पद्धतशीर उभ्या कराव्या लागतात. या तुकड्यांना क्रमांक दिलेले असतात. त्यामुळं मैदानावर सहस्रावधी गाड्या असल्या तरी आपली गाडी प्रवाशाला सहज शोधून काढता येते.

या मैदानाच्या मधोमध पाम वृक्षांची उभी रांग आहे. या रांगेच्या टोकापाशी प्रवाशांनी रांग लावायची असते. तिथं मोटरकोच येऊन उभी राहते. आठ माणसं बसू शकतील असे छोटे छोटे आठदहा सुटे सुटे पण एकमेकांशी संलग्न खण असलेल्या या कोचमध्ये पाऊणशे प्रवासी भरून कोच पाचसहा मिनिटांत 'एप्कॉट सेंटर'च्या भव्य प्रवेशद्वारापाशी पोचते. तिथं असलेल्या तिकिटांच्या खिडक्यांत हवं ते – एका दिवसाचं किंवा दोन वा तीन दिवसांचं तिकीट (पासपोर्ट) काढून आत प्रवेश मिळवायचा. मग एका कारंज्यापलीकडं असलेल्या प्रचंड गोलघुमटाखालून सेंटरमध्ये शिरता येतं.

मग समोरच दिसतं 'स्पेसशिप अर्थ' अवकाश यान ? पृथ्वी हे

भव्य केंद्र. हे एक मोठं आकर्षण असल्यानं या केंद्राबाहेर प्रेक्षकांची सतत सुमारे दीड किलोमीटर रांग लागलेली असते. मात्र ही रांग लांबलचक न पसरता लोखंडी पाइप्सच्या इंग्रजी यू ( U ) अक्षराच्या आकाराच्या कठड्याच्या मध्ये वळविलेली असते: त्यामुळे तिला आटोपशीर स्वरूप प्राप्त होते. केंद्रात ५५ मीटर उंचीचं भव्य दालन लागतं. दोघे-चौघे समोरासमोर बसू शकतील एवढ्या छोड्या जोडखणांच्या, विजेवर चालणाऱ्या शटलमधून वळणे-वळसे घेत या दालनातला प्रवास चालतो. दोन्ही बाजूंना मानव जातीच्या दळणवळणाच्या उत्क्रांतीचा शिल्पबद्ध हालचालयुक्त आलेख पाहता येतो. मानवानं प्रारंभीच्या काळात गुहांत काढलेल्या रेखाचित्रांपासून आजच्या उपग्रहांच्या तंत्रज्ञानापर्यंतचा व पुढचाही नाट्यपूर्ण इतिहास या दालनात दृश्यमय स्वरूपात पाहायला सापडतो. त्यानंतर पृथ्वीभोवतालच्या अफाट तारांगणाचंही कल्पनारम्य दर्शन घडतं. ए. टी. अँड टी. या टेलिफोन व कॉम्प्युटर कंपनीच्या सहाय्यानं हे दालन उभारण्यात आलं आहे.

त्यानंतर समोर येतं दळणवळणाच्या गाभ्याचं दर्शन घडवणारं केंद्र. या केंद्राचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग कल्पिलेले आहेत. पूर्व भागात ' पडद्यामागची जादू ' सादर केली आहे स्पेरी या कंपनीनं. कौशल्यपूर्ण व माहितीपूर्ण अशा या प्रदर्शनात गणकयंत्राच्या इतिहासाचा मनोरंजक आढावा घेतलेला आहे. गुहावासी मानवानं गणिताच्या समस्या सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नापासून जगात पहिला इलेक्ट्रानिक कॉम्प्युटर निर्माण झाला तिथपर्यंतची मानवाची दळणवळणातील प्रगती तर या दालनात दाखवलेली आहेच, पण त्याच्याही पुढं या पद्धतीत झालेल्या विकासाचा आलेख प्रकट केलेला आहे. विनोदपूर्ण व्यंगचित्रांच्या सहाय्यानं घडवलेलं हे दर्शन मनोरंजक तसंच उद्बोधक झालं आहे. डिस्ने दुनियेतल्या दैनंदिन कार्यात गणकयंत्राचा कसा वापर केला जातो त्याचं प्रात्यक्षिक या प्रदर्शनाच्या दुसऱ्या भागात दाखवलेलं आहे.

भावी काळात ऊर्जेचा वापर कोणकोणत्या कामी कसा कसा केला जाईल याची कल्पनाही एका दालनात देण्यात आलेली आहे.

त्यानंतर आपण याच केंद्राच्या पश्चिम विभागाकडं वळतो. तंत्र-विद्येच्या विकासात मानवानं सध्या गाठलेले टप्पे या स्वतंत्र दालनात दाखविले असून शिवाय भावी दळणवळण पद्धतींचे कल्पनारम्य आडाखे चित्रित केलेले आहेत. कल्पकतापूर्ण खेळ व दृश्य यांच्या साह्याने घडव-लेलं हे दर्शन प्रेक्षकांना थक्क करून सोडतं. हे प्रदर्शन सादर केलं आहे, ए. टी. अँड टी. या संस्थेनं.

नंतर आपल्याला सामोरं येतं ' युनिव्हर्स ऑफ एनर्जी (ऊर्जा-विश्व). ' एक्झॉन ' या कंपनीनं सादर केलेल्या भव्य दालनात बहुविध प्रतिमांच्या साहाय्यानं प्रथम परिचय–दर्शन घडवलं जातं. मग, आपल्या जीवनाला इंधन पुरविणाऱ्या शीघ्रगती शक्तींचा आणि शेवटी ऊर्जा–विश्वाचा शोध घेतला जातो. छपरावर एकवटलेल्या सौरशक्तीच्या प्रेरणेवर चालणाऱ्या ' थिएटर कार'मधून प्रवास करणारे प्रेक्षक जणू सूर्यप्रकाशावर आरूढ होतात. आणि पृथ्वीच्या प्रारंभीच्या अवस्थेपासून अलीकडे प्राण्यांच्या व वनस्पतींच्या सांगाड्यापासून होणारी ऊर्जेची उत्पत्ती इथपर्यंतचं प्रायोगिक दर्शन प्रेक्षकांना क्रमाक्रमानं घडवण्यात येतं. एवढंच काय, पण भावी काळातील ऊर्जेच्या पर्यायांची संभाव्य दखलही घेतली जाते. प्रवासाच्या आपल्या मार्गात, पृथ्वीवरच्या प्रारं-भीच्या काळात होणारी डिनोसर्स या अवाढव्य प्राण्यांची लढाई, भूकंपाचे व ज्वालामुखींचे उत्पात यांचं दर्शन प्रेक्षकांना घडतं. मग ऊर्जा माहिती–केंद्रावर ६४ मीटर लांबीच्या पडद्यावर आजच्या ऊर्जा–निर्मितीचे उगम पाहायला मिळतात. आणि शेवटी चालू विसाव्या शतकातील जीवनावर होणाऱ्या ऊर्जेच्या परिणामांचा प्रत्यय आणून देणारं ऊर्जा–विश्व प्रेक्षकां-पुढे उभं राहतं.

ऊर्जेच्या स्थित्यंतराचं दर्शन घेतल्यावर ' होरायझन्स ' (क्षितिज) या दालनाकडे आपण वळतो. भावी जगातली नवीन साहसी सफर आपल्याला २१ व्या शतकातल्या जीवनपद्धतीचं अकल्पित दर्शन घडवते. आश्चर्यकारक अशा मायक्रो व मॅक्रो–फोटोग्राफीच्या साहाय्यानं अति-भव्य पडद्यावर आजच्या अपूर्व प्रतिमांचं दर्शन आपल्याला घडवलं जात

नंतर भावी नागरी जीवन, यंत्रमानवांच्या अधिकाराखाली होणारी वाळवंटातील शेती, क्रियाशील समुद्र वसाहत आणि 'अंतराळनगर' या चार भावी मानवी वस्त्यांचा मागोवा या सफरीत आपण घेतो.ही सफर घडवून आणली आहे जनरल इलेक्ट्रिक या कंपनीनं.

त्यानंतर जनरल मोटर्स या कंपनीनं सादर केलेला 'वर्ल्ड ऑफ मोशन' (गतीचं विश्व) या दालनात आपण प्रवेश करतो. या दालनातली सफर वाहतुकीच्या उत्क्रांतीचे चित्तथरारक दर्शन घडवते. तशीच मनुष्यजातीची प्रगती, जगातल्या गतिशीलतेतील फेरबदलांशी कशी संबंधित आहे, याची प्रचीती आपल्याला आणून देते. भावी काळातील वाहतूक व्यवस्था आपल्या शहरांचा तोंडवळा कसा पालटून टाकील याची कल्पनाही मिळते. दुसऱ्या भागात आपल्याला भावी काळातील वाहतुकीवर होऊ शकणाऱ्या संभाव्य फेरबदलांची कल्पना आणून देणारं प्रदर्शन पाहायला मिळतं. वाहतुकीच्या तंत्रज्ञानाची झेप कुठवर पोचू शकेल, याची कल्पना हे प्रदर्शन आपल्याला देतं.

'कल्पना–सृष्टीचा फेरफटका' (जर्नी इन टू इमॅजिनेशन) हे पुढचं दालन सादर केलं आहे, कोडॅक या कंपनीनं. कल्पनारम्य ललितकलांची निर्मिती कशी होते याचा मागोवा घेणारा हा विद्युत रेलगाडीतून होणारा धावता प्रवास प्रवाशांना मंत्रमुग्ध करून सोडतो. माणसातील कल्पक प्रतिभेच्या केवळ एका स्फुल्लिंगातून ललितसाहित्य, नाटक, संगीत, चित्रकला आणि शोध यांचा उगम कसा होतो हे पाहणं अत्यंत मनोवेधक आहे.

मग जातो आपण 'जादूच्या डोळ्याच्या थिएटरात' या 'मॅजिक आय थिएटरात' आपण एका मुलाच्या कल्पक नजरेतून एका कल्पनारम्य जगाचं दर्शन घेतो. हा त्रिमिती चित्रपट विशिष्ट चष्मा लावून पाहताच आपल्या अगदी निकट सारे प्रसंग घडत असल्याचा चित्तथरारक भास आपल्याला होतो. काही गोष्टी तर आपल्या प्रत्यक्ष अंगावर झेप घेत असल्याचा भास होऊन विशेषत: लहान मुलांना भयचकित व्हायला

होत. हा अनोखा असा रोमांचकारी अनुभव आहे. अशा प्रकारचा भव्य चित्रपट जगात अपूर्व असा आहे.

दुसऱ्या एका दालनात मुलांच्या भावी काळातल्या सृजनशील क्रीडांगणाची कल्पना आणून देणारी विविध दृश्य आढळतात. इलेक्ट्रॉनिक तवकडीवर आपापली कल्पक कलाकृती निर्मिण्याची सोयही मुलांसाठी इथं केलेली आहे. इथल्या 'स्वप्नशोधकाच्या नाटयशाळेत' आपल्याला भाग घेता येतो. त्याचप्रमाणे संगीताच्या वाद्यांचा ऑर्केस्ट्रा (वाद्यवृंद) आपल्या केवळ विशिष्ट हातवाऱ्यांनी सहज वाजविता येतो, हा अनुभव नवलपूर्ण तसाच मोठा गमतीदार आहे.

'धरित्रीचा कानोसा' (लिसन टु द लँड) घेण्यासाठी आपल्याला रेल्वेगाडीसारख्याच पाण्यातून एका कालव्यातून चालणाऱ्या लांबलचक जलवाहनातून सफर करावी लागते. या वाहनातून वळसेवळणं घेत जाताना आपणाला उष्णकटिबंधातलं निबिड अरण्य, आफ्रिकेतलं वाळवंट, अमेरिकेतले मळे आणि गतकाळातील शेतवाडी यांचं दर्शन घडतं. जलवनस्पतींची लागवड व वाळवंटी शेती यांच्या बाबतीत झालेला आधुनिक विकास या सफरीत आपल्याला पाहता येतो आणि प्रायोगिक रोपवाटिकेत कृत्रिम उबेत जोपासल्या जाणाऱ्या रोपवाढीची भावी काळातली पद्धत नजरेखालून घालता येते. हा भाग क्रॅफ्ट या कंपनीनं सादर केलेला आहे.

पुढल्या एका दालनात माणसाचं भूमीशी कसं–कसं नातं जडलेलं आहे, याचं मनोवेधक, तसंच नेत्रदीपक दर्शन एक चित्रपट घडवतो.

नंतर जगाचं आटोपशीर प्रदर्शन घडवणारी 'वर्ल्ड शोकेस' म्हणून एक लांबलचक पेठ लागते. या पेठेत एकेका खोलीत जगातल्या विविध देशांतल्या वैशिष्टयपूर्ण गोष्टींचं दर्शन होतं. एकेका देशाच्या हवेलीचा दर्शनी भागच मुळी त्या त्या देशातल्या विशिष्ट वास्तुशिल्पाचं दर्शन घडवणारा आहे. या पेठेत पहिलं दालन आहे– 'अमेरिकेची साहसी धडपड'.

अमेरिकेच्या या दालनात बेन फॅसलीन व मार्क ट्वेन हे अमेरिका अन् अमेरिकी लोक यांची कथा नाट्यपूर्ण व स्फूर्तिदायी पद्धतीनं सांगतात, असा प्रसंग कल्पिला आहे. याशिवाय अमेरिकेत आलेल्या पहिल्या वहिल्या वसाहतवाल्यांची धडपड एका चित्रपटाद्वारे दाखविलेली आहे. त्याचप्रमाणं एका सैनिकाच्या दृष्टिकोणातून अमेरिकी क्रांतीचं दर्शन घडवलंय. अमेरिकेने पश्चिम सरहद्दीचा शोध कसा घेतला हेही आपल्याला इथं पाहता येतं.

यादवी युद्ध, मंदीची महालाट आणि जागतिक संघर्ष यांनी अमेरिकी लोकांची राष्ट्रीय वृत्ती कशी घडवली हे या दालनात दाखवून दिलेलं आहे. अमेरिकेची सर्वांत मोठी साधनसंपत्ती म्हणजे अमेरिकी लोक होत, याचं प्रत्यंतर सध्याची अमेरिका आणून देत असल्यानं त्यांनी अमेरिकेची साहसी धडपड पुढं चालू ठेवण्याचं आव्हान स्वीकारलं पाहिजे, असं आवाहन शेवटी केलेलं आहे. अमेरिकन एक्सप्रेस आणि कोका-कोला या कंपन्यांनी हे दालन सादर केलं आहे.

पुढल्या मेक्सिकोच्या दालनात काल्च्या व आजच्या मेक्सिकोचं दर्शन घडवलेलं असून शिवाय, इसवी सनापूर्वीच्या १५०० वर्षांपासून अगदी आधुनिक काळापर्यंतच्या कलावस्तू मांडण्यात आल्या आहेत. तर चीनच्या दालनात ११० मीटरच्या वर्तुळाकार पडद्यावर चीनमधील आश्चर्ये एका चित्रपटाद्वारे दाखविली आहेत. या निर्बंधित देशातल्या बहुमोलाच्या दुर्मिळ वस्तू तिथून पैदा करून अमेरिकेनं या दालनात मांडल्या आहेत. त्यात शाही वस्त्रं, जड-जवाहीर, लष्करी उपकरणं आणि चिनी बादशहाचं सिंहासन यांचा समावेश आहे.

जर्मनीच्या दालनात जर्मन कलावस्तूंखेरीज जर्मन खाद्यपदार्थ असलेलं उपाहारगृहही आहे. शिवाय इतर खाद्यवस्तू व पुस्तके यांची दुकानंही इथं आहेत.

त्यापुढलं दालन आहे इटालीचं. तिथं सर्व प्रकारच्या इटालियन खाद्यपदार्थांच्या उपाहारगृहाखेरीज विविध इटालियन कलावस्तूंची दुकानंही आहेत.

जपानच्या दालनात जपानी कला, बांबूच्या कलाकृती आणि सांस्कृतिक मौल्यवान वस्तू मांडलेल्या आहेत. त्यात अठराव्या शतकातलं सामुराई धर्तीचं एक चिलखतही आहे. विशिष्ट जपानी खाद्यपदार्थ सादर करणारं उपाहारगृहही आहे. सुप्रसिद्ध जपानी बाहुल्या, चिनी मातीची भांडी, हस्तकलेच्या वस्तू यांचंही दुकान आहे फ्रान्सच्या ग्रामीण भागावर आधारलेला चित्रपट, अभिजात फ्रेंच संगीताच्या पार्श्वभूमी-वर दाखवण्याची सोय फ्रान्सच्या दालनात केलेली आहे. शिवाय फ्रेंच खाद्यपदार्थांचं उपाहारगृह आणि कलावस्तूंची दुकानं आहेतच.

ब्रिटनच्या दालनात ब्रिटिश कलावस्तूंची विविध दुकाने आणि ब्रिटिश मद्य व खाद्यपदार्थांची उपाहारगृहे आहेत.

शेवटचे दालन आहे कॅनडाचं. याचं वैशिष्ट्य म्हणजे कॅनडाच्या बाह्य सृष्टीचं दर्शन घडवणारा वर्तुळाकार भव्य पडद्यावर दाखवलेला चित्रपट. कॅनडाचे खाद्यपदार्थ असलेले उपाहारगृह तर आहेच शिवाय रेड इंडियन आणि एस्किमो यांच्या विविध वस्तूंचं भांडारही आहे.

या पेठेत अजून काही देशांच्या दालनांची भर पडायची आहे. त्यासाठी आजूबाजूला मोकळी जागाही भरपूर आहे, मोरोक्कोचे दालन तर या हिवाळ्यातच उघडले जाणार असून त्याची पूर्वतयारी चालू झाली आहे. या पेठेचा पसारा तसा बराच आहे. म्हणून तिथं फेरफटका मारणं सोयीचं व्हावं म्हणून दुमजली बसगाड्या ठेवल्या आहेत. तशाच समोरच्या तलावाच्या काठाशी लाँचेसही असतात.

'जादूच्या साम्राज्याप्रमाणे' या नगरीतही उपाहारगृहं स्वच्छता-गृहं, गार पाण्याच्या नळतोट्या यांची सोय ठिकठिकाणी आहे. दोन्ही नगरीत कचरापेट्या जागजागी ठेवलेल्या असल्याने वाटेत कुठेही बिल-कूल कचरा दिसत नाही. स्वच्छता राखण्याला लोकही सहकार्य करतात.

'मॅजिक किंग्डम' व 'एप्कॉट सेंटर' मिळून बसलेली 'वॉल्ट डिस्ने दुनिया' ही अशी आहे, लहानथोरांचे मन रमवणारी आणि त्याचबरोबर त्यांच्या कल्पक बुद्धीला चालना देणारी व त्यांच्या ज्ञानात भरघोस भर घालणारी.

* *

# फ्लोरिडामधील मनोवेधक सागरी दुनिया

अमेरिकेच्या पूर्व किनारपट्टीवर, अगदी दक्षिणेला फ्लोरिडा हे अमेरिकेचे घटकराज्य आहे. पश्चिम, दक्षिण व पूर्व बाजूंनी सागराने वेढलेले हे राज्य अर्थातच द्वीपकल्पवजा आहे. अमेरिकेचे हे राज्य असे आहे की जिथे हिंवाळ्यात हिम पडत नाही. कारण हे कर्कवृत्ताच्या जवळ आहे. तर या फ्लोरिडाच्या मध्यभागी सागरापासून ८० किलो मीटर ऑरलँडो या नगरीत वॉल्ट डिस्ने वर्ल्डप्रमाणेच 'सी–वर्ल्ड' (सागरी दुनिया) वसवण्यात आलेली आहे. वॉल्ट डिस्ने-दुनिया या प्रचंड अद्भुत स्वप्ननगरीच्या खालोखाल इथले हे दुसरे मनोवेधक प्रेक्षणीय स्थळ. डिस्ने-दुनियेपासून ८ किलो मीटर असलेली ही सागरी दुनियासुद्धा मुलांचे मन मोहरून टाकणारी मनोवेधक अशी अफाट नगरीच आहे.

अमेरिकेतल्या एकूण तीन सी-वर्ल्ड पार्कमध्ये फ्लोरिडामधील ही सागरी दुनिया सर्वात जास्त भव्य असून गतवर्षीच दहा वर्षे पूर्ण झालेल्या या नगरीची १० कोटी डॉलर्स खर्चाची विकासयोजना नुकतीच पूर्ण झाली. या सागरी दुनियेतल्या निरनिराळ्या मोठाल्या तलावांत वगैरे असंख्य जलचर प्राण्यांचे दर्शन तर घडते, शिवाय व्हेल व शार्क यांसारख्या प्रचंड प्राणघातक माशांच्या मारामाऱ्या, डॉल्फीन या थोराड माशांचे कसरतीचे खेळ, तसेच वॉटर-स्कीइंगसारखे माणसांचे कसरतीचे प्रयोगही पाहायला मिळतात.

यांपैकी शार्कच्या लढाईचे दर्शन जिथे घडते तो तलाव ६ कोटी गॅलन पाण्याचा बनलेला असून त्याला ५० लाख डॉलर्स खर्च आलाय.

तर गेल्याच उन्हाळ्यात सस्तन जलचर प्राण्यांसाठी उभारलेल्या स्टेडियमसाठी तब्बल दीड कोटी डॉलर्स खर्च करण्यात आले आहेत. शामू, कांडू व नॉमू या प्राणघातक व्हेल्ससाठी याची उभारणी झाली असून अशा प्रकारचा जगातला हा सर्वांत मोठा स्टेडियम होय. इथे व्हेलच्या संशोधनासाठीही केन्द्र स्थापन केलेले आहे. आणि त्यासाठी अलास्कालगतच्या समुद्रातले १८ व्हेल्स आणून ठेवले आहेत.

विशेष म्हणजे सागरी दुनियेतल्या तलावात वापरण्यात येणारे सागरजल इथले व्यवस्थापन खास स्वरूपाचे स्वतः स्वतंत्रपणे बनवते. तेही दोन प्रकारचे. एक माशांसाठी, तर दुसरे सस्तन जलचर प्राण्यांसाठी.

एका अंगाने गेले की प्रथम आपल्याला सागरी दुनियेचे दर्शन घडविणाऱ्या मत्स्यालयात सागरपृष्ठालगतच्या खडकांच्या रांगेत जे प्रवाळप्राणी असतात त्यांच्या जगभरच्या नाना तऱ्हेच्या जातींचे दर्शन घडते. हे दर्शन कल्पनातीत असे विलोभनीय असते. भरती-ओहोटीने समुद्राच्या पाण्यात होणाऱ्या चढ-उतारांच्या बदलत्या वातावरणात स्टारफिश (तारामासा) व इतर लहानसहान मासे आपल्याला पाहायला मिळतात. ताऱ्याच्या आकाराच्या स्टारफिश या तळहाताएवढ्या माशाची गंमत अशी, की त्याचा तुकडा पाडला, तरी त्याला नंतर पुन्हा पूर्ण आकार लाभून तो जिवंत होतो.

नंतर आपल्याला दक्षिण अमेरिकी लोकरी सील व इतर प्रकारचे सील आणि कॅलिफोर्नियन समुद्रसिंह हे जलचर प्राणी खातात कसे, झोपतात कसे व खेळतात कसे हे एका तलावात पाहता येते. इथे या प्राण्यांना त्यांचे खाद्य प्रेक्षक भरवू शकतात.

मग येतो आपण जमिनीवर उभ्या केलेल्या, १९ व्या शतकातल्या एका जहाजाकडे या जहाजावर दोरखंडाचे जाळे पसरलेले आहे. या जाळ्याच्या आधाराने मुलांना वर चढून जाता येते आणि वर गेल्यावर, तिथल्या पाण्याच्या तोफांतून खालच्या लोकांवर पाण्याचा भडिमार करता येतो. दुसऱ्या बाजूच्या वाटोळ्या, गिरगिरत्या, सरकत्या जिन्या-

वरून झपाट्याने खाली उतरता येते. तिथूनच जवळच्या, प्लॅस्टिकचे रंगीबेरंगी चेंडू भरलेल्या खोलीत जाऊन मुलांना हुंदडता येते. १ मीटर उंचीपर्यंत ही सबंध खोली असंख्य चेंडूंनी भरलेली असते. चेंडूंच्या या राशीत नाचण्याबागडण्याचा वेगळाच अनुभव मुलांना येथे घेता येतो. येथून बाहेर पडल्यावर पलीकडच्या खोलीत व्हिडिओ-खेळ खेळून मुलांना आपली करमणूक करून घेता येते.

त्यापुढे गेल्यावर निरनिराळ्या जातींच्या वृक्षांचे उद्यान लागते. तिथल्याच ओढ्यात भल्यामोठ्या सुसरींचे दर्शन घडते. आतल्या काही सुसरी तब्बल पावणेपाच मीटर लांबीच्या आहेत. पलीकडे, ताज्या पाण्याच्या छोट्याशा तलावात हुंदडणारी पाणमांजरे आपली दृष्टी वेधून घेतात. त्यांची सतत सारखी चळवळ चालू असते.-एकसारखा खेळ चाललेला. ती दमून विश्रांती घेताहेत असे कधी दिसतच नाही.

त्यापलीकडच्या तलावात संथपणे, मजेशीर पद्धतीने पोहणारे वॉलरस हे ध्रुव प्रदेशातले थोराड, गबदुल जलचर प्राणी पाहायला मिळतात. या प्राण्यांचे तोंड दाढीमिश्यांनी गुरफटलेले असते. मुलांकडून बारीकसारीक माशांचे खाद्य मटकावायला हे वारंवार काठाशी येऊन पाण्यावर डोकावतात. पॅसिफिकमधल्या वॉलरस नराची लांबी साडेतीन मीटर असून वजन तब्बल १८२१.६० किलो असते. मादी मात्र कमाल ३ मीटर लांबीची व ९१०.८० किलो वजनाची असते. वॉलरसला सुळे असतात. त्यांचा उपयोग तो बर्फ किंवा समुद्रातळची जमीन उकरून खाद्य मिळवण्यासाठी करतो. समुद्रात हे कळप करून राहतात. कधी-कधी शेकडोंचाही कळप असतो. आपल्या पोरांना ते फार जपतात. मादी दोन वर्षांतून एकदा पोराला जन्म देते. गंमत अशी की, पोर जन्मतःच पोहू शकते.

मग भेटतो आपल्याला एक छोटासा समुद्र. यात रेडिओ-नियंत्रित नौका आहेत. वेगळे तिकिट काढून या नौकांतून फेरफटका मारता येतो.

वायव्येकडल्या कोपऱ्यात प्राणघातक व्हेल व डॉल्फीन यांचा

स्टेडियम आहे. इथे प्रेक्षागृहातल्या बाकांवर बसून, तलावात चालणारी या दोन प्राण्यांची 'लढाई' पाहता येते. अर्धा तास चालणारा हा कार्य-क्रम, सकाळी १०.१६ वाजल्यापासून दर पाऊण तासाने दाखवला जातो. व्हेलचे नाव शामू ठेवण्यात आले असून, डॉल्फीनबरोबरची त्याची लढत मोठी रोमांचकारी होते. व्हेल मुख्यत: ध्रुव प्रदेशांतील समुद्रात सापडतात. नराची लांबी साडेनऊ मीटर असते व वजन भरते जवळजवळ ८,१८१ किलो. मादी मात्र कमाल साडेसात मीटर लांबीची व ४,५४५ किलो वजनाची असते. व्हेल कुटुंब एकत्रित राहूनच प्रवास करते. तर डॉल्फीन नराची लांबी अडीच ते साडेतीन मीटर असून त्याचे वजन असते १४० ते ६४० किलो. हे माणसाळणारे प्राणी असून ते एकत्र कुटुंब पद्धतीने राहतात, फिरतात. असाच नवीन भव्य स्टेडियम 'शामू' या नावाने उभारला जात असून ६० लक्ष गॅलन पाण्याच्या तलावाभोवतीच्या प्रेक्षागृहात ४,६५०० प्रेक्षक बसण्याची सोय केली जात आहे.

या स्टेडियमच्या उजव्या बाजूला उभारलेल्या जपानी गात्रातील छोट्याशा तलावात बुडी मारून एक जपानी तरुणी (ऑर्डर नोंदवणा-ऱ्याला) मोत्याचा शिंपला काढून देते. (हे मोती सवलतीने दिले जातात.) दर अर्ध्या तासाने दहा-दहा मिनिटांनी ही पाणबुडी-प्रात्यक्षिके होतात.

आणखी थोडे उजवीकडे सील व पाणमांजर यांचा स्टेडियम आहे. इथे सील, पाणमांजरे व समुद्रसिंह या जलचर प्राण्यांचे अर्ध्या-अर्ध्या तासाचे प्रयोग दिवसातून सहा वेळा दाखवले जातात. समुद्रसिंह अडीच मीटर लांबीचे असून २८० किलो वजनाचे आहेत. या स्टेडि-यमच्या खालच्या अंगाला फॅन्टसी थिएटर असून इथे समुद्राच्या पोटातील अद्‌भुत जीवनाचे संगीतमय दर्शन घडवणारा २० मिनिटांचा मनोवेधक चित्रपट दाखवतात. अर्ध्याअर्ध्या तासाने हे प्रयोग होतात.

याच्या उजवीकडे १२३ मीटर उंचीचा 'आकाशमनोरा' आहे.

एका स्तंभाभोवती संथपणे गरगर फिरणाऱ्या चक्राकृती विद्युत पाळण्यातून स्तंभाच्या १२३ मीटर उंचीच्या टोकाशी जाता येते. (या प्रवासासाठी वेगळे तिकिट काढावे लागते.) पाळणे गोलगोल फिरत उंच-उंच जातात तेव्हा भोवतालच्या सागर-दुनियेचे नयनरम्य विहंगम दृश्य दिसते. एवढेच नव्हे, तर निरभ्र, निर्मळ आकाश असताना भोवतालच्या ६४ कि. मीटर अंतरापर्यंतचा प्रदेश नजरेला पडू शकतो.

या मनोऱ्याच्या ईशान्येकडे 'शार्क एन्काउंटर' या दालनात, समुद्राच्या पोटातील शार्क माशाची चित्तथरारक झटापट दाखवणारा अर्ध्या तासाचा प्रयोग होतो. तो पाहून मुलांच्या अंगावर रोमांच उभे राहिले नाहीत तरच नवल ! या दालनाच्या उजवीकडे असलेल्या 'नॉटिलस थिएटर'मध्ये तैवानच्या १६ चिनी कसरतपटूंचे कसरतीचे खेळ २० मिनिटे दाखवले जातात. आतापर्यंत जलचर प्राण्यांचे खेळ पाहिल्यानंतर माणसांच्या या कौशल्यपूर्ण कसरती पाहून आपली खूपच करमणूक होते.

या थिएटरच्या दक्षिणेला एक विशाल सरोवर असून त्याच्या खालच्या पश्चिमेकडच्या काठाशी 'अटलांटिस थिएटर' हे प्रेक्षागृह उभारलेले आहे. या सरोवरात चाळीस मिनिटे चालणारे वॉटर-स्कीइंगचे (पाण्यावर उभे राहून वेगाने घसरत जाण्याचे) जल-कसरतीचे खेळ या प्रेक्षागारात बसून आपल्याला पाहता येतात. यांत्रिक होडीच्या मागच्या टोकाशी बांधलेला दोर हाती धरून, त्या यंत्रनौकेच्या वेगाबरोबर, तोल सावरीत कसरतपटू स्त्री-पुरुष पाण्यावरून घसरत जातात. हा दोर कधी-कधी पायाच्या बोटातही घट्ट धरला जातो. अर्थात त्यावेळी एकाच पायावर घसरत जाण्याचे कसब साधावे लागते. घसरत जाणारे कसरतपटू काही वेळा मधे मुद्दाम निर्माण करण्यात आलेले अडथळे उंच उडी मारून शिताफीने ओलांडून, तर कधी उलटचा-सुलटचा कोलांटउड्या मारून जे अप्रतिम कौशल्य दाखवतात ते पाहून आपण अक्षरश: थक्क होतो. सर्वांत आश्चर्यकारक खेळ होतो तो बारा स्त्री-पुरुषांच्या उंच पिरॅमिडचा. यंत्रनौकेचा दोर धरून, एकमेकांच्या

आधाराने उभे राहिलेले सहा पुरुष. त्यांच्यातल्या तिघा-तिघांच्या खांद्यावर उभ्या राहिलेल्या दोन-दोन स्त्रिया आणि त्या दोघी-दोघींच्या खांद्यावर उभी राहिलेली एकेक स्त्री असे हे दोन बाजूंना दोन पिरॅमिड्स सावरीत, यंत्रनौकेबरोबर, तिच्या पाठोपाठ वेगाने पाण्या-वरून शिताफीने घसरत जाणाऱ्या बाराजणांच्या त्या गटाने यशस्वीपणे फेरफटका पुरा केला, तेव्हा सबंध प्रेक्षागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. प्रेक्षागारात बसायला जागा मिळाली नाही, तर अनेक लोक जवळपासच्या काठावरच्या उद्यानात वगैरे बसून हे खेळ पाहतात. आम्हांलाही असेच कुठेतरी बसावे लागले होते. ते रोमांचकारी खेळ पाहून त्या कसरतपटूंची धन्यधन्य वाटली! हे कसरतपटू रंगीबेरंगी, वेलबुट्टयांचे कपडे पेहरत असल्याने त्यांची कसरत पाहून डोळ्यांचे अक्षरशः पारणे फिटले.

डॉल्फीन माशांच्या स्टेडियममधेही त्यांचा खेळ अत्यंत कौतुका-स्पद वाटला. गब्दुल, गोलसर अंगाचे हे थोराड ढब्बू मासे डौलदारपणे अंग वाकवून, पाण्यावर साडेचार ते सहा मीटर उंचीवर शिताफीने उड्या मारायचे. जोडीनेही दोघे अशाच उड्या मारतात. शिवाय पाठीवर व मुस्करीवर शिक्षक किंवा शिक्षिकेला डौलाने घेऊन तोल सावरण्याचे या डॉल्फीनचे कसब वाखाणण्यासारखे होते. त्यांच्या कौतुकास्पद कामगिरीचे बक्षीस म्हणून की काय, शिक्षक त्यांना अधून-मधून बादलीभर बारीक मासे खायला घालायचे. म्हणजे काय,— चक्क एकेका डॉल्फीनच्या सताड उघडलेल्या घशात ओतायचे. ते भरघोस खाद्य गपकन गिळून तो डॉल्फीन सहजपणे आपल्या पुढच्या कामगिरीला लागायचा. एखादा डॉल्फीन, शिक्षकाच्या सूचनेप्रमाणे तलावाच्या काठाशी येऊन, तोंड वासून, एखाद्या लहान मुलाकडून चारदोन मासे भरवून घ्यायचा त्या मुलाकडून आपल्या माथ्यावरून हात फिरवून घ्यायचा. असे हे मासे बुद्धिवान तसेच समजदार असल्याचे सिद्ध होई.

एका तळ्यात फिरणाऱ्या थोराड सील प्राण्यांना बारीक मासे (स्टॉलवर विकत घेऊन) खायला घालायची मुभा ठराविक वेळी

मुलांना दिली जाते. सील काठाशी आला, की मुले आपल्या हातातले छोटे मासे त्याच्या तोंडात घालायचे. तो घास मटकावीत तो सील पुढे पोहत जायचा. अंगभर लोकर असलेला दक्षिण अमेरिकी सील मासा खास करून पाहण्यासारखा आहे. इतर माशांची आणखीही अशी तळी आहेत

'शार्क एन्काउंटर' या दालनाजवळच ९१०.८० किलो वजनाच्या व पावणेपाच ते पाच मीटर लांबीच्या शिकारीचे भक्ष्य बनलेला व बर्फात गोठलेला एक प्रचंड शार्क मासा एका खोलीत प्रदर्शनार्थ मांडलेला आहे.

अशी ही विविध मनोरंजक व नयनरम्य गोष्टींनी भरलेली सागरी दुनिया पाहून, विशेषत: मुले हरखून जाऊन तृप्त होऊन बाहेर पडतात.

एकदा प्रवेशमूल्य भरल्यावर सकाळी ९ वाजल्यापासून संध्याकाळी ७ वाजेपर्यंत या सागर-दुनियेचा प्रवास करता येतो. (संध्याकाळची वेळ उन्हाळ्याच्या व सुटीच्या दिवसांत रात्री १० पर्यंत वाढवण्यात येते.) मध्येच या दुनियेबाहेर जाऊन त्याच दिवशी मागाहून परत येण्याची इच्छा असली तर बाहेर जाताना हातावर शिक्का मारून घ्यावा लागतो. तो पाहून त्या दिवसापुरता पुन्हा प्रवेश दिला जातो.

या सागर-दुनियेत ठिकठिकाणी उपाहारगृहे, प्रसाधनगृहे, भेटवस्तूंची दुकाने अशा विविध सोयी आहेत. समुद्रातील माशांचे खाद्य पदार्थ पुरवणारे खास उपाहारगृह आहे, तसेच समुद्रातील विविध शिंपल्यांच्या भेटवस्तूंचे खास दुकानही आहे. या सागरी-दुनियेत कुठे काय पाहता येईल, याचे मार्गदर्शन करणारा नकाशा त्रोटक माहितीसह प्रवेशद्वारापाशी असलेल्या माहितीकेंद्रात मिळू शकतो. आठवड्याचा किंवा वर्षभराचा सवलतीचा पासही हवा तर मिळतो.

मुलांच्या (आणि काही प्रमाणात मोठ्या माणसांच्याही) ज्ञानात व अनुभवात भरघोस भर घालणारी ही सागरी दुनिया पाहण्यासाठी विशेषत: सुटीच्या दिवसांत छोट्या-मोठ्यांची खूप गर्दी होते.

✻ ✻

# शिकागोतील सुंदर बहाई प्रार्थना मंदिर

'जगातले सर्व धर्म समान असून सर्व धर्मांतील मूलतत्त्वे सारखी आहेत. तसेच सर्व वंश समान असून मानव जात तेवढी एक आहे. आणि जगन्नियंता परमेश्वर एकच आहे.' अशी शिकवण देणारा बहाई पंथ एकोणिसाव्या शतकात बहाउल्ला यांनी स्थापन केला. या पंथाच्या निष्ठावंत अनुयायांनी, आपल्या पथाची शिकवण देण्यासाठी अमेरिकेतल्या शिकागोच्या विलमेट या उपनगरात बहाई प्रार्थना-मंदिर उभारले आहे. सर्व धर्मांच्या व वंशांच्या लोकांनी या मंदिरात एकत्र येऊन परमेश्वराची उपासना करावी, असा हेतू या मंदिरस्थापनेमागे आहे.

बहाई पंथ हा जगातला सर्वांत नवीन आहे. १८१७ मध्ये एका संपन्न घराण्यात जन्मलेल्या बहाउल्ला यांना त्याच्या वेगळ्या शिकवणुकीपायी हद्दपारी, तुरुंगवास व इतर छळ सोसावा लागला. माणसाच्या परमेश्वरावरच्या प्रेमाला नव्याने प्रज्वलित करण्याचे धर्मकार्य त्यांनी चिकाटीने आयुष्यभर केले. १८९२ मध्ये त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या मरणसमयी जगातल्या ३४० देशांत बहाई पंथाचा कमी-अधिक प्रसार झालेला होता. प्रारंभी दिलेल्या मुख्य शिकवणुकीखेरीज; बहाई पंथाने आधुनिक मानवाला काही मार्गदर्शक सूत्रे सादर केली आहेत, ती अशी–

(१) सत्याचा शोध स्वतंत्रपणे घ्यावा. (२) विज्ञान व धर्म यांचा सुसंवाद साधावा. (३) स्त्री-पुरुषांमध्ये समानता असावी. (४) सक्तीचे सार्वत्रिक शिक्षण असावे. (५) आर्थिक समस्या सोडविण्यासाठी आध्यात्मिक तोडगा अवलंबावा. (६) जागतिक स्वरूपाची साहाय्यक

मुलांना दिली जाते. सील काठाशी आला, की मुले आपल्या हातातले छोटे मासे त्याच्या तोंडात घालायचे. तो घास मटकावीत तो सील पुढे पोहत जायचा. अंगभर लोकर असलेला दक्षिण अमेरिकी सील मासा खास करून पाहण्यासारखा आहे. इतर माशांची आणखीही अशी तळी आहेत

'शार्क एन्काउंटर' या दालनाजवळच ९१०.८० किलो वजनाच्या व पावणेपाच ते पाच मीटर लांबीच्या शिकारीचे भक्ष्य बनलेला व बर्फात गोठलेला एक प्रचंड शार्क मासा एका खोलीत प्रदर्शनार्थ मांडलेला आहे.

अशी ही विविध मनोरंजक व नयनरम्य गोष्टींनी भरलेली सागरी दुनिया पाहून, विशेषत: मुले हरखून जाऊन तृप्त होऊन बाहेर पडतात.

एकदा प्रवेशमूल्य भरल्यावर सकाळी ९ वाजल्यापासून संध्याकाळी ७ वाजेपर्यंत या सागर-दुनियेचा प्रवास करता येतो. (संध्याकाळची वेळ उन्हाळ्याच्या व सुटीच्या दिवसांत रात्री १० पर्यंत वाढवण्यात येते.) मध्येच या दुनियेबाहेर जाऊन त्याच दिवशी मागाहून परत येण्याची इच्छा असली तर बाहेर जाताना हातावर शिक्का मारून घ्यावा लागतो. तो पाहून त्या दिवसापुरता पुन्हा प्रवेश दिला जातो.

या सागर-दुनियेत ठिकठिकाणी उपाहारगृहे, प्रसाधनगृहे, भेटवस्तूंची दुकाने अशा विविध सोयी आहेत. समुद्रातील माशांचे खाद्य पदार्थ पुरवणारे खास उपाहारगृह आहे. तसेच समुद्रातील विविध शिंपल्यांच्या भेटवस्तूंचे खास दुकानही आहे. या सागरी-दुनियेत कुठे काय पाहता येईल, याचे मार्गदर्शन करणारा नकाशा त्रोटक माहितीसह प्रवेशद्वारापाशी असलेल्या माहितीकेंद्रात मिळू शकतो. आठवड्याचा किंवा वर्षभराचा सवलतीचा पासही हवा तर मिळतो.

मुलांच्या (आणि काही प्रमाणात मोठ्या माणसांच्याही) ज्ञानात व अनुभवात भरघोस भर घालणारी ही सागरी दुनिया पाहण्यासाठी विशेषत: सुटीच्या दिवसांत छोट्या-मोठ्यांची खूप गर्दी होते.

* *

# शिकागोतील सुंदर बहाई प्रार्थना मंदिर

'जगातले सर्व धर्म समान असून सर्व धर्मांतील मूलतत्त्वे सारखी आहेत. तसेच सर्व वंश समान असून मानव जात तेवढी एक आहे. आणि जगन्नियंता परमेश्वर एकच आहे.' अशी शिकवण देणारा बहाई पंथ एकोणिसाव्या शतकात बहाउल्ला यांनी स्थापन केला. या पंथाच्या निष्ठावंत अनुयायांनी, आपल्या पंथाची शिकवण देण्यासाठी अमेरिकेतल्या शिकागोच्या विलमेट या उपनगरात बहाई प्रार्थना-मंदिर उभारले आहे. सर्व धर्मांच्या व वंशांच्या लोकांनी या मंदिरात एकत्र येऊन परमेश्वराची उपासना करावी, असा हेतू या मंदिरस्थापनेमागे आहे.

बहाई पंथ हा जगातला सर्वांत नवीन आहे. १८१७ मध्ये एका संपन्न घराण्यात जन्मलेल्या बहाउल्ला यांना त्यांच्या वेगळ्या शिकवणुकीपायी हद्दपारी, तुरुंगवास व इतर छळ सोसावा लागला. माणसाच्या परमेश्वरावरच्या प्रेमाला नव्याने प्रज्वलित करण्याचे धर्मकार्य त्यांनी चिकाटीने आयुष्यभर केले. १८९२ मध्ये त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या मरणसमयी जगातल्या ३४० देशांत बहाई पंथाचा कमी-अधिक प्रसार झालेला होता. प्रारंभी दिलेल्या मुख्य शिकवणुकीखेरीज; बहाई पंथाने आधुनिक मानवाला काही मार्गदर्शक सूत्रे सादर केली आहेत, ती अशी—

(१) सत्याचा शोध स्वतंत्रपणे घ्यावा. (२) विज्ञान व धर्म यांचा सुसंवाद साधावा. (३) स्त्री-पुरुषांमध्ये समानता असावी. (४) सक्तीचे सार्वत्रिक शिक्षण असावे. (५) आर्थिक समस्या सोडविण्यासाठी आध्यात्मिक तोडगा अवलंबावा. (६) जागतिक स्वरूपाची साहाय्यक

भाषा असावी. (७) जागतिक शासन अवलंब जागतिक शांतता प्रस्थापित करावी.

बहाई पंथामार्फत व्यक्तिगत आध्यात्मिक मार्गदर्शनही केले जाते. जीवनाचे उद्दिष्ट काय ? परमेश्वराशी जवळीक कशी साधता येईल ? मृत्यूनंतर जीवन संभवते काय ? –अशा प्रश्नांची उत्तरे बहाई वाङ्मयात दिलेली आहेत.

प्रार्थनामंदिराच्या घुमटाखालच्या भव्य सभागृहात मंडलाकार खुर्च्या मांडलेल्या आहेत. तिथे दर रविवारी दुपारी तीन वाजता भक्तिपर उपासना चालते. प्रार्थना, ध्यान आणि बहाई पंथाच्या व इतर प्रमुख धर्मग्रंथांतील निवडक उताऱ्यांचे वाचन एवढेच येथे चालते. प्रवचनांना व व्याख्यानांना येथे मुभा नाही. इथे नसतो कुणी पुरोहित वा पाद्री वा मौलवी, नसतो कसला काही धर्मविधी.

एरवी येथे सभा, परिचयवर्ग किंवा अनौपचारिक मेळावे भरतात. हे प्रार्थनामंदिर वर्षभर रोज खुले असते.

अमेरिकेत प्रथम शिकागो येथे बहाई पंथाला अनुयायी लाभले. त्यांच्यातल्या मूठभर लोकांनी या भागात प्रार्थनामंदिर उभारण्याची कल्पना काढली. निश्चित योजना ठरताच अनेक वास्तुशास्त्रज्ञांनी प्रार्थनामंदिराच्या संभाव्य इमारतीच्या नमुन्यांचे आराखडे सादर केले. त्या सर्वजणांतल्या लुई बॉर्जाइस या फ्रेंच-कॅनडियन वास्तुशास्त्रज्ञांचा नमुना विशेष आकर्षक होता. उत्तर अमेरिकेतल्या बहाई पंथीयांच्या प्रतिनिधींनी तो एकमताने पसंत केला.

बॉर्जाइसनं १९०९ मध्ये मंदिराच्या नमुन्यावर काम करायला सुरुवात केली. पण तो त्याच्या मनासारखा जमायला तब्बल आठ वर्षे लागली. त्याने घटेच्या आकाराचे मंदिर योजले. पण कागदावर त्यांचा नीटसा आराखडा काही त्याला काढता येईना. म्हणून त्याने प्लॅस्टरमध्ये नमुना घडवला.

पुढे १९२० मध्ये मंदिर उभारण्याच्या प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाला नामवंत वास्तुशिल्पकार जॉन इयर्ली याने बिलोरी काच व पांढरे सिमेंट यांच्या मिश्रणानं खास तऱ्हेचे काँक्रीट, नक्षीदार कलाकुसरीसाठी बनविले. वॉशिंग्टन (डी. सी.) नजीकच्या इयर्लीच्या शिल्पशाळेत बनवलेले एकेक भाग विल्मेट येथे पोचवण्याच्या कामी कालापव्यय बराच झाला. मंदिराचा पोलादाचा सांगाडा १९३१ मध्ये उभारून पूर्ण झाला. त्यावर हे नक्षीदार भाग लटकावून नीट जोडण्यात आले. घुमटाच्या केवळ आतल्या भागासाठी ३८७ तुकड्यांची जोडणी करावी लागली.

अशा प्रकारे, टप्प्या-टप्प्याने काम होता-होता, मंदिराची पूर्ण उभारणी होईपर्यंत १९५३ साल उजाडले. म्हणजे कल्पना योजल्यापासून ती प्रत्यक्ष कृतीत उतरेपर्यंत तब्बल अर्धशतक लागले. प्रार्थनामंदिर पूर्ण झाल्यावर मात्र जगभरच्या जाणत्या लोकांनी त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. पुढे १९७८ मध्ये तर ऐतिहासिक स्थळांसंबंधीच्या अमेरिकेच्या राष्ट्रीय दप्तरात, ' राष्ट्राच्या सांस्कृतिक साधनसंपत्तीतला जतन करण्यायोग्य असा एक ठेवा ' अशी नोंद करण्यात आली.

प्रार्थनामंदिराच्या आवारात पाऊल टाकले म्हणजेच भोवतालच्या पद्धतशीर रचना केलेल्या रम्य उपवनाच्या दर्शनाने आपले नेत्र सुखावतात; आणि प्रसन्न मनानं आपण मंदिरात प्रवेश करतो. १२०० खुर्च्या असलेल्या सभागृहाच्या शांत–निवांत दालनात गेल्यावर सभोवारची नक्षीदार कलाकुसर पाहतपाहत आपली नजर वरच्या सुमारे ४२ मीटर उंचीच्या घुमटाकडे वळते. जाळीदार नक्षीतून चहू बाजूंनी आत झिरपणाऱ्या प्रकाशाने आतले वातावरण प्रसन्नतेने भरून गेल्यासारखे वाटते. घुमटाच्या आतल्या माथ्याशी, सर्वशक्तिमान परमेश्वराचे स्तवन करणारे वाक्य अरबी लिपीत लिहिलेले आहे. त्याचा अर्थ आहे– ' हे तेजोनिधी, तुला प्रणिपात असो ! '

सभागृहात सभोवती फिरताना, वरच्या नऊ कोनाड्यांत बहाउल्ला यांची नऊ वचने आपल्याला वाचायला मिळतात. प्रत्येक बहाई प्रार्थना

मंदिराला नऊ बाजू योजलेल्या असतात. कारण नऊ हा सर्वांत मोठा एक-अंकी आकडा असून तो बहुव्यापकता, एकत्व व ऐक्य यांचं प्रतीक गणला जातो. म्हणून या प्रार्थना गृहाला नऊ द्वारे व भोवताली नऊ स्तंभ योजलेले आहेत. ही दोन्ही देखणी आहेत. घुमटाचा बाहेरचा भाग व त्यावरच्या कमानी नक्षीदार कलाकुसरीने नटलेल्या आहेत. प्रत्येक स्तभाच्या पायथ्याजवळ स्वस्तिक चिन्ह असून ते हिंदू, पारशी व बौद्ध धर्मांचे प्रतीक आहे. स्वस्तिक चिन्हाच्या वरच्या बाजूला ज्यूंचा डेव्हिड–तारा, ख्रिश्चनांचा क्रॉस आणि इस्लामची तारायुक्त चंद्रकोर आहे. या सर्व चिन्हांच्यावर बहाई पंथाचे निदर्शक असं नऊ पाकळ्यांचे पुष्प आहे.

प्रार्थना गृहाच्या बाहेर भोवताली फिरताना नऊपैकी प्रत्येक द्वाराच्या माथ्याबर कोरलेले बहाउल्लांचे एकेक वचन आपल्याला दिसते.

मुख्य प्रवेशद्वारापाशी असलेल्या लहानशा जिन्याने खाली तळघरात गेले म्हणजे आपल्याला अतिथिगृह आढळते. तेथे आपल्याला, या प्रार्थना मंदिरांची उभारणी कशी झाली आणि ती होण्यामागे कुणाकुणाची निष्ठा व मदत कारणीभूत झाली याचे निदर्शन करणारी चित्रमालिका पडद्यावर पाहता येते· बहाई पंथाची शिकवण, पंथाचा कारभार व इतिहास यांच्याबद्दलची माहिती पुरविणारे चित्रमय प्रदर्शनही येथे आपल्याला बघायला मिळते. शिवाय वाचनालयात बसून त्यासंबंधाची पुस्तकेही वाचता येतात. स्वयंसेवकांशी गप्पा मारून चर्चाही करता येते. बहाई धर्मपंथावरची पुस्तके, छोटया पुस्तिका व चित्र–कार्डे हवी तर खरीदताही येतात. मंदिराच्या साऱ्या वास्तूत सगळीकडे स्वच्छता व नेटकेपणा दिसला.

अशा या प्रार्थना गृहाच्या शांत निःस्तब्ध निवांत वातावरणातून आपण प्रसन्न चित्तानं बाहेर पडतो.

आम्ही गेलो, तेव्हा जुलै महिना म्हणजे तिकडचा उन्हाळ्याचा काळ असल्याने मंदिर पहाण्याच्या बाबतीत आम्हाला कसलाही व्यत्यय आला नाही. सर्व काही सुरळीतपणे पाहता आले.

❋ ❋

# ब्रुकफील्ड प्राणीसंग्रहालय

अमेरिकेत सार्वजनिक स्वरूपाच्या गोष्टी एकाहून एक भव्य, अफाट प्रमाणात उभारण्याची जिद्द दिसून येते, याची प्रचिती अमेरिकेच्या प्रवासात आली. वॉशिंग्टनमधील अंतराळ आणि विज्ञान संग्रहालय, राष्ट्रीय चित्रकला संग्रहालय (नॅशनल आर्ट गॅलरी) वॉशिंग्टन स्मारक मनोरा, शिकागोमधील चित्रकला आणि कला-वस्तू संग्रहालय, मत्स्यालय, उंचीच्या बाबतीत जागतिक उच्चांक निर्माण करणाऱ्या न्यूयॉर्कमधील एम्पायर स्टेट बिल्डिंग व वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि त्यांच्याहूनही अधिक उंची गाठणारा शिकागोमधील सीअर्स टॉवर (मनोरा) डेट्रॉइटमधला (माथ्यावर भव्य फिरते उपाहारगृह असलेला) रिनेनन्स टॉवर. प्रचंड स्टेडियम अशा कैक गोष्टी, त्यांच्यातलेच एक शिकागोजवळचे हे ब्रूकफील्ड प्राणी संग्रहालय, तब्बल दोनशे एकरांहून जास्त भूमी व्यापणारे, अफाट स्वरूपाचे, जगातल्या नाना देशांतल्या शेकडो वन्य पशूंचा, तसच पक्ष्यांचा व जलचर प्राण्यांचा मुबलक संग्रह करणारे. एकपरी प्राण्यांची ही एक नगरीच आहे.

सर्व प्राण्यांची त्यांच्या नैसर्गिक वातावरणात राहण्याची सोय करणे हे या प्राणी संग्रहालयाचे आणखी एक वैशिष्टच. हिंस्र पशूंच्या वसतिस्थानांबाहेर जलमय खंदकांची योजना करण्यात आली आहे. या खंदकाच्या अलीकडे उभे राहून प्रेक्षक त्यांचे निरीक्षण करीत असल्याने अर्थातच त्या प्राण्यांचा उपद्रव प्रेक्षकांना होत नाही. (आपल्याकडे हैदराबादला नेहरू प्राणी संग्रहालयात हिंस्र पशूंना नैसर्गिक वातावरणात ठेवण्याची व्यवस्था केलेली आढळते. पण प्राण्यांची संख्या व

त्यांच्या वसतिस्थानांच्या जागा ब्रूकफील्ड प्राणी संग्रहालयाच्या मानाने कितीतरी आटोपशीर आहेत.)

या प्राणी संग्रहालयाचे 'वायव्य प्रदेश' व 'नैर्ऋत्य प्रदेश' असे दोन विशाल टापू असून 'ईशान्य प्रदेश' व आग्नेय प्रदेश' असे इतर दोन त्यामानाने कमी विशाल टापू आहेत, या सगळ्या टापूंत मिळून २४ भव्य प्रेक्षणीय दालने आहेत. हे प्राणी संग्रहालय नीट पाहायचे झाल्यास एक पूर्ण दिवस काही पुरे पडणार नाही. शिवाय एकूण अफाट क्षेत्रात पायपीट करायची तर पाय मेटाकुटीला येतात, तेव्हा एकेक टप्पा पाहून झाल्यावर थोडी विश्रांती घेऊन पुढच्या टप्प्याकडे वळणे इष्ट ठरते.

दक्षिण दरवाजा व उत्तर दरवाजा अशी दोन प्रवेशद्वारे या प्राणी संग्रहालयाला आहेत. त्यांपैकी उत्तर प्रदेश द्वारापासून जवळच 'डिस्क-व्हरी सेंटर' (शोध केन्द्र) आहे. तिथे २७ सिनेयंत्रांच्या साहाय्याने या प्राणि संग्रहालयातल्या ठळक-ठळक दालनांतल्या निवडक प्रेक्षणीय गोष्टींचे ओझरते चित्र दर्शन १५ मिनिटे घडवले जाते. म्हणजेच एकंदर प्राणिसंग्रहालयाचा त्रोटक परिचय प्रेक्षकांना सुरुवातीलाच करून दिला जातो, त्यामुळे आपल्याला मार्गदर्शन होते. कोणकोणत्या प्राण्यांची दालने आहेत, याचे मार्गदर्शन करणारा नकाशाचा फोल्डरही इथे मिळतो.

मोटारी व वाफेच्या इंजिनाच्या रेल्वेगाडीतून प्राणिसंग्रहालयाचा सुमारे तीन किलोमीटरचा फेरफटका मारता येतो. पण प्रवासात केवळ खुल्या दालनाचे अन् तेही दुरून दर्शन घडते. बंदिस्त इमारतीतली दालने तर प्रत्यक्ष आत जाऊनच पाहावी लागतात. विविध प्राण्यांच्या हालचाली त्यांच्या राहण्या-वागण्याच्या पद्धती न्याहाळून पाहायच्या तर त्या गोष्टींचं जवळूनच दर्शन घेणे भाग आहे.

वायव्य प्रदेशातल्या उत्तरेच्या टापूत याक, आफ्रिकी, सांबर, युरोपियन रानबैल, झेब्रा, दुर्मिळ होत चाललेल्या हरणाच्या जाती, असे

विविध प्राणी मोकळेपणाने हिंडताना दिसतात. जिराफ ' जिराफगृह ' या स्वतंत्र दालनात ठेवलेली आहेत. अंगभर दाट लोकर असलेला उत्तर ध्रुवावरील कोल्हा खडकाळ भागातल्या गुहेत कसा राहतो हे आपल्याला प्रत्यक्ष पाहायला मिळते.

' ऑस्ट्रेलिया गृह ' या दालनात कांगारू आणि अस्वलासारखी दिसणारी पण कांगारूसारखी पोटाच्या पिशवीत आपली इवलाली वछडी सांभाळणारी कोम्बॅट जनावरे आपल्याला आढळतात. ' टास्मानियन डेव्हिल ' नावाचा प्राणीही येथे पाहायला मिळतो. तर ' पॅकीडर्स गृहात हत्ती, गेंडे, व अमेरिकी रानडुकरे अशी कमी अधिक जाड कातडीची जनावरे वेगवेगळ्या दालनांत पाहायला मिळतात. याच गृहातल्या पूर्वे-कडच्या रिंगणात ठराविक वेळी हत्तीची प्रात्यक्षिके दाखविली जातात, धिप्पाड देहाच्या हत्तीच्या अंगाची चपळाई व बुद्धिमत्ता या प्रात्यक्षि-कात दिसून येते. ती पाहून आपल्याला अचंबा वाटतो.

नैर्ऋत्येच्या प्रदेशात सप्तसागराच्या देखाव्यात डॉल्फिन माशांचा तलाव असून त्या भोवतालच्या काचेच्या खिडक्यांतून त्यांचे उंच उड्यांचे नाना तऱ्हेचे खेळ (ठराविक वेळी) पाहता येतात. दुसऱ्या एका दालनात असंख्य माशांचे मत्स्यालय आहे. समुद्र सिंह, सील, वॉलरस या प्राण्यांचेही वेगवेगळे तलाव आहेत.

या प्राणिसंग्रहालयात एकूण १२५ जातींचे पक्षी असून त्यातले हंस, बदक, पेंग्विन व किवी यांसारखे पक्षी तळ्यात विहरतात, तर किंगफिशर (खंड्या) व हम्मिंग बर्डस झाडांवर बसलेले किंवा हिंडत असलेले दिसून येतात.

याच प्रदेशात सरपटत्या प्राण्यांचे वेगळे दालन आहे. मोठाले कासव, मगरी, सरडे, साप, विंचू, मोठाला कुसाळ विषारी कोळी असे नाना तऱ्हेचे सरपटते प्राणी एकेका दालनात आपल्याला पाहायला मिळतात.

बबून जातीच्या माकडांचं एक स्वतंत्र बेट आहे. त्यावर या

माकडांचा कळप राहतो तर सैबेरियन रानबोकड डोंगर कपारीतल्या उतारांवर स्वच्छंदपणे वागडताना दिसतात.

लांडग्यांसाठी त्यांच्या सरावाचं स्वतंत्र विस्तृत रान आहे.

याच टापूत आफ्रिकी आशियाई व दक्षिण अमेरिकी उष्ण कटिबंधीय पावसाळी जंगलांची नव्याने उघडलेली उंचच उच दालने आहेत. या दालनांच्या इमारतीएवढी उंच इमारत जगात दुसऱ्या कोणत्याही प्राणिसंग्रहालयात नाही. आफ्रिकी अरण्य-दालनात गोरिला, माकड, वानर, दुर्मिळ पक्षी व ठेंगणे पाणघोडे, तळी, धवधबे, उंच झाडे आणि अधून मधून पाडण्यात येणाऱ्या 'पावसाच्या सरी' यांच्यात खुशाल हिंडताना आढळतात. गोरीला नर अनेक माद्यांसह राहतो.

आशियाई अरण्य दालनात गिविन व ओरँग अँटी जातीचे वानर, माकडे, नाना तऱ्हेचे पक्षी, पाणमांजरं पावसाळी वातावरण, दलदल, भाताची शेतं, वटवृक्ष या आपल्या सरावाच्या नैसर्गिक वसतिस्थानात मजेत राहिलेले दिसतात. गिवन वानरे तर आरडाओरडा करीत झाडांच्या फांद्यांवरून झोके घेत उड्या मारतात, तर ओरँग वानरांनी डहाळ्यांची पाने व डहाळ्यांची घरटी झाडांवर बांधलेली आहेत या वानरांचे हात त्यांच्या तंगड्यांच्या दुप्पट लांब असतात.

दक्षिण अमेरिकी दालनातील अरण्यात वेगवेगळ्या जातींचे वानर, रानडुकरे आणि मॅकॉ जातीचे, लांब शेपटाचे गुबगुबीत पोपट इतर अनेक प्राण्यांबरोबर राहात असलेले आढळतात. कॉलॉबस जातीचे वानर झाडांच्या उंच उंच फांद्यांवर जाऊन बसतात.

दक्षिण अमेरिका, आफ्रिका व आशिया या खडाच्या उष्ण कटिबंधातील पावसाळी अरण्यातील हवामान तसे सारखेच आहे. तरीसुद्धा या प्रत्येक अरण्यातली झाडे व प्राणी दोन्ही पूर्णपणे वेगवेगळी आहेत या सर्वच अरण्यांत विविध जातींची वानरे व माकडे बहुसंख्येने आढळतात. (या अरण्यात पाऊस दिवसातून कमीत कमी तीन वेळा पडतो, म्हणजेच या भागातल्या पावसाचं प्रमाण बरेच असल्यामुळे या टापूतल्या

अरण्यांना 'पावसाळी अरण्ये' म्हणतात.) झाडे जशी कमी–अधिक उंच, जाड व वेगवेगळ्या जातींची तसेच वानरां-माकडांसारखी जनावरे वेगवेगळ्या आकाराची, रंगाची व वागणुकीची आढळतात.

ही अरण्ये व त्याबरोबरच त्यातले प्राणी, स्वार्थी माणसांनी चालवलेल्या झाडतोडीच्या सत्रापायी दिवसेंदिवस कमी-कमी होऊ लागली आहेत. हे सत्र असेच चालू राहिले तर इ. स. २००० पर्यंत या अरण्यांचा जवळजवळ एक–तृतीयांश भाग नष्ट होईल, अशी भीती आहे.

या प्राणिसंग्रहालयाच्या ईशान्य प्रदेशात सिंहगृह म्हणून टापू आहे. त्यातल्या वेगवेगळ्या दालनांत सिंह, वाघ, चित्ते, हिमचित्ते, मोठाली रानमांजरे अशी हिंस्र जनावरे राहतात. सिंहगृहाला अलीकडेच जोडलेल्या नवीन दालनात उ. आफ्रिकेतल्या सहारा वाळवंटाचं दृश्य, उ. अमेरिकेतल्या रॉकी पर्वताचा सुळका,. हिमालय पर्वतातली खिंड, ब्राझील पावसाळी अरण्ये, मलेशियातला निर्मळ ओढा हे देखावे आपलं चित्त वेधून घेतात.

अरण्यांची ही उंच दालने वरपर्यंत पाहण्यासाठी जिना चढून जावे लागते.

त्यानंतर आपण प्रवेश करतो आग्नेय प्रदेशात. तेथे रॉकी पर्वताच्या धोकेबाज कडेकपारीत राहणाऱ्या विशिष्ट जातीच्या चपळ मेंढ्या निश्चितपणे चरताना दिसतात. याशिवाय ध्रुवप्रदेशीय, कोडियाक, स्लॉथ (झाडावर उलट टांगून घेणारी) अस्वलं निसर्गत: आपापल्या परी कसकशा जागी राहतात–वावरतात याचे दर्शन घडते. तर जवळच्या एका छोट्या दालनात नाना प्रकारची वाघळे, साळींदर, उलट्या प्रकाशयोजनेच्या साहाय्यानं दाखवलेली आहेत.

या प्राणिसंग्रहालयात 'मुलांचे प्राणिसंग्रहालय असा एक पोटभाग आहे. त्यात घरगुती पाळीव व काही अमेरिकी वन्य पशूही आहेत. इथं मुलांच्या करमणुकीसाठी काही गमतीचे खेळही योजलेले आहेत. उदा. एका यंत्रात ठराविक नाणं टाकून चिकणमातीचा गोळा सारायचा. मग

ठराविक कळ दाबायची म्हणजे ठराविक प्राण्याच्या आकारात तो मातीचा गोळा बाहेर पडतो. एका रिंगणात विविध प्राण्यांचे कसरतीचे खेळही दाखविले जातात. त्यात बोकडाचा दोन पायांवरचा नाच व बास्केट बॉल खेळणारा डुक्कर आपली खूप करमणूक करतात.

कुत्र्यांना कसं शिक्षण दिलं जातं, याची प्रात्यक्षिकं बघण्यासारखी असतात. मेंढ्या राखणं, गाडी ओढणं, आंधळ्या वा बहिऱ्या माणसांना मार्गदर्शन करणे या गोष्टी शिकतात. मुलांच्या प्राणिसंग्रहालयात जाण्यासाठी लागणाऱ्या अल्प प्रवेश मूल्यांखेरीज वेगळे मूल्य या खेळां-साठी द्यावे लागत नाही.

ब्रूकफील्ड संग्रहालयात शेकडो जातींचे विलक्षण प्राणी आहेत त्यांच्यातल्या काहींची गमतीदार माहिती मिळाली ती अशी :

आल्गा नावाचा वॉलरस आहे, त्याला खाद्यासाठी सर्वांत जास्त खर्च येतो. दरसाल तब्बल १४ हजार डॉलर्सचे (सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचे) कच्चे मासे वगैरे याला खायला घालावे लागतात.

एचिडना हा सस्तन जातीचा प्राणी असूनही त्याची मादी अंडी घालते. ऑस्ट्रेलिया गृहात हा प्राणी आहे.

सर्वांत मोठा सरपटणारा प्राणी आहे सुमारे १८१ किलोग्रॅम वजनाचा भला मोठा कासव.

सर्वांत जास्त वेगानं उडणारा पक्षी आहे. पक्षीगृहातला ह्मिंग बर्ड. मागच्या मागं उडू शकणारा हा एकमेव पक्षी.

या प्राणिसंग्रहालयात सर्वांत जास्त संख्या आहे, पाठीवर तेरा रेषा असलेल्या खारींची, अशा शेकडो खारी प्राणिसंग्रहालयात हुंदडत असलेल्या दिसतात.

प्रेक्षकांनी कोणत्याही प्राण्याला कोणत्याही प्रकारचे खाद्य घालू नये, अशी सूचना ठिकठिकाणच्या फलकांवर लिहिलेली आहे. सर्व प्राण्यांना ठराविक वेळी, त्यांचं त्यांचं नेहमीचं पोषक असं पुरेसं खाद्य

घालण्यात येतं. अशा स्थितीत त्यांना. शेंगदाणे, पाव किंवा इतर गोड खाद्य पदार्थ प्रेक्षक अधूनमधून घालत राहिले, तर त्या प्राण्याची प्रकृती बिघडते असा इशारा देण्यात आला आहे.

चार हजारांहून जास्त प्रकारची निसर्गविषयक पुस्तकं असलेलं ग्रंथविक्रीचं दुकानही एके ठिकाणी आहे.

अमेरिकेत बहुतेक सर्व सार्वजनिक प्रेक्षणीय स्थळांच्या जागी अपंगांसाठी चाकांच्या खुर्च्या भाड्यानं पुरविल्या जातात. तशी सोय येथेही केलेली आहे. खाद्यपदार्थ व पेये मिळण्याची सोय तर अनेक ठिकाणी केलेली आहे. शिवाय विश्रांतीगृहं व प्रसाधनगृहंही टप्प्या–टप्प्यावर आहेतच. या प्राणिसंग्रहालयाचं आणखी एक वैशिष्टच असं की ठराविक पैसे देऊन याचे सदस्य बनता येते. आपण प्रवेश–फी देतो ती धरूनही सदस्य बनता येते. मात्र असे सदस्य बनल्यानंतर इथल्या प्राण्यांचं संगोपन. जोपासना आणि इथल्या शैक्षणिक कार्यक्रमांना साहाय्यभूत होण्याच्या दृष्टीने कमी-अधिक रक्कम द्यावयाची असते. अशा सदस्याला वर्षभर प्रवेश तर मोफत करता येतोच शिवाय इथल्या आवारात मोटारही मोफत पार्क करून ठेवता येते. मुलांच्या प्राणि-संग्रहालयासाठीही प्रवेश मूल्य द्यावं लागत नाही. त्याचप्रमाणं इथल्या दुकानांतील कलाकारागिरीच्या वस्तू व पुस्तकं यांच्या खरेदीवर १० टक्के सूट मिळते. प्राणिसंग्रहालयाचे रंगीत कॅलेंडर निघते, तेही सवल-तीने मिळते. येथे दाखविण्यात येणारे चित्रपट व होणारी व्याख्यानं यांना त्यांना प्रवेशमूल्य द्यावं लागत नाही. याशिवाय प्राणिसंग्रहालया-तर्फे निघणाऱ्या नियतकालिकाच्या वर्गणीत सूट मिळते. डॉल्फीनच्या ४ खेळांना व मोटार सफरीच्या ४ फेऱ्यांना मूल्य द्यावं लागत नाही, जास्त देणगी देऊन आश्रयदाते होणाऱ्यांना तर त्यांच्या कुटुंबियांसह केव्हाही डॉल्फीन खेळ मोफत पाहता येतो व मोटार सफरींची सहा तिकिटे विनामूल्य मिळतात.

याखेरीज एखाद्या विशिष्ट प्राण्याचे पालकत्व तुम्हाला पत्करता

येतं. म्हणजे तुम्ही निवडाल त्या प्राण्याच्या खाद्यासाठी लागणारा वर्षभराचा खर्च तुम्ही द्यायचा असतो. अशा प्रकारे या प्राणिसंग्रहाल-याच्या पोषणकार्यात सहभागी होता येते.

कोणत्याही प्रकारची मदत, माहिती किंवा सल्ला हवा झाल्यास ठिकठिकाणी असलेले नोकर त्याबाबतीत तुम्हाला तत्परतेने साहाय्य करतात. शिवाय प्राथमिक वैद्यकीय मदत किंवा पोलिसांची मदत लागल्यास कोणताही नोकर ती मिळवून देऊ शकेल. दक्षिणेच्या प्रवेश द्वारापाशी मुख्य कचेरी आहे.

हे ब्रुकफील्ड प्राणिसंग्रहालय कूक कौंटीच्या फॉरेस्ट प्रिझर्व्ह डिस्ट्रिक्टच्या मालकीचं असून याची व्यवस्था पाहते शिकागो झूलॉजिकल सोसायटी.

बरीचशी पायपीट करावी लागली, तरी दिवसभरात आम्ही हे प्राणिसंग्रहालय पाहून घेतलं– 'शोधकेंद्रा'तील चित्रदर्शनासह वन्य पशु-पक्षी त्यांच्या नैसर्गिक वातावरणात राहत असलेले पाहून आमच्या ज्ञानात व अनुभवात साहजिकच मोलाची भर पडली. अफाट अंतर चालावं लागल्यानं तंगड्या मेटाकुटीला आल्या; पण मनाला खूप समाधान वाटले. पायपीट केल्याचं सार्थक झाल्यासारखं वाटलं.

* *

७२० २६२९२ ८/२/९९

# आकाशाशी हितगुज करणारी 'सीअर्स टॉवर्स'

अमेरिकेत न्यूयॉर्क व शिकागो या अवाढव्य शहरांत काही भागात उंच-उंच इमारतींचं जसं काही जंगल माजलंय. अमेरिकेतल्याच काही जंगलांत सरळसोट असे उत्तुंग वाढलेले प्रचंड वृक्ष दृष्टीस पडतात. उंचीच्या बाबतीत काही वृक्षांची जणू चढाओढ लागलेली दिसते. तशीच मानवनिर्मित उंच-उंच इमारती उभारण्याची स्पर्धाही अमेरिकेत लागलेली आढळते खर तर जगातली सर्वांत उंच इमारत 'एम्पायर स्टेट बिल्डिंग' न्यूयॉर्कमध्ये कित्येक वर्षांपूर्वी उभारलेली होती. त्याहून अधिक उंच इमारत जगात इतरत्र कुठं अजून उभारलेली नाही. तरीसुद्धा अधिक उंच इमारत उभारण्याची स्पर्धा खुद्द अमेरिकेतल्या अमेरिकेतच लागलेली दिसून येते. अमेरिकी लोकांची जिद्दच काही न्यारी. इतर देशांनी स्पर्धा केली नाही, म्हणून काय झालं ? आपणच आपल्या देशात अधिक उंच इमारत उभारण्याचा चंग त्यांनी बांधला

याचा पहिला प्रत्यय आणून दिला न्यूयॉर्कमध्येच स्थापन झालेल्या वर्ल्ड ट्रेड सेन्टरनं. न्यूयॉर्क आणि न्यूजर्सी यांच्या बंदर शासक महामंडळाने १९७३ साली जागतिक व्यापारी पेठ वसविण्याच्या इराद्याने 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' (जागतिक केन्द्र) या जुळ्या उत्तुंग इमारतीची उभारणी केली, या जोड-इमारती १०७ मजल्यांच्या असून इमारतींच्या शिखरांनी तब्बल ४२१ मीटर्सची उंची गाठलेली आहे. एम्पायर स्टेट बिल्डिंगची उंची ४००,मीटर्सहून थोडी कमीच (१२४३ फूट) आहे.

## जागतिक उच्चांक

तसं पाहता, न्यूयॉर्कच्या मॅनहटन भागात एकाहून एक उंच इमारतींची उंची पाहण्यासाठी आपल्याला मान एवढी उंच करावी लागते की, आपल्या माथ्यावरचं शिरस्त्राण मागल्या मागं खाली पडलंच समजा ! एवढंच काय पण ती-ती उंच इमारत आपल्या अंगावर आल्यासारखी काळजात धडकी उत्पन्न करणारी भावना क्षणभर का होईना, पण चाटून जाते. पण याही इमारतीच्या डोक्यावरून डोकावणारी ही ' वर्ल्ड ट्रेड सेंटर ' ची जुळी इमारत ' एम्पायर स्टेट बिल्डिंगच्या जागतीक उच्चांकावर मात करून उंच माथ्यानं मिरवू लागली आहे.

पण या उत्तुंग इमारतीलाही नव्या जागतिक उच्चांकाचं हे सौभाग्य फार दिवस लाभलं नाही. न्यूयॉर्कमध्ये नाही तरी शिकागो या दुसऱ्या मोठ्या अमेरिकी शहरात विशाल मिशीगन सरोवराच्या काठावर ' सीअर्स टॉवर ' या इमारतीनं अलीकडेच, आपला अधिक उंच गगनचुंबी माथा उभारून या जुळ्या इमारतीला खाली पाहायला लावलं आहे आणि उंचीचा नवीन जागतिक उच्चांक स्थापन केल्याच्या डौलात सध्या तरी ' टॉवरची ' ही इमारत उभी ठाकली आहे. हिचा १०३ रा आकाशवेधी मजलाच मुळी जमिनीपासून १,३५६ फूट उंचीवर आहे. एकूण मजले आहेत एकशेदहा.

## आकाशाशी हितगुज

पोलाद, काच, ॲल्युमिनियम व काँक्रीट यांच्या आधारावर उभा असलेला सीअर्स टॉवर (मनोरा) कचेऱ्यांसाठी ४५ लाख चौरस फूट जागा उपलब्ध करून देऊन माथ्यावरच्या ॲन्टेनांच्या जोडगोळीच्या सहाय्यानं आकाशाशी हितगुज करीत सध्या ताठ मानेनं उभा आहे. या इमारतीची प्रत्यक्ष उंची १४४५ फूट (४४३ मीटर्स) असली तरी ॲन्टेना टॉवर्ससह या इमारतीनं आपली एकूण उंची १७०७ फुटांपर्यंत उंचावली आहे. काळ्या ॲल्युमिनीयम आणि काशाचा (ब्राँझचा) मुलामा दिलेल्या काचांनी मढवलेली ही इमारत सीअर्स या प्रख्यात कंपनीनं

दिमाखात उभारली आहे. या कंपनीचं प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्सचं जाळं सबंध अमेरिकाभर पसरलेलं आहे. सीअर्सचं प्रचंड स्टोअर नाही अशी बहुधा एकही मोठी अमेरिकी नगरी नसेल !

तर या 'सीअर्स टॉवर' च्या बांधकामाला तीन वर्षे लागली. मोठ्याच्या कामाच्या वेळी तर दीड हजारांहून जास्त कामगार उभारणीच्या कामात गुंतलेले असायचे. या 'टॉवरच्या' केवळ सांगाडयासाठी ७६ हजार टन पोलाद लागले. २ लक्ष २२ हजार ५०० टन वजनाच्या या इमारतीच्या पायासाठी आधारशिला म्हणून शिलाखंडाची ११४ भरभक्कम सेतुबंधनं जमिनीत रोवली आहेत. अगदी न्यूयॉर्कमधल्या स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याच्या उंचीइतकी खोलवर–भूमिगत प्रस्तरांच्या खोवणीत चपखल बसवून !

इमारतीच्या एक एकर क्षेत्राच्या तळभागात ७५ बाय ७५ फुटाचे ९ चौक आहेत.

आपोआप चालणारे पाण्याचे चक्री फवारे, धुराचा तपास लावणारी यंत्रणा, प्रसंगी वीजप्रवाह बंद पडल्यास उपयोगी पडावेत म्हणून डिझेल जनरेटर्स यांची तरतूद या मनोऱ्यात करण्यात आली असून दळणवळणाची अद्ययावत पद्धती योजलेली आहे काशाचा मुलामा असलेल्या १६ हजार खिडक्या या इमारतीला आहेत.

इमारतीचा बाहेरचा भाग धुऊन स्वच्छ करण्यासाठी सहा यंत्रे उभारलेली असून ती वर्षातून आठ वेळा सबंध इमारत आपोआप स्वच्छ करतात.

सीअर्स, रोब्युक अँण्ड कंपनी यांच्या मुख्य राष्ट्रीय कचेरीतील ७ हजार नोकरवर्ग धरून एकूण १२ हजार लोकं या टॉवरमध्ये कामाच्या निमित्ताने कमी अधिक वेळ राहतात, सीअर्सनं खालचा निम्मा भाग व्यापला आहे. तर उरलेला भाग अनेकांना भाडेपट्ट्यानं दिलेला आहे.

**विहंगम दृश्य**

'टॉवर' वरच्या १०३ च्या मजल्यावरच्या आकाशवेधी गच्चीपर्यंत जाण्यासाठी विजेची दोन भली मोठी जलदगती पाळणी (एलिव्हेटर्स) आहेत. त्यांची गती एवढी वेगवान आहे की साडेतेराशे फूट उंचीपर्यंतचा गच्चीपर्यंतचा 'प्रवास' अवघ्या एक मिनिटाच्या आत पुरा होतो. विजेच्या पाळण्याच्या या झपाट्याच्या गतीपायी, हवेच्या दाबात होणाऱ्या फेरबदलामुळे आपले कान गच्च होतात. विजेच्या या पाळण्यातून दरवेळी पन्नासएक लोकांना घेऊन जाण्याची सोय आहे. आकाशवेधी गच्चीवर जाण्यासाठी दोन डॉलर्सचे तिकीट आहे. जाडजूड भव्य काचांनी ही गच्ची बाहेरून बंद केलेली आहे. हवा निर्मळ असल्यास या गच्चीवरून परिसरातील वीस एक मैलांपर्यंतच्या दृश्याचं निरीक्षण करता येतं. त्या सोयीसाठी ठायी-ठायी दुर्बिणीची फिरती यंत्रं बसवलेली आहेत पाव डॉलरचं (२५ सेन्टचं) नाणं त्या यंत्रात टाकलं म्हणजे दहा-पंधरा मिनिटं त्या दुर्बिणीतून दूरवरची दृश्यं न्याहाळता येतात. त्यामुळं भोवतालच्या शिकागोनगरीचं अफाट विहंगम दर्शन घडतं.

माझा भाचा दत्ता मणेरीकर यानं मला मुद्दाम सध्याकाळच्या थोडं आधी तिकडं नेलं होतं. हेतू असा की, संध्याकाळपर्यंत मावळत्या सूर्यप्रकाशात 'टॉवर'च्या भोवतालच्या परिसराचं निरीक्षण करता यावं आणि काळोख पडल्यावर असंख्य विद्युद्दीपांच्या लखलखाटात झगमगणारी शिकागोनगरी सुखेनैव पाहता यावी. हे दोन्ही उद्देश सफल होऊन माझ्या डोळ्यांचं अक्षरशः पारणं फिटलं. सूर्य मावळण्याच्या आधी (त्या भागात संध्याकाळी साडेसात वाजेपर्यंत चांगला सूर्यप्रकाश असतो.) दूरवरच्या क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर एकाहून एक उंच इमारतीचं वगैरे विहंगम दृश्य पाहता आलं. तर अंधार पडल्यावर रांगोळीच्या ठिपक्यासारख्या असंख्य विद्युद्दीपांच्या मैलोनमैल लांबीच्या माळांनी नटलेले रस्ते आणि प्रकाशानं उजळून निघालेल्या उत्तरेकडच्या उंच इमारती पाहून वेगळ्याच नेत्रसुखाचा आस्वाद घेता आला. (ही

आकाशवेधी गच्ची आठवड्याचे सर्व दिवस रोज सकाळी ९ पासून रात्री ११–३० वाजेपर्यंत खुली असते.)

**कल्पकता व कला**

हे झालं टॉवरच्या आकाशवेधी गच्चीवरून दिसणारं बाह्य दृश्य-पण खुद्द टॉवरमध्ये वॅकर ड्राईव्ह लॉबी म्हणून एक प्रेक्षणीय दालन आहे. विख्यात शिल्पकार आणि हावभावाचं कलात्मक दर्शन घडविणारा प्रतिभाशाली कलावंत अलेक्झांडर कॅल्डर यानं भिंतीवर आकारबद्ध केलेलं हालतं शिल्प इथं आपलं लक्ष वेधून घेतं. पाठीचा कणा, तीन फुलं, गोलाकार गतिलंबक, आणि सूर्य या सात मूलतत्त्वांत त्यानं विश्व कल्पिलेलं असून या प्रत्येक मूलतत्त्वाला त्याच्या त्याच्या स्वतंत्र प्रेरकयंत्रानं गती दिलेली आहे. अपूर्व कल्पकता व कला याचं दर्शन या हालत्या शिल्पकलेतून घडतं.

'टॉवर'मध्ये १५०० लोकांची बसण्याची सोय असलेलं भव्य उपाहारगृह बरून खाद्यपेयांची वगैरे एकूण पाच रेस्टॉरंटस आहेत. याशिवाय एक बँक आणि नाना तऱ्हेच्या वस्तूंची अनेकविध दुकानं आहेत.

अपंगांसाठी चाकांच्या खुर्च्या वगैरे पुरवण्याची सोयही करण्यात आली आहे. त्याबद्दलची माहिती तिकीट कचेरीत मिळू शकते.

* *

# शिकागो शहर

वॉशिंग्टन व न्यूयॉर्क या अमेरिकेतल्या दोन मोठ्या शहरांखालोखाल शिकागो शहराचा क्रमांक लागतो. मात्र पहिल्या दोन शहरांहून या शहराचं वैशिष्टय असं की मिशिगन या सागरतुल्य विशाल, निळ्याभोर सरोवराची नयनरम्य लपकती झालर लाभली असल्यानं या शहराच्या सौंदर्याला वेगळीच झळाळी प्राप्त झालेली आहे. तिकडच्या उन्हाळ्याच्या दिवसांत (जून–जुलैमध्ये) तिकडे जाण्याचा योग आल्याने प्रस्तुत लेखकाला या शहराच मोकळं, निर्मळ दर्शन घडलं. दक्षिणोत्तर पसरलेल्या या शहराच्या सबंध पूर्व सीमेला सरोवराची किनारपट्टी लाभल्यानं, या किनारपट्टीवरून मोटारनं फेरफटका मारणं हा अनुभव खरोखरच विलोभनीय म्हणावा लागेल.

रेल्वेनं न्यूयॉर्कहून शिकागोला जायचं झाल्यास जवळजवळ चोवीस तास लागतात. शिकागोच्या भव्य स्टेशनबाहेर आपण आलो, म्हणजे समोरच काही अंतरावर 'सीअर्स टॉवर' ही जगातली सर्वांत उंच इमारत आपलं लक्ष वेधून घेते. स्टेशनबाहेर हमरस्ता असल्यानं आपल्याला घेऊन जाण्यासाठी येणारा आपला नातेवाईक वा मित्र त्या रस्त्यावर स्टेशनजवळ आपली मोटार उभी करू शकत नाही. पलीकडच्या एखाद्या लहानशा आडरस्त्यावर आपली कार उभी करून तो प्रथम स्टेशनवर पाहुण्याचं स्वागत करतो आणि मग कार घेऊन येऊन पाहुण्याला आपल्या घरी घेऊन जातो.

बहुतेक लोक आपल्या उद्योगधंद्यासाठी शिकागो शहरातल्या कचेऱ्यांत वगैरे येत असले, तरी राहतात शहरातल्या जवळपासच्या

एखाद्या उपनगरात. अर्ध्या-पाऊणतासाचा मोटारप्रवास करून मुक्कामाच्या घरी पोचावं लागतं. आपले भारतीय लोक अशा उपनगरांत एखादं घर विकत वा भाड्यानं घेऊन राहतात. तळमजला व वरचा एक मजला असलेल्या घरांची एक कॉलनीच असते. काही घरांना तळघरही असतं. शिवाय घराला लागून दोन मोटारी ठेवण्यासाठी गॅरेज. राहायची सर्व घरं लाकडी असतात. खरं तर, मोठ्या शहरांतल्या कचेऱ्यांच्या किंवा कारखान्यांच्या उंच, भव्य इमारती सोडल्यास सगळीकडची राहण्याची घरं, दुकानं लाकडीच असतात. इमारती लाकडाच्या तयार भागांनी ही घरं उभारली जातात. (लोखंडाचा व सिमेंट काँक्रीटचा उपयोग केला जातो फक्त शहरातल्या भव्य इमारतींच्या बांधकामासाठी व रस्त्यांसाठी.) या घरांना पातळ गिलावा तेवढा सिमेंटचा केला जातो.

शिकागोमध्ये व्यापारउद्योगाच्या मोठमोठ्या कंपन्यांच्या कचेऱ्या, वडी-वडी स्टोअर्स वगैरे असलेला मध्यवर्ती बाजारपेठविभाग सोडला, तर बाहेरच्या रहिवास विभागात काही लोक माडीच्या एक मजली स्वतंत्र घरातून किंवा भाड्याच्या फ्लॅट्समधून राहतात.

अफाट पसरलेल्या शिकागो शहरात प्रशस्त असे आखीवरेखीव हमरस्ते आहेत. त्या रस्त्यांवर मोटारी उभ्या करून ठेवता येत नाहीत. जवळपास कमी-अधिक अंतरावर असलेल्या छोट्या आडरस्त्यांवर अंतराअंतरावर बसवलेल्या भाड्याच्या मीटरच्या लोखंडी खुंटालगत कमी-अधिक वेळापुरती आपली कार उभी (पार्क) करून ठवावी लागते. कमी-अधिक वेळेनुसार कमी-अधिक भाड्याचे ठराविक पैसे (डॉलरच्या हिशेबात) बाजूच्या खुंटावरील पार्क मीटरमध्ये टाकावे लागतात. या मीटर्सवर देखरेख ठेवणारा पोलिस असतो. तो भाड्याच्या मुदतीबाहेर एखादी मोटार जागा अडवून राहिली, तर तिच्या पुढच्या काचेवर दंडाचं लेबल चिकटवून ठेवतो.

**सर्वांत उंच इमारत**

शिकागोतील 'सीअर्स टॉवर' ही जगातली सध्याची सर्वांत उंच

इमारत आहे. काही वर्षांपूर्वी न्यूयॉर्कमधील 'एम्पायर स्टेट' बिल्डिंग ही जगातली सर्वांत उंच इमारत म्हणून मान पटकावून होती. त्यानंतर १९७३ साली न्यूयॉर्कमध्येच त्याहून उंच अशी 'वर्ल्ड ट्रेड सेन्टर' (जागतिक व्यापार केंद्र) ही जुळी उत्तुंग इमारत उभारली गेली. एम्पायर स्टेट बिल्डिंगची उंची ४०० मीटर्सहून थोडी कमीच (१२४३ फूट) आहे. तर या जोडइमारती १०७ मजल्यांच्या असून, त्यांच्या शिखरांनी तब्बल ४२१ मीटर्सची उंची गाठलेली आहे. पण या इमारती-लाही नव्या जागतिक उच्चांकाचं सौभाग्य फार काळ लाभलं नाही. शिकागो शहरात, विशाल मिशिगन सरोवराच्या काठावर 'सीअर्स टॉवर' या इमारतीनं अलीकडेच आपला अधिक उंच गगनचुंबी माथा उभारून त्या जुळ्या इमारतीला खाली पाहायला भाग पाडलं आहे. ११० मजल्यांच्या या मनोऱ्याचा १०३ वा आकाशवेधी मजलाच मुळी जमिनीपासून १,३५३ फूट उंचीवर आहे. कचेऱ्यांसाठी ४५ लाख चौरस फूट जागा उपलब्ध करून देऊन, माथ्यावरच्या अँन्टेनांच्या जोडगोळीच्या साहाय्यानं आकाशाशी हितगुज करीत हा 'टॉवर' ताठ मानेनं उभा आहे. या मनोऱ्याची प्रत्यक्ष उंची १४५४ फूट (४४३ मीटर्स) आहे. तरीसुद्धा तिच्या माथ्यावरच्या अँन्टेना–टॉवर्ससह तिनं आपली एकूण उंची १७०७ फुटांपर्यंत उंचावली आहे. सीअर्स या प्रख्यात अमेरिकन कंपनीनं उभारलेली ही इमारत काळ्या अॅल्युमिनियमच्या व काशाच्या (ब्रांझचा) मुलामा दिलेल्या काचांनी मढविलेली आहे.

शिकागोचं भूषण ठरणाऱ्या या इमारतीत एक एकर क्षेत्राच्या तळभागात ७५ × ७५ फुटांचे ९ चौक आहेत. काशाचा मुलामा दिलेल्या सोळा हजार खिडक्या या इमारतीला आहेत. तर इमारत बाहेरून धुवून स्वच्छ करायला सहा यंत्रं उभारलेली आहेत. ही यंत्रं वर्षातून आठ वेळा सबंध इमारत स्वच्छ करतात. सीअर्स कंपनीने या इमारतीचा खालचा निम्मा भाग व्यापला आहे. तर उरलेला भाग भाडेपट्ट्याने दिलेला आहे.

'टॉवर'च्या १०३ व्या मजल्यावरच्या आकाशवेधी गच्चीवर

प्रवाशांना विजेच्या जलदगती पाळण्यातून जाता येतं. अशी दोन भली-मोठी पाळणी (एलिव्हेटर्स)आहेत. साडेतेराशे फूट उंचीपर्यंतचा गच्ची-पर्यंतचा 'प्रवास' या पाळण्यातून जेमतेम मिनिटभरात पुरा होतो. म्हणजे या वीजपाळण्याची केवढी वेगवान गती असते. याची कल्पना करा. या झपाट्याच्या गतीमुळे पाळण्यातून जाताना आपले कान गच्च होतात. प्रत्येक वीजपाळण्यातून दर खेपेला पन्नासेक माणसं जाऊ शक-तात. आकाशवेधी गच्चीवर जाण्यासाठी दोन डॉलर्सचं तिकीट आहे.

खुद्द गच्चीच्या आतल्या भागात 'वॅकर ड्राईव्ह लॉबी' म्हणून एक प्रेक्षणीय दालन आहे, विख्यात शिल्पकार आणि हावभावाचं कला-मिक दर्शन घडवणारा प्रतिभाशाली कलावंत अलेक्झांडर कॅल्डर यानं त्भतीवर आकारबद्ध केलेलं हालतं शिल्प इथं आपलं लक्ष वेधून घेतं. पाठीचा कणा, तीन फुटी, गोलाकार गती, लंबक आणि सूर्य या सात मूलतत्त्वांत त्यानं 'विश्व' कल्पिलं असून या प्रत्येक मूलतत्त्वाला त्याच्या त्याच्या स्वतंत्र प्रेरकयंत्रानं गती दिलेली आहे. अपूर्व कल्पकता व कला यांच दर्शन या हालत्या शिल्पकलेतून घडतं.

'टॉवर' मध्ये लोकांची बसण्याची सोय असलेले भव्य उपहार-गृह असून खाद्यपेयांची वगैरे इतर चार रेस्टॉरेन्ट्स आहेत.

अपंगांसाठी चाकाच्या खुर्च्या भाड्याने पुरवण्याची सोय टॉवरच्या तळमजल्यावरच केलेली असून त्याबद्दलची माहिती तिकीट कचेरीत मिळू शकते.

इलिनॉइस विद्यापीठ मात्र उंचीच्या दृष्टीनं नसलं तरी भव्य इमारतींनी सुसज्ज आहे. तो एकूण परिसरच पाहण्यासारखा आहे.

**शिकागोची कलासंस्था**

मिशिगन सरोवरालगत काठाशीच असलेली 'द आर्ट इन्स्टिटयूट ऑफ शिकागो' ची इमारतही दुमजली असली तरी भव्य आहे. प्राच्य-कला, विदग्ध कला (ग्रीक व रोमन) युरोपची चित्रकला, शिल्पकला व सजावटकला 'इम्प्रेशनिझम व पोस्ट-इम्प्रेशनिझम' कला, शस्त्रास्त्रं व

चिलखतं, अमेरिकी कला, विसाव्या शतकातली चित्रकला व शिल्पकला फोटोग्राफी, टेक्स्टाइल्स, वास्तुकला. अशी वर्गवारी केलेली एकाहून एक भव्य दालनं या कलासंस्थेत आहेत याशिवाय कलाविषयक व्याख्याना-साठी व चित्रपट प्रदर्शनासाठी वेगळी प्रेक्षागृहं असून त्यात रोज कसला ना कसलं कलाविषयक चित्रपट दाखविण्यात येतो. भारतातील व आग्नेय आशियातील कलाकृती, आशियाई कलेतील बुद्ध, शाक्यमुनी. जपानी कलेवरील बौद्ध धर्माचा प्रभाव, चिनी बौद्धकला, भारतातील, अफगाणि-स्तानातील व श्रीलंकेतील प्राचीन बौद्ध मंदिरं . . . अशा नाना विषयां-वर कला-तज्ज्ञांची व्याख्यानं होतात. चित्रकलेच्या वेगवेगळ्या अंगांची प्रात्यक्षिकंही घडविली जातात. एकेका दालनातल्या चित्रांच्या वा कला-कृतीच्या अनुरोधानंही व्याख्यानं होतात.

या कलासंस्थेला भेट दिली तेव्हा मंडलाच्या आकारातील, मध्य बेटातील एक हजार वर्षांपूर्वीच्या पहाडी बौद्ध मंदिराचं सर्वांगीण दर्शन घडवणारा ' बॉरॉबुदूर ' हा तासभराचा अनुबोधपट पाहण्याचा योग आला, हा सुयोगच म्हणायला हवा. या चित्रपटाला वेगळं प्रवेश मूल्य नव्हतं. भारतातल्या बौद्ध विहारातील दैनंदिन विधीवर आधारलेला एक माहितीपूर्ण अनुबोधपटही दाखवला जातो असं कळलं. पण त्या दिवशी तो पाहण्याची संधी लाभली नाही.

आंतरराष्ट्रीय, विदग्ध व खास कलात्मक चित्रपट या संस्थेच्या खास प्रेक्षागृहात फिल्म सेन्टरमार्फत दाखवले जातात. तीन डॉलर्स प्रवेश-मूल्य देऊन हे चित्रपट पाहता येतात.

मुलांच्या सर्व प्रकारच्या कलाकृतींचा संग्रह असलेला ' ज्युनिअर म्यूझियम ' या संस्थेच्या तळमजल्यावरच आहे. पाच दालनांत विखुर-लेल्या या कलासंग्रहातील कलाकृतीत वारंवार फेरबदल केला जातो.

**भव्य मत्स्यालय**

शिकागोमधील भव्य मत्स्यालय हे कोणत्याही प्रवाशाला न चुक-वता येणारं महत्त्वाचं प्रेक्षणीय स्थळ. हे मत्स्यालय भव्य तर आहेच;

शिवाय त्यातील समुद्रप्राण्यांची विविधता व विपुलता मन थक्क करणारी आहे. मुंबईत तारापोरवाला मत्स्यालय आहे. ते आपल्याला कौतुकाचं वाटतं. पण शिकागोतल्या मत्स्यालयाचं एकेक दालनच मुळी या मत्स्यालयाहून वरचढ आहे. एवढंच नव्हे तर महासागरांनुसार विभागवार माशांची वगैरे केलेली पद्धतशीर रचना पाहून एकूण सागरांतल्या विविध प्राण्यांबद्दलच्या आपल्या ज्ञानात कल्पनातीत भर पडते. तिथल्या प्राण्यांचे प्रकार, आकार व असंख्य रंगरूपं पाहून आपल्या डोळ्यांचं अक्षरशः पारणं फिटतं. विशेषतः फुलांच्या लांब केसरांच्या झुबक्यासारखे पोवळ्यांचे लवलवते जिवंत प्राणी जे विलोभनीय दर्शन घडवतात ते खरोखरच अपूर्व होय. वेगवेगळ्या रूप–रंग आकारांनी ते आपल्याला पराकोटीचं नेत्रसुख देतात व निसर्ग चमत्काराचा अनोखा प्रकार दाखवून आपल्याला थक्क करून सोडतात. सागराच्या पोटातला हा अद्भुत ठेवा आपण पाहिला नसता, तर अपरिमित आनंदाला आपण मुकलो असतो, असे हे अद्भुत मत्स्यालय पाहून झाल्यावर वाटतं. सागरातल्या मगरीसारख्या प्राण्यांच्या जीवनावरील एक छोटा चित्रपटही तिथल्या एका प्रेक्षागृहात पाहायला मिळाला.

**प्रचंड प्राणिसंग्रहालय**

शिकागोच्या उपनगरातील ब्रूकफील्ड प्राणिसंग्रहालय हे प्रवाशांचं आणखी एक आकर्षण. मुद्दाम जाऊन पहावं असंच हे अफाट व प्रचंड स्वरूपाचं प्राणिसंग्रहालय आहे, २०० एकरांहून जास्त भूमी व्यापणाऱ्या या प्राणिसंग्रहालयात जगातल्या नाना देशांतल्या शेकडो वन्यपशूंचा तसंच पक्ष्यांचा वा जलचर प्राण्यांचा मुबलक संग्रह केलेला आढळतो. विविध प्राण्यांची एक नगरीच जणू वसली आहे.

सर्व प्राण्यांची त्यांच्या सरावाच्या नैसर्गिक वातावरणात राहण्याची सोय करणं हे या प्राणिसंग्रहालयाच वैशिष्टच आहे. वाघ, सिंह, वगैरे हिंस्र पशूंच्या अरण्यसदृश वसतिस्थानाभोवती जलमय खंदक खणलेले आहेत. (आपल्याकडे हैदराबादच्या नेहरू प्राणिसंग्रहालयात

हिंस्र पशूंना नैसर्गिक वातावरणात ठेवण्याची अशी व्यवस्था थोडीफार केलेली आढळते. पण ती अगदी लहान प्रमाणात.

'मुलांचं प्राणिसंग्रहालय' असाही एक पोटभाग एके ठिकाणी आहे. त्यात घरगुती पाळीव प्राणी व काही अमेरिकी वन्यपशू यांचा समावेश आहे. इथं मुलांच्या करमणुकीसाठी काही गमतीचे खेळही योजलेले आहेत. विविध प्राण्यांचे कसरतीचे खेळही एका रिंगणात दाखवले जातात. त्यात दोन पायांवरचं बोकडनृत्य, बास्केटबॉल खेळ-णारा डुक्कर हे खूप करमणूक करतात. शेळ्या–मेंढ्या राखणं, छोटी गाडी ओढणं, आंधळ्या वा बहिऱ्या माणसांना मार्गदर्शन करणं–या गोष्टींचं प्रशिक्षण कुत्र्यांना कसं दिलं जातं याची इथली प्रात्यक्षिकं बघण्यासारखी असतात.

ब्रूकफील्ड प्राणिसंग्रहालयात ओल्गा नावाचा एक वॉलरस एवढा खादाड असल्याचं कळलं, की त्याला दरसाल १४ हजार डॉलर्सचे (सुमारे दीड लाख रुपयांचे) कच्चे मासे वगैरे खायला घालावे लागतात.

इथला एक कासव तब्बल ४०० पौंड वजनाचा आहे. तसाच सर्वांत जास्त वेगानं उडणारा, आणि मागच्या मागं उडू शकणारा एकमेव पक्षी हृयूमिंग बर्ड इथं आहे. खारींची संख्या इथं सर्वांत जास्त आहे. शेकडो खारी इतस्ततः हुंदडताना दिसतात. पाठीवर तेरा रेषा असणाऱ्या खारी ही एक नवलाई.

ठराविक वेळच्या अन्नावेगळं खाद्य खायला दिलं, तर प्राण्यांची प्रकृती बिघडते, म्हणून त्यांना कसलंही खाद्य प्रेक्षकांनी घालता कामा नये, अशी सक्त सूचना ठिकठिकाणच्या फलकांवर लिहिलेली आढळली.

इथं निसर्गविषयक पुस्तकांचंही दुकान असून त्यात चार हजारां-हून जास्त पुस्तकं आहेत. मुलांच्या असल्याच पुस्तकांचं वेगळं दुकान आहे. कलाकुसर केलेल्या हस्तिदंती व इतर कलावस्तूही या दुकानात विक्रीसाठी ठेवलेल्या असतात.

खाद्यपदार्थ व पेयं मिळण्याची सोय ठिकठिकाणी केलेली असून विश्रांतिगृहं, प्रसाधनगृहं टप्प्या-टप्प्यांवर आहेत.

इथंही अपंगांसाठी चाकाच्या खुर्च्या भाड्यानं देण्याची सोय आहे.

**बहाई प्रार्थनामंदिर**

भाविक लोकांच्या दृष्टीनंच नव्हे, तर सुंदर वास्तुशिल्पाचं आकर्षण असणाऱ्या कोणत्याही रसिकाच्या दृष्टीनंही शिकागोच्या विलमेट या उपनगरातील डौलदार बहाई प्रार्थनामंदिर लक्ष वेधून घेणारं आहे. जगातले सर्व धर्म व त्यांच्यातील मूलतत्त्वं समान असून सर्व वंशही समान आहेत. त्याचप्रमाणं मानवजात तेवढी एक असून जगन्नियंता परमेश्वर एकच आहे, अशी शिकवण देणाऱ्या बहाई पंथाचं, सर्वधर्म समभावाची दीक्षा देणारं हे नयनरम्य तसंच चित्त प्रसन्नकारक प्रार्थनामंदिर आहे. एकोणिसाव्या शतकात बहाउल्ला (देवदूत) यानं स्थापन केलेल्या बहाई पंथाच्या पौर्वात्य व पाश्चिमात्य अशा निष्ठावंत अनुयायांनी चालू विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हे मंदिर उभारलेलं आहे. निसर्गरम्य वातावरणात डौलदारपणे शोभून दिसणारं हे घुमटाकार वास्तुशिल्प कलाकुसरीचा सुंदर नमुना असून जगभरच्या जाणत्या लोकांनी याची मुक्तकंठानं प्रशंसा केलेली आहे. 'राष्ट्राच्या सांस्कृतिक साधन संपत्तीतला जतन करण्यायोग्य असा हा एक ठेवा आहे,' अशी नोंद ऐतिहासिक स्थळांसंबंधीच्या अमेरिकेच्या राष्ट्रीय दप्तरात करण्यात आली आहे.

सर्व धर्मांच्या व वंशांच्या लोकांनी या मंदिरात एकत्र येऊन परमेश्वराची उपासना करावी, अशा हेतूनं हे मंदिर स्थापलेलं आहे. भोवतालच्या रचनाबद्ध रम्य उपवनाच्या पार्श्वभूमीवर या मंदिराचं बाहेरून जे दर्शन घडतं त्यानंच प्रथमत: आपले नेत्र सुखावतात आणि प्रसन्न मनानं आपण मंदिरात प्रवेश करतो. आतलं सभागृहाचं शांत–निवांत दालन पाहून आपल्या मनाची प्रसन्नता द्विगुणित होते. मंडलाकार

मांडलेल्या विशिष्ट रचनेच्या १२०० खुर्च्यांची सोय या दालनात उपासकांसाठी केलेली आहे. भोवतालच्या वर्तुळाकार भिंतीवरची नक्षी-दार कलाकुसर न्याहाळत-न्याहाळत आपली नजर वर-वर सरकत १३८ फूट उंचीच्या उभट घुमटाच्या छताकडे वळते. घुमटाच्या नक्षीदार जाळीतून आत झिरपणारा प्रकाश आतल्या प्रसन्न वातावरणात भर घालतो. घुमटाच्या गोलाकार छताच्या माथ्याशी 'हे तेजोनिधी, तुला प्रणिपात असो!' अशा अर्थाचे वाक्य अरबी लिपीत लिहिलेले आहे. खालच्या अंगाला सभोवार नऊ कोनाडे आहेत. त्यात प्रत्येकी एकेक अशी बहाउल्लाची नऊ वचनं रेखाटलेली आहेत.

**भारतीय ठसा**

शिकागो शहराचा दाट रहदारीचा मध्यवर्ती भाग सोडून आपण कमी वर्दळीच्या भागात गेलो, म्हणजे तिथल्या एका आडरस्त्यावर टप्पा–टप्प्यावर काही भारतीय दुकानं भोजनगृहं वगैरे आढळतात. अमेरिकेतील रहिवाशांना खास भारतीय चीजवस्तू पुरवण्याचा मक्ता या दुकानांनी घेतलेला असतो. (अमेरिकेतल्या ज्या ज्या लहान मोठ्या शहरांत थोडेफार भारतीय लोक नोकरी-उद्योग करतात किंवा राह-तात, तिथं–तिथं अशी भारतीय दुकानं कमी–अधिक प्रमाणात आहेत, शिकागो शहरात व उपनगरात मिळून बरेच भारतीय रहिवाशी असल्या-मुळं इथं अशी दुकानं थोडी जास्त आहेत.) मुख्यतः गुजराती, पंजाबी अशा लोकांनी हा प्रपंच चालवला आहे. खास भारतीय कडधान्यांपासून मसाले, पापड–लोणच्यापर्यंत आणि भारतीय पद्धतीच्या साड्यांपासून हिंदी सिनेमांच्या व्हिडिओ–कॅसेटपर्यंत अनेक चीजवस्तू ही दुकानं पुरवतात. रुचिपालट म्हणून काही काही भारतीयेतर लोकही अधून मधून या दुकानांतील भारतीय चीजवस्तू खरेदी करताना आढळ-तात. भारतात असताना ज्या पदार्थांची सवय जिभेला पडली होती ते पदार्थ आता अमेरिकेतही घरी बनवून भारतीयांना खाता येऊ लागले आहेत. त्यामुळं या दुकानावर भारतीय मंडळी बेहद्द खूष आहेत. हिंदी सिनेमांच्या व्हिडिओ–कॅसेटस (तीनेक दिवसांसाठी अडीच–तीन डॉलर्स

भाड्याने) आणून आपल्या घरच्या टी. व्ही. वर सहकुटुंब पाहता येतात. या सोयीमुळंही काही भारतीयांना विरंगुळा मिळतो.

निरनिराळ्या भारतीय पद्धतींचं जेवण पुरविणारी भोजनगृहं अमेरिकेतल्या अनेक प्रमुख शहरांत मुख्यतः उत्तर भारतीय चालवतात. तशीच काही भोजनगृहं शिकागोमध्येही आहेत. काही शाकाहारी तर काही मांसाहारी. अमेरिकी भोजनगृहात व उपाहारगृहात बीफ (गाई बैलांचं मांस) सर्रास असतं; तर भारतीय भोजनगृहात मांसाहारींना कोंबडीची सागुती (आणि तीही भारतीय पद्धतीने बनवलेली मसालेदार) मिळू शकते. भारतीय भोजनगृहांना 'सत्कार', 'अन्नपूर्णा' यांसारखी भारतीय नावं दिलेलीही आढळतात. स्वतःचं कुटुंब नसलेले एकटे राहणारे भारतीय आणि रुचिपालट म्हणून कधी कधी इतर भारतीय मंडळीही या भोजनगृहांचा सहकुटुंब लाभ घेतात.

* *

# नायगाराची नवलाई

एखादा माणूस भारतातून अमेरिकेत गेला आणि तिथला नायगारा धवधबा पाहिल्याशिवाय परतला तर माहितगार लोक त्याला 'नेभळट' ठरवल्यावाचून राहणार नाहीत. खरं तर भारतातून किंवा इतर देशांतून अमेरिकेत जाऊन कैक वर्षं तिकडे नोकरी करीत असलेल्या अनेक माणसांनी नायगारा धवधबा मुळीच पाहिलेला नसतो. त्यांचा कुणीतरी नातेवाईक तिकडे गेला तर त्याला दाखवण्याच्या निमित्तानं या लोकांना नायगाराचं प्रत्यक्ष दर्शन घडतं.

तसा नायगारा पाहण्यासारखा आहे. याची या लोकांना जाणीव असते. पण अमेरिका एवढा अफाट देश आणि तिकडे एवढी तऱ्हेतऱ्हेची प्रेक्षणीय स्थळं आहेत, की सुटीत मुद्दाम जाऊन पाहण्याच्या दृष्टीनं नायगाराचा क्रम कटाक्षानं लौकर लागतोच असं नाही. 'केव्हा तरी जाऊन पाहू झालं !' असा एकूण बेत असतो.

तर हा नायगाराचा धवधबा अमेरिकेतलंच काय पण जगातलं एक अप्रतिम प्रेक्षणीय गणलेलं स्थळ ! . . . अर्थात व्यक्ती तितक्या प्रकृती ! कुणाला काय प्रेक्षणीय वाटेल, कशाचं आकर्षण वाटेल ते सांगता यायचं नाही. हो ! एखादा म्हणायचा—'धबधब्यात असं काय विशेष बघायचं ? नदीचं पाणी दीडेकशे फूट उंचीवरून धपाधप खाली पडतंय. एवढंच ना ? त्यात काय मोठा आलाय चमत्कार ? खरा चमत्कार पावसाचा ! , . . आभाळात एवढ्या उंचावर आपोआप बनलेलं पाणी धाराधारांनी थेट पृथ्वीवर कोसळतं. म्हणजे निसर्गाची केवढी नवलाई पाहा ! ...' आणि या म्हणण्यात बरंच तथ्य आहे, नाही का ?

अति– परिचयामुळं पाऊस ही गोष्ट आपण फारशी लक्षवेधक मानत नाही ही गोष्ट वेगळी. तर ते असो !

माझ्यावर नेभळटपणाचा शिक्का बसू नये, म्हणूनच केवळ नव्हे तर नायगारा पाहण्याची मला खरोखरच उत्कंठा होती. कारण त्या बद्दलची वर्णनं माझ्या वाचण्यात आली होती. अनेक वाचकांच्या वाचनातही त्यांतली काही आली असतील. म्हणून इथं आटोपशीर वर्णनावरच मी भागवणार आहे. मला नायगारा दाखवण्याचा पत्कर घेतला होता शिकागो भागात राहणाऱ्या दत्ता मणेरीकर या माझ्या भाच्यानं. त्यानं आपल्या आवडत्या 'टोयाटो' या जपानी कारमधून सातेकशे मैलांचा प्रवास करून तो नावाजलेला धवधवा मला दाखवला. म्हणजे जाण्या–येण्याचा एकूण प्रवास झाला चौदाशे मैलांचा.

कधी–कधी काय होतं, एखादं नाटक, एखादा चित्रपट, एखादी कथा–कादंबरी किंवा एखादं प्रेक्षणीय स्थळ वगैरेची खूप वाखाणणी आपण ऐकलेली–वाचलेली असते. मग भलत्याच अपेक्षेनं–उत्कंठेनं त्या गोष्टीला सामोरे जातो. तर कधी–कधी ती गोष्ट आपल्याला तेवढीशी भावत नाही. एकपरी आपला अपेक्षाभंगच होतो म्हणा ना ! पण सुदैवानं नायगारानं माझा अपेक्षाभंग केला नाही. दुरून तसंच दोन-तीन तऱ्हांनी त्याचं समीपदर्शन घेतलं, तेव्हा माझ्या डोळ्यांचं अक्षरशः पारणं फिटलं असं वाटलं.

मात्र नायगाराचं खरं साग्रसंगीत दर्शन होते ते कॅनडाच्या बाजूनं. (म्हणूनच यासाठी कॅनडाचा खास व्हिसा घेऊन ठेवावा लागतो.) अमेरिकेच्या बाजूनं नायगारा पाहणं म्हणजे एखाद्या लावण्यवतीचं सौंदर्य समोरून पाहण्याऐवजी तिच्या डाव्या किंवा उजव्या अंगानं पाहून समाधान मानण्यासारखं आहे. कारण कॅनडात धवधव्याच्या समोरच्या उंच टेकडीवरून २१०० फूट रुंदीचा आणि १५८ फूट उंचीच्या या धवधव्याचं विशाल असं मनोरम दर्शन घडतं, शिवाय बोटीतून धवधव्याच्या थेट पायथ्यापाशी जाता येतं तेही कॅनडातूनच. आणि धवधव्याच्या जल-

धारांचं नृत्य बोगद्यातून अगदी जवळून पाठमोरं दृष्टीस पडतं तेही कॅनडातूनच.

धबधब्याच्या पायथ्याशी प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या टुमदार यंत्र-नौकेचं बोटीचं नाव ठरलेलं आहे. 'मेडन मिस्ट' (धुक्यानं अवगुंठित झालेली ललना या अर्थी) या बोटीतून फेरफटका मारण्यासाठी चारेक डॉलर्सचं ठराविक तिकीट काढावं लागतं. मग विजेच्या सरकत्या पाळ-ण्यातून टेकडीवरून खाली जावं लागतं. तिथं बोटीवर चढायचं. टोपीसह काळा पावसाळी डगला (रेनकोट) देतात. त्यानं आपादमस्तक देह झाकायचा. आणि बोटीच्या डेकवर जायचं. बोट हळूहळू सरकत धब-धब्याच्या जवळ जवळ पायथ्यालगत जाते. यावेळी धबधब्याचं अगदी समीपदर्शन तर घडतंच, शिवाय एवढ्या उंचावरून खाली कोसळणाऱ्या जलधारांतून चौफेर उडणाऱ्या जलबिंदूंच्या तुषारांची आपल्या अंगावर रोमांचक बरसात होते त्यावेळी अंग कसं मोहरून जातं. त्या जलतुषा-रांच्या अविरत नर्तनातून वारंवार धुक्याचे ढग उठतात. ते दर्शनही वेगळी खुमारी आणतं.

एखाद्या प्रेक्षणीय स्थळाचं दर्शन प्रवासी प्रेक्षकांना वेगवेगळ्या तऱ्हेनं कसं घडवायचं आणि त्या त्या प्रकारे जास्तीत-जास्त पैसा कसा कमवायचा ही अमेरिकी योजकांची दृष्टी वाखाणण्यासारखी आहे. नाय-गारा धबधब्याच्या बाबतीतच पाहा. बोटीनं धबधब्याच्या पायथ्यापर्यंतचा फेरफटका घडवून आणतात. तसाच त्यांनी धबधब्याखालून एक बोगदा खणला आहे. दिव्यांचा झगझगाट असलेल्या या भुयारातून (अर्थात ठराविक मूल्य देऊन) धबधब्याच्या कोसळत्या जलधारांच्या थेट पाठी-मागं आपल्याला जाऊन पोचता येतं. म्हणजेच धबधब्याच्या कोसळणाऱ्या जलधारांचं पाठमोरं दर्शन आपल्याला घडतं. (या भुयारातून जातेवेळीही पावसाळी डगले यावेळी पिवळे अंगावर चढवावे लागतात.) आहे की नाही अजब योजकता अशा एखाद्या प्रेक्षणीय स्थळांचं दर्शन विविध अंगांनी घ्यायला आपण उत्सुक असतोच; अर्थात मीसुद्धा तसं दर्शन घेतलं.

हे झालं कॅनडातून होणारं नायगाऱ्याचं मुख्य दर्शन. अमेरिकेच्या बाजूनं एवढं विशाल दर्शन घडत नसलं तरीसुद्धा १०६० फूट रुंद आणि १६९ फूट उंच असा धबधबा तिकडूनसुद्धा बघायला मिळतो. धबधब्याच्या पाठीमागे वाहणाऱ्या नदीच्या उजव्या काठालगत लोखंडी नळयांचा कठडा बनवलेला आहे. त्याला अगदी टेकून उजव्या अंगाच्या धबधब्याचं अगदी समीप दर्शन घेता येतं.

अंधार पडल्यावर वेगवेगळ्या अंगांनी रंगीबेरंगी प्रकाशझोत टाकून धबधब्याच्या एकूण दर्शनाला वेगळीच खुमारी आणली जाते.

**नायगाराची हिवाळ्यातील शोभा**

हिवाळ्यात नायगारा धबधब्याशी शोभा काही वेगळीच असते. त्या गारठ्याच्या दिवसांत धबधब्याच्या कोसळत्या पाण्याच्या तुषारांचा फवारा जवळपासची झाडं, खडक, दिव्याचे खांब यांच्यावर उसळतो आणि या बर्फाचा थर साचून या सर्वांना वेगळंच रंगरूप लाभतं.

जानेवारीच्या प्रारंभी तर धबधब्याच्या पायथ्यापाशी बनलेल्या खिडारावर बर्फ साचून चक्क हिम-पूल उभारला जातो.

हिवाळ्यात या भागात संचारणाऱ्या वेगवेगळ्या पक्ष्यांचं निरीक्षण करणंही मौजेचं असतं. नायगारा धबधब्यापासून जवळ जवळ २१ मैलांपर्यंत पसरलेल्या वनश्रीनं नटलेल्या पार्क–वे या टापूत नानाविध जातीची बदकं व गळ पक्षी दृष्टीस पडतात.

धबधब्याचं दर्शन घडवणारी नायगारा नदी खरं तर अवघी ३५ मैल लांबीची आहे. तरी पण धबधब्यासह तिची एकूण शोभा खासच अवर्णनीय अशी आहे. हे जगातलं एक नैसर्गिक आश्चर्य मानलं जातं. त्यामुळंच वर्षभरात देशोदेशींचे सव्वाकोटी प्रवासी याचं दर्शन घ्यायला येतात.

फुलांच्या या घड्याळाची फुलं दरसाल नवीन रचनेनं मांडली जातात. त्यामुळं या घड्याळाचा चेहरामोहरा बदलतो. रूपरंगाला

नवीन साज चढतो. जगातलं हे सर्वांत मोठं फुलांचं घड्याळ असून त्याचा व्यास ४० फूट (१२.२ मीटर्स )आहे. आणि तब्बल २५ हजार फुलरोपांनी त्याची रचना आकाराला आणलेली आहे.

फुलांच्या या घड्याळाच्या जवळच, उत्तरेकडे ' लिलॅक गार्डन्स ' नावाची फुलबाग असून तिथली फुलं दरसाल मे महिन्याच्या अखेरी–अखेरीला बहराला येतात. वेगवेगळ्या २५६ जातींची पंधराशेहून अधिक रोपं या बागेत लावलेली आहेत.

कॅनडात असणाऱ्या, घोड्याच्या नालाच्या आकाराच्या नायगारा धबधब्याजवळच ' व्हिक्टोरिया राणी उद्यान ' नावाचं पार्क आहे. कित्येक एकरांत पसरलेलं हे उद्यान खरोखरीच राजेशाही आहे. नायगाराजवळची उद्यानं १८८५ साली उभारली. त्यावेळी ब्रिटनमध्ये व्हिक्टोरिया राणीची कारकीर्द होती. त्यामुळं या उद्यानाला तिचं नाव देण्यात आलं. इथली असंख्य फुलझाडं एप्रिलपासून ऑक्टोबर–नोव्हेंबर-पर्यंत बहरलेली असतात.

' डॅफोडिल ' जातींच्या फुलांचा इथं सर्वांत जास्त वरचष्मा आहे. एप्रिलअखेर ५ लाख पिवळी धम्मक डॅफोडिल फुलं वसंतऋतूच्या आगमनाची पताका फडकवतात. या टापूला ' डॅफोडिल कॅपिटल ' (डॅफोडिलची राजधानी) असं गौरवलं जातं. इतर अनेक जातींचीही फुलं असतात.

या उद्यानातून, कोणत्याही ऋतूत नायगारा धबधब्याचं दृश्य अप्रतिम दिसतं. रात्रीच्या वेळी या धबधब्यावर दिव्यांची रोषणाई केलेली असते. ते दृश्यही इथून नयनमनोहर दिसतं.

❋ ❋

# निसर्गरम्य शिल्पांची भव्य गुहा-लुरे

गुहा म्हटली म्हणजे कमी-अधिक ओबडधोबड भिंती आणि छत असलेली, डोंगर भागातली, खडकातली लहान-मोठी पोकळ जागा असं आपण मानतो. मग एखादी गुहा लहान असो, किंवा एकाहून अनेक लहानसहान खोल्या असलेली काहीशी मोठी असो—एकूण ओबडधोबड, खडकाळ, काळोखी ओवरीच आपल्या मनश्चक्षूंपुढे उभी राहते. या गुहा अर्थातच निसर्गतः बनलेल्या असतात. पण आपल्याला कल्पना करता येणार नाही अशा रंगबिरंगी, नक्षीदार, कोरीव, निसर्गरम्य शिल्पानं नटलेली गुहा—अनेक भव्य दालनं असलेली प्रचंड गुहा अमेरिकेत पाहायला मिळते. डोळ्यांचं पारणं फेडणारी ही अलौकिक गुहा अमेरिकेतल्या व्हर्जिनिया या राज्यातील शेनानदॉह नॅशनल पार्कमधील निलगिरीच्या पर्वतराजीनजीक हे स्थान आहे.

'लुरे गुहा' म्हणून प्रख्यात असलेली ही निसर्गनिर्मित अपूर्व शिल्पलेणी पाहायला दरसाल पाचेक लाखांहून जास्त प्रवासी येत असतात. आणि निसर्गाच्या नवलाईची अजब किमया पाहून थक्क होऊन जातात. प्रवेशमूल्य म्हणून खर्च केलेले सात डॉलर्स, आपणाला घडलेल्या अपूर्व दर्शनाच्या तुलनेनं काहीच नव्हते, अशा भावनेनं संतुष्ट मनानं प्रेक्षक-प्रवासी गुहेबाहेर पडतो.

तसं म्हणजे...१८७८ मध्ये या गुहेचा शोध लागला. तेव्हा, सुरुवातीच्या काळात प्रवेशमूल्य अवघं ५० सेन्ट (अर्धा डॉलर) होतं. पण त्यानंतर गेल्या काही वर्षांत प्रवाशांसाठी करण्यात आलेल्या खास सोयी-सुधारणांच्या खर्चापायी प्रवेशमूल्य वाढवणं क्रमप्राप्त झालं. इतर

धारांचं नृत्य बोगद्यातून अगदी जवळून पाठमोरं दृष्टीस पडतं तेही कॅनडातूनच.

धवधब्याच्या पायथ्याशी प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या टुमदार यंत्र-नौकेचं बोटीचं नाव ठेवलेलं आहे. 'मेडन मिस्ट' (धुक्यानं अवगुंठित झालेली ललना याअर्थी) या बोटीतून फेरफटका मारण्यासाठी चारेक डॉलर्सचं ठराविक तिकीट काढावं लागतं. मग विजेच्या सरकत्या पाळ-ण्यातून टेकडीवरून खाली जावं लागतं. तिथं बोटीवर चढायचं. टोपीसह काळा पावसाळी डगला (रेनकोट) देतात. त्यानं आपादमस्तक देह झाकायचा. आणि बोटीच्या डेकवर जायचं. बोट हळूहळू सरकत धब-धब्याच्या जवळ जवळ पायथ्यालगत जाते. यावेळी धबधब्याचं अगदी समीपदर्शन तर घडतंच, शिवाय एवढ्या उंचावरून खाली कोसळणाऱ्या जलधारांतून चौफेर उडणाऱ्या जलबिंदूंच्या तुषारांची आपल्या अंगावर रोमांचक बरसात होते त्यावेळी अंग कसं मोहरून जातं. त्या जलतुषा-रांच्या अविरत नर्तनातून वारंवार धुक्याचे ढग उठतात. ते दर्शनही वेगळी खुमारी आणतं.

एखाद्या प्रेक्षणीय स्थळाचं दर्शन प्रवासी प्रेक्षकांना वेगवेगळ्या तऱ्हेनं कस घडवायचं आणि त्या त्या प्रकारे जास्तीत–जास्त पैसा कसा कमवायचा ही अमेरिकी योजकांची दृष्टी वाखाणण्यासारखी आहे. नाय-गारा धबधब्याच्या बाबतीतच पाहा. बोटीनं धबधब्याच्या पायथ्यापर्यंतचा फेरफटका घडवून आणतात. तसाच त्यांनी धबधब्याखालून एक बोगदा खणला आहे. दिव्यांचा झगझगाट असलेल्या या भुयारातून (अर्थात ठराविक मूल्य देऊन) धबधब्याच्या कोसळत्या जलधारांच्या थेट पाठी-मागं आपल्याला जाऊन पोचता येतं. म्हणजेच धबधब्याच्या कोसळणाऱ्या जलधारांचं पाठमोरं दर्शन आपल्याला घडतं. (या भुयारातून जातेवेळीही पावसाळी डगले यावेळी पिवळे अंगावर चढवावे लागतात.) आहे की नाही अजब योजकता अशा एखाद्या प्रेक्षणीय स्थळांचं दर्शन विविध अंगांनी घ्यायला आपण उत्सुक असतोच; अर्थात मीसुद्धा तसं दर्शन घेतलं.

हे झालं कॅनडातून होणारं नायगाऱ्याचं मुख्य दर्शन. अमेरिकेच्या बाजूनं एवढं विशाल दर्शन घडत नसलं तरीसुद्धा १०६० फूट रुंद आणि १६९ फूट उंच असा धबधबा तिकडूनसुद्धा बघायला मिळतो. धबधब्याच्या पाठीमागे वाहणाऱ्या नदीच्या उजव्या काठालगत लोखंडी नळयांचा कठडा बनवलेला आहे. त्याला अगदी टेकून उजव्या अंगाच्या धबधब्याचं अगदी समीप दर्शन घेता येतं.

अंधार पडल्यावर वेगवेगळ्या अंगांनी रंगीबेरंगी प्रकाशझोत टाकून धबधब्याच्या एकूण दर्शनाला वेगळीच खुमारी आणली जाते.

**नायगाराची हिवाळ्यातील शोभा**

हिवाळ्यात नायगारा धबधब्याशी शोभा काही वेगळीच असते. त्या गारव्याच्या दिवसांत धबधब्याच्या कोसळत्या पाण्याच्या तुषारांचा फवारा जवळपासची झाडं, खडक, दिव्याचे खांब यांच्यावर उसळतो आणि या बर्फाचा थर साचून या सर्वांना वेगळंच रंगरूप लाभतं.

जानेवारीच्या प्रारंभी तर धबधब्याच्या पायथ्यापाशी बनलेल्या खिंडारावर बर्फ साचून चक्क हिम-पूल उभारला जातो.

हिवाळ्यात या भागात संचारणाऱ्या वेगवेगळ्या पक्ष्यांचं निरीक्षण करणंही मौजेचं असतं. नायगारा धबधब्यापासून जवळ जवळ २१ मैलांपर्यंत पसरलेल्या वनश्रीनं नटलेल्या पार्क—वे या टापूत नानाविध जातीची बदकं व गळ पक्षी दृष्टीस पडतात.

धबधब्याचं दर्शन घडवणारी नायगारा नदी खरं तर अवघी ३५ मैल लांबीची आहे. तरी पण धबधब्यासह तिची एकूण शोभा खासच अवर्णनीय अशी आहे. हे जगातलं एक नैसर्गिक आश्चर्य मानलं जातं. त्यामुळंच वर्षभरात देशोदेशींचे सव्वाकोटी प्रवासी याचं दर्शन घ्यायला येतात.

फुलांच्या या घड्याळाची फुलं दरसाल नवीन रचनेनं मांडली जातात. त्यामुळं या घड्याळाचा चेहरामोहरा बदलतो. रूपरंगाला

नवीन साज चढतो. जगातलं हे सर्वांत मोठं फुलांचं घड्याळ असून त्याचा व्यास ४० फूट (१२.२ मीटर्स )आहे. आणि तब्बल २५ हजार फुलरोपांनी त्याची रचना आकाराला आणलेली आहे.

फुलांच्या या घड्याळाच्या जवळच, उत्तरेकडे 'लिलॅक गार्डन्स' नावाची फुलबाग असून तिथली फुलं दरसाल मे महिन्याच्या अखेरी-अखेरीला बहराला येतात. वेगवेगळ्या २५६ जातींची पंधराशेहून अधिक रोपं या बागेत लावलेली आहेत.

कॅनडात असणाऱ्या, घोड्याच्या नालाच्या आकाराच्या नायगारा धबधब्याजवळच 'व्हिक्टोरिया राणी उद्यान' नावाचं पार्क आहे. कित्येक एकरांत पसरलेलं हे उद्यान खरोखरीच राजेशाही आहे. नायगाराजवळची उद्यानं १८८५ साली उभारली. त्यावेळी ब्रिटनमध्ये व्हिक्टोरिया राणीची कारकीर्द होती. त्यामुळं या उद्यानाला तिचं नाव देण्यात आलं. इथली असंख्य फुलझाडं एप्रिलपासून ऑक्टोबर–नोव्हेंबर-पर्यंत बहरलेली असतात.

'डॅफोडिल' जातींच्या फुलांचा इथं सर्वांत जास्त वरचष्मा आहे. एप्रिलअखेर ५ लाख पिवळी धम्मक डॅफोडिल फुलं वसंतऋतूच्या आगमनाची पताका फडकवतात. या टापूला 'डॅफोडिल कॅपिटल' (डॅफोडिलची राजधानी) असं गौरवलं जातं. इतर अनेक जातींचीही फुलं असतात.

या उद्यानातून, कोणत्याही ऋतूत नायगारा धबधब्याचं दृश्य अप्रतिम दिसतं. रात्रीच्या वेळी या धबधब्यावर दिव्यांची रोषणाई केलेली असते. ते दृश्यही इथून नयनमनोहर दिसतं.

❋ ❋

# निसर्गरम्य शिल्पांची भव्य गुहा-लुरे

गुहा म्हटली म्हणजे कमी-अधिक ओबडधोबड भिंती आणि छत असलेली, डोंगर भागातली, खडकातली लहान-मोठी पोकळ जागा असं आपण मानतो. मग एखादी गुहा लहान असो, किंवा एकाहून अनेक लहानसहान खोल्या असलेली काहीशी मोठी असो—एकूण ओबडधोबड, खडकाळ, काळोखी ओवरीच आपल्या मनश्चक्षूंपुढे उभी राहते. या गुहा अर्थातच निसर्गतः बनलेल्या असतात. पण आपल्याला कल्पना करता येणार नाही अशा रंगबिरंगी, नक्षीदार, कोरीव, निसर्गरम्य शिल्पानं नटलेली गुहा—अनेक भव्य दालनं असलेली प्रचंड गुहा अमेरिकेत पाहायला मिळते. डोळ्यांचं पारणं फेडणारी ही अलौकिक गुहा अमेरिकेतल्या व्हर्जिनिया या राज्यातील शेनानदॉह नॅशनल पार्कमधील निलगिरी-च्या पर्वतराजीनजीक हे स्थान आहे.

'लुरे गुहा' म्हणून प्रख्यात असलेली ही निसर्गनिर्मित अपूर्व शिल्पलेणी पाहायला दरसाल पाचेक लाखांहून जास्त प्रवासी येत असतात. आणि निसर्गाच्या नवलाईची अजब किमया पाहून थक्क होऊन जातात. प्रवेशमूल्य म्हणून खर्च केलेले सात डॉलर्स, आपणाला घडलेल्या अपूर्व दर्शनाच्या तुलनेनं काहीच नव्हते, अशा भावनेनं संतुष्ट मनानं प्रेक्षक-प्रवासी गुहेबाहेर पडतो.

तसं म्हणजे...१८७८ मध्ये या गुहेचा शोध लागला. तेव्हा, सुरुवातीच्या काळात प्रवेशमूल्य अवघं ५० सेन्ट (अर्धा डॉलर) होतं. पण त्यानंतर गेल्या काही वर्षांत प्रवाशांसाठी करण्यात आलेल्या खास सोयी-सुधारणांच्या खर्चापायी प्रवेशमूल्य वाढवणं क्रमप्राप्त झालं. इतर

सोयींबरोबर प्रत्येक दालनात सोडलेल्या प्रकाशझोतामुळं गुहेतलं अप्रतिम निसर्गशिल्प पाहणं खूपच सुकर झालेलं आहे. पूर्वीच्या काळी, प्रथम मेणबत्त्या अन् मागाहून साधे वीजबल्ब लावून गुहेत प्रकाशाची यथाशक्ती सोय केलेली होती. ती अपुरी तर होतीच. शिवाय गुहेत छपरातून झिरपणाऱ्या पाण्यापुढं त्यांचा निभाव लागणं मुष्कील होई. तेच आजकाल या गुहेत हजारांहून जास्त जोरकस प्रकाशझोतांची सुरक्षित सोय केलेली आहे. शिवाय कुणाला छाया–प्रकाशचित्रं काढायची झाली, तर हव्या–त्या ठिकाणी जादा, प्रभावी प्रकाशझोत टाकण्याचीही सोय आहे.

तर या गुहेतील निसर्गनिर्मित शिल्पकलेची अपूर्वाई अशी, की... पृथ्वीच्या पृष्ठभागाखालच्या प्रस्तरांतील चिरां-भेगांतून वर्षानुवर्षं वाहात राहिलेल्या प्रवाहांनी आणि झिरपत राहिलेल्या लहानसहान झऱ्यांनी चुनखडीच्या खडकांचे विविध आकारांचे लहानमोठे नक्षीदार कोरीव सुळके निर्माण केलेले आहेत. यांतले काही सुळके छतापासून उलटे टांगते लटकते राहिलेले आहेत; तर काही सुळके स्तंभासारखे जमिनीवर उभे ठाकलेले आहेत याशिवाय भिंतालगतच्या काही प्रस्तरांना लांब झिरमिळ्यांच्या पडद्यांचं स्वरूप आलेलं आहे. तर इतर काहींना थिजलेल्या धबधब्यांसारखं रूप लाभलेलं आहे. विशाल रंगमंचावर कलाकुसरमंडित स्तंभ उभे करावेत, आणि त्यांच्या पार्श्वभागी मखमलीचे रंगीबेरंगी नक्षीदार पडदे सोडलेले असावेत, असा एकूण थाट आहे. रंगीबेरंगी कलाकुसर केलेले असे, वेगवेगळ्या निसर्गदृश्यांचे नयनरम्य ' पडदे ' गुहेच्या निरनिराळ्या दालनांत आढळतात अशाच पार्श्वभूमीवर एका दालनात एक खोलगट तळही आहे. त्याला ' इच्छापूर्तीची विहीर ' असं नाव देण्यात आलेलं आहे. वैद्यकीय संशोधनासाठी देणगी म्हणून प्रवासी लोक या विहिरीत एकेक नाणं टाकतात. (गेल्या वर्षअखेरपर्यंत या विहिरीत अशा प्रकारे टाकण्यात आलेल्या नाण्यांची गोळाबेरीज दोन लाखांहून जास्त डॉलर एवढी झालेली आढळली.)

गुहेच्या काही भिंतींवर आणि छतांवर चुनखडीचे असे काही रंगीत थर जमलेले आहेत, की त्यांना बुरख्याचे, पंख्यांचे, झग्यांचे,

एवढंच नव्हे तर ऑक्टोपससारख्या लांबच-लांब नांग्यांचे आकार लाभ-लेले आहेत. याखेरीज, कुणा प्रेक्षकांच्या नजरेला नानातऱ्हेची फुलं, प्राणी विदूषकी टोपी, भलंमोठं अंडं, ख्रिसमसचं झाड, लहानमोठे झरे...असे विविध आकारही दिसतात. एका दालनात तलाव आहे. तर दुसऱ्या एका दालनात कोरीव, नक्षीदार रत्नजडित वाटावं असं सिंहासनच जणू मांडलेलं दिसतं. या दालनाला मुळी 'सिंहासन दालन' असं नाव दिलेलं आहे. एका दालनातल्या स्तंभाला राजदंडाचा आकार लाभलेला आहे, म्हणून त्याचं 'राजदंड स्तंभ' असं नामकरण करण्यात आलेलं आहे. तर दुसरीकडचा एक भलामोठा स्तंभ 'वॉशिंग्टन स्तंभ' म्हणून ओळखला जातो. असाच एका दालनात, कनाती सोडल्यासारखा निसर्गनिर्मित तंबूच बनलेला आहे. एके ठिकाणी तर, पाचूच्या रंगाची हिरवी शाल छतापासून खाली लटकावलेली असावी तसं दृश्य दृष्टोत्पत्तीस येतं. 'हेलनची शाल' म्हटलं जातं तिला.

उंचच-उंच दुहेरी स्तभ असलेल्या सर्वांत भव्य दालनाला 'राक्षसाचा दिवाणखाना' असं सार्जस नाव दिलेलं आहे. या दालनात तब्बल साठ फूट उंचीचे कोरीव स्तंभ उभे ठाकलेले असून भूगर्भ-शास्त्रज्ञांच्या मते हे स्तंभ तब्बल सतरा-एक लाख वर्षांपूर्वीचे जुने आहेत.

गुहेच्या काही भागात झिरपत्या-ठिबकत्या पाण्यामुळे चुनखडी-तील विविध प्रकारची कलात्मक, चकचकीत आकारबद्ध रचना अजूनही कणाकणानं घडवली जात आहे. पण ती अतिशय सूक्ष्म. स्वरूपात चुन-खडीचे सुळके वा स्तंभ यांची घडण इतकी संथपणे होत असते, की एका घनइंचाची घडण व्हायला जवळ जवळ सव्वाशे वर्षे लागतात असं अनुमान काढण्यात आलं आहे.

आणखी एक किमया अशी, की .. गोठलेल्या धबधब्याचं शिल्प जवळ जवळ पांढरं शुभ्र आहे. हे सोडल तर बाकी सगळ्या तऱ्हांचं शिल्प विविध रंगांनी नटलेले आढळतं. झिरपणाऱ्या ज्या पाण्यानं हे शिल्प घडलं त्यात नाना प्रकारची खनिज मिसळलेली असल्यानं या

शिल्पांना तसतसे रंग लाभलेले दिसतात. दुसरं की बहुतेक साऱ्या शिल्पांना स्फटिकासारखा चकाकी आलेली आहे. त्यामुळं ही शिल्पं आणि त्यावरची नक्षीदार कलाकुसर उठून दिसते. वेगवेगळ्या शिल्पांचे नक्षी-दार कलापूर्व आकार आणि चकाकत्या रंगांची झिलई निरखून पाहण्यात प्रेक्षक एवढा दंग होऊन जातो, की साधारणपणे मैलभराचा गुहा-प्रवास पुरा करायला किमान एक तास तरी लागतो.

या लुरे गुहेचा शोध बी. पी. स्टेविस आणि ए. जे. डब्ल्यू. बी. कॅम्पबेल यांना १८७८ मध्ये लागला. या भागात एखादे आकर्षक पर्य-टनस्थळ शोधून काढण्यासाठी ही मंडळी फिरत होती. तर खडकातल्या एका पोकळीतून हवा बाहेर येत आहे, असं त्यांना जाणवलं. सतत ८ तास खपून त्यांनी खडकातली ती पोकळी खोदून भगदाड पाडल, तर आत गेल्यावर त्यांना अलीबाबाच्या गुहेत गेल्यासारखा रंगीबेरंगी, निसर्गाचा नयनरम्य असा खजिनाच जणू आढळला.

निसर्गाची नवलपूर्ण अशी अप्रतिम किमया निदर्शनास आणणारी ही अपूर्व गुहा थोड्याच अवधीत आकर्षक पर्यटनस्थळ तर बनलीच. पण मग यथावकाश सोयीसुविधा वाढवून या पर्यटनस्थळाचा अधिका-धिक विकासही साधण्यात आला. चुनखडीच्या सुळक्यांतून संगीताची धून निघते हे लक्षात येताच कल्पक योजकांनी ऑर्गनचे पाइप्स म्हणून त्यांचा उपयोग करून घेण्याचं योजलं. आणि भलामोठा ऑर्गन आणून एका सोयीस्कर दालनात बसवला. त्याच्या पाइप्सच्या जागी सुळक्यांची योजना करताच संगीताची वेगळीच कर्णमधुर धून त्या ऑर्गनमधून उमटू लागली. हा ऑर्गन सध्या जगातलं सर्वांत मोठं वाद्य गणलं जातं. आणि त्यावर बसवलेली 'शेनानदॉह' ही धून विजेची ठराविक कळ दाबताच आपोआप उमटते. ही कळ दाबताच एका रबराचे आघात चुनखडीच्या पाइप्सवर होतात आणि संगीताचे स्वर आपोआप उमटतात नैसर्गिक साधनांचा उपयोग करून घेऊन बनवलेला भलामोठा ऑर्गन हेही या गुहेतलं वैशिष्ट्यपूर्ण आकर्षण गणलं गेलं आहे.

सबंध वर्षभर ही गुहा प्रवाशांना खुली ठेवण्यात आली असून रोज सकाळी ९ वाजल्यापासून ऋतुमानाप्रमाणे संध्याकाळी ५, ६ किंवा ७ वाजेपर्यंत ती पर्यटकांना पाहता येते. पर्यटकांना जरूर ते मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शक असतात. तसेच गुहेतील अमोल नैसर्गिक 'खजिन्याचं' रक्षण करण्यासाठी रक्षकही नेमलेले आहेत, कुठल्याही शिल्पाची खराबी होऊ नये म्हणून हे रक्षक खबरदारी घेतात. कुणा-लाही त्याला हात लावू देत नाहीत. तसा प्रयत्न कुणी केल्यास त्याला पकडण्याचा अधिकारही या रक्षकांना असतो.

मार्गदर्शक आहेत ते अनाठायी लुडबूड करीत नाहीत, कुणी काही विचारल्यास जेवढ्यास तेवढी माहिती ते देतात. उगाच जादा बडबड करीत राहात नाही.

काही पायऱ्या उतरून या गुहेत प्रवेश करावा लागतो. गुहेतली हवा दमट असली तरी कुबट नाही. गारवा मात्र जाणवतो, पायऱ्या उतरून गेल्यावर प्रथम चुनखडीच्या नक्षीदार सुळक्यांनी भरलेलं उंच छताचं भव्य दालन लागतं. विजेच्या दिव्यांच्या झोतांमुळं सगळीकडचं कसं स्पष्ट दृष्टीस पडतं. इथून दुसऱ्या दालनात जाण्यासाठी एका लांब बोगद्यातून जावं लागतं. अर्थात या बोगद्यातही भरपूर प्रकाश फाकवलेला आहे. गुहेतही इतर सर्व दालनं पाहून झाल्यावर शेवटी दर्शन घडतं. ते इच्छापूर्ती–विहिरीचं. आपापल्या इच्छेनुसार हवं ते नाणं या विहि-रीत टाकून जो–तो माघारी परततो.

गुहेच्या माथ्यावरून ज्याचं दर्शन घडतं ते शेनानदॉह खोरंही अत्यंत निसर्गरम्य असं आहे. लुरे गुहेप्रमाणेच पण वेगळ्या तऱ्हेनं डोळ्यांचं पारणं फेडणारं ! ..

असं आहे, निसर्ग नवलाईच्या किमयेनं थक्क करून सोडणारं हे अभूतपूर्व लेणं.

* *

# अमेरिकेतील तत्पर सेवा

अमेरिकेत निरनिराळ्या संस्था ग्राहकांची सेवा किती तत्परतेनं करतात ते पाहण्यासारखं आहे. मी माझ्या मुलीकडे अमेरिकेत गेलो होतो तेव्हाचीच गोष्ट सांगतो–

अमेरिकेत महिनाभर रेल्वेनं प्रवास करण्यासाठी, माझी मुलगी अन् जावई यांनी माझ्यासाठी सवलतींचा सीझन–पास घेऊन ठेवला होता. या पासावर मी कुठंकुठं जाणार आणि किती-किती दिवस राहणार हे तारीखवार ठरलं होतं. त्या-त्या तारखांची रीतसर नोंद झालेली होती. मात्र या कार्यक्रमात एक मेख होती. ज्या रेलगाडीतून मी प्रवास करायचा त्या रेलगाडीनं स्पर्श केलेल्या स्टेशनवर मला मागाहून परत येता येणार नव्हतं. तर, झालं होतं असं–

माझ्या रेल्वेप्रवासाच्या कार्यक्रमात एक गोम राहिली होती. वॉशिंग्टनहून मला प्रथम डेट्रॉइट शहराला माझ्या दुसऱ्या मुलीकडे जायचं होतं. नंतर तिथून मला शिकागोला माझ्या भाच्याकडे जायचं होतं. यात गोम होती ती अशी, की–वॉशिंग्टनहून डेट्रॉइटला जायचं म्हणजे वाटेत शिकागोला गाडी बदलायला हवी होती. आणि ती शिकागोला बदलायची म्हणजे शिकागो स्टेशनला टक्का दिल्यासारखा होणार होता. म्हणजेच शिकागोला रेल्वेनं परत येणं शक्य होणार नव्हतं. मी वॉशिंग्टनजवळच्या माझ्या मित्राकडे गेलो होतो, तेव्हा माझी मुलगी नि जावई यांच्या लक्षात ही गफलत आली. या गफलतीतून सोडवणूक कशी करून घ्यायची याचा तोडगाही त्यांना सुचला होता. तो त्यांनी मला फोनवर सांगितला. तो तोडगा असा होता, की–

बदलायची गाडी शिकागोहून सुटत असली तरी ती तिथं न गाठता, अलीकडच्या हॅमंड स्टेशनवर गाठायची. म्हणजे शिकागोला होणारा स्पर्श टळणार होता. अर्थात शिकागोला परत येण्याच्या मार्गात मग कसलीच आडकाठी येणार नव्हती. पण त्यासाठी रेल्वेकंपनीच्या कचेरीत जाऊन पूर्वीच्या व्यवस्थेत जरूर तो बदल घडवून आणायला हवा होता. ती 'ॲमट्रॅक' नावाची खासगी रेल्वेकंपनी होती. (अमेरिकेतल्या रेल्वेकंपन्या खासगी म्हणजे बिनसरकारी आहेत.) वॉशिंग्टनमधील तिच्या मुख्य कचेरीत जाऊन जरूर तो बदल घडवून आणायला हवा होता. त्यासाठी माझा मित्र मला घेऊन त्या कचेरीत गेला. आमची अडचण तिथल्या अधिकाऱ्याला आम्ही सांगितली. तर त्या अधिकाऱ्यानं आम्हाला थोडं थांबायला सांगितलं. लगेच त्यानं, आमच्यासमोर कॉम्प्युटरची बटनं दाबली. आणि पाचेक मिनिटांतच तो आम्हाला बोलला–

"तुमच्या प्रवास-व्यवस्थेत जरूर तो बदल केलेला आहे. सगळीकडे हा बदल कळवण्यात आलेला आहे. तुम्ही निश्चित राहा." आणि टाइपरायटरवरचा कागद फाडून काढावा तसा कॉम्प्युटरवरचा कागद फाडून घेऊन आमच्या हातात देत तो पुढं म्हणाला– "बाहेरच्या खिडकीवरच्या बाईकडे जाऊन हा कागद तिला दाखवा. बदललेली नवीन तिकिटं ती देईल. ती घ्या अन् जा."

खिडकीवरच्या त्या बाईनं दोन मिनिटांत आम्हाला हवी ती नवीन तिकिटं दिली. म्हणजे हे सगळं काम अवघ्या सातेक मिनिटांत– म्हणजे अक्षरशः चुटकीसरसं उरकलं. सेवेची ही तत्परता आपल्याकडे भारतात अभावानंच आढळते. या तत्परतेचं दुसरं टोक गाठलेलं आढळलं भारतात. तो किस्सा असा–

पुण्यापासून अनेक मैलांवरील गावी राहणारे माझे एक वयस्कर मित्र, आपल्या पत्नीसह अलीकडेच अमेरिकेला आपल्या सुपुत्राकडे जाऊन आले. आपल्या हातून कसूर होऊ नये, म्हणून त्यांनी अमेरिकेला जाताना आपलं रेशनकार्ड पुण्यातील रेशनकचेरीत जमा केलेलं होतं.

अमेरिकेहून परतल्यावर आमचे मित्र त्या रेशनकचेरीत गेले. पावती दाखवून रेशनकार्ड परत मागू लागले. पण ते रेशनकार्ड सहजासहजी लगेच मिळायला बसलंय होय ! आमच्या मित्राला तिथं बेधडक सांगतलं गेलं, की ' अमेरिकेचा पासपोर्ट आणून दाखवा. म्हणजे मग रेशनकार्ड मिळेल. '

–यापुढं काय बोलणार कप्पाळ ! आमच्या मित्रानं खूप सांगून पाहिलं. पण संबंधित माणूस ऐकून घेईल तर शपथ ! . . . आमचा मित्र अडल्या हरीसारखा दुसऱ्या खेपेला निरुपायानं पासपोर्ट घेऊन गेला. तर संबंधित माणूसच त्या दिवशी गैरहजर. दुसरा कुणी ते काम पत्करीना, त्याने तब्बल चार हेलपाटे पुण्याच्या रेशनकचेरीत घातले, तेव्हा कुठं रेशनकार्ड एकदाचं परत मिळालं. आपल्याकडच्या तत्परतेचा हा नमुना वानगीदाखल पुरेसा आहे. विशेष म्हणजे अमेरिकेतले तत्पर दक्ष सेवेचे विविध नमुने पाहून आल्यानंतर आमच्या मित्राला ताजोताज इकडे हा खास अनुभव आला !

अमेरिकेतील तत्पर सेवेचे आणखी एक–दोन नमुने पाहा–

डेट्रॉइट शहरात ' रिनेसन्स टॉवर ' म्हणून एक उंच मनोरा आहे. लिफ्टमधून त्या मनोऱ्याच्या माथ्यावर जायला तीनेक डॉलर्स भाडं द्यावं लागतं. (या मनोऱ्याच्या माथ्यावरून सभोवतालच्या प्रदेशाचं विहंगम दृश्य दिसत. बाजूच्याच नदीपलीकडे कॅनडा देश आहे. तर त्या देशाच्या काही टापूचं विहंगम दृश्यही या मनोऱ्यावरून दिसतं.) याच मनोऱ्यावर संथपणे गोल–गोल फिरणारं एक हॉटेल आहे माझ्या बरोबर माझा भाचा दत्ता मणेरीकर होता. तोच मला हा मनोरा दाखवायला घेऊन गेला होता. दोघांची रीतसर तिकिटं काढून आम्ही लिफ्टनं त्या मनोऱ्यावर गेलो. तेव्हा दत्ता म्हणाला– " मनोऱ्यावरल्या फिरत्या हॉटेलात बसून जेवण्याचा अनुभव तर घेऊन पाहूया."

आणि आम्ही मनोऱ्याच्या माथ्यावरून खाली उतरताना मधल्या त्या हॉटेलात गेलो. संथपणं गोल–गोल फिरत राहणाऱ्या, पारदर्शक

काचेच्या भिंतीतून भोवतालचं दृश्य बघत आम्ही आमचं जेवण उरकलं. एक वेगळाच अनुभव घेऊन त्या हॉटेलातून आम्ही बाहेर पडलो. तर दाराबाहेरच एक फलक आमच्या दृष्टीस पडला. त्या फलकावर नमूद केलेलं होत, की– 'या फिरत्या हॉटेलात भोजन करणाऱ्याला मनोऱ्यावर जाण्याचं वेगळं तिकीट काढण्याची जरुरी नाही.'

म्हणजे...त्या मनोऱ्यावर जाण्यासाठी आम्ही वेगळं तिकीट काढलेलं होतं, ते पैसे आम्हाला खरं तर परत मिळायला हवे होते. पण त्यासाठी नसत्या कटकटीला तोंड द्यावं लागेल असा भारतातल्या कटू अनुभवांवरून मी कयास केला. पण अमेरिकेतला अनुभव गाठी असलेला दत्ता निश्चित होता. अमेरिकेत त्यानं दहाएक वर्षं घालवली असल्यानं त्याला अमेरिकेतल्या तत्पर सेवेचा अनुभव होता. आणि त्याप्रमाणे त्यानं अवघ्या दहा मिनिटांत तिकिटांचे ते पैसे परत मिळवलेसुद्धा!

अमेरिकेतली टॅक्सींची सेवाही अशीच तत्पर आहे. अमुक ठिकाणी अमुक वेळी टॅक्सी पाहिजे, अशी सूचना टॅक्सी युनियनच्या कचेरीत फोननं करून ठेवली की काम झालं. शहरात फिरणाऱ्या टॅक्सींचा युनियनच्या कचेरीशी बिनतारी संदेशानुसार संपर्क असतो. अमुक ठिकाणी अमुक वेळेच्या सुमारास फिरणाऱ्या रिकामी टॅक्सीवाल्याला सूचना बिनतारी संदेशानं दिली जाते. त्याप्रमाणं ती टॅक्सी त्या ग्राहकाच्या जागेपाशी वेळेवर येऊन ठाकते.

अमेरिकेतले पोलिस तर कुणालाही हवी ती मदत करायला सदैव तत्पर असतात. अमेरिकेत असताना एकदा एका शहरात मी वाट चुकलो तेव्हा एका पोलिसानं मला योग्य ते मार्गदर्शन तर केलंच, शिवाय शेवटी मला निरोप देताना तो उजवा हात उंचावत बोलला–'हॅव ए नाईस डे!' (मजेत जाऊद्या तुमचा दिवस!) वाटेत भेटणारी अनेक अमेरिकी माणसंही आस्थेनं, अगत्यानं असंच मार्गदर्शन करतात.

### 'ज्येष्ठ नागरिकां'ना खास सोयी

साठी उलटलेल्या रहिवाश्यांचा अमेरिकेत खास आदर करण्यात

येतो. अशा रहिवाश्यांना 'ज्येष्ठ नागरिक' (सीनिअर सिटीझन) मानण्यात येतं. आणि त्यांना विशेष अगत्य दाखवण्यात येतं. त्यांच्या काही सोयी जपल्या जातात.

आपल्यासारखंच अमेरिकेत कोणत्याही प्रेक्षणीय स्थळाचं वगैरे तिकीट मुलांना निम्म्या दरानं दिलं जातं, तर अमेरिकेत तसाच निम्मा दर 'ज्येष्ठ नागरिका'लाही धरला जातो.

स्थानिक रेलगाडीत दोघां–तिघांजणांचा एक बाक अपंग माणसं व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी राखून ठेवलेला असतो. म्हणजे या मंड-ळींची सोय आधी पाहिली जाते.

एवढंच काय पण कॉम्प्युटरसारखं शिक्षणही ज्येष्ठ नागरिकाला चक्क मोफत दिलं जातं. खरं तर हे शिक्षण महागडं असतं, तरी पण ज्येष्ठ नागरिकांच्या बाबत अमेरिकी शासनानं उदार धोरण अवलंबलं आहे.

❋ ❋

# अमेरिकेतील वेश

'देश तसा वेश' असं म्हटलं जातं. अमेरिकेत नाना वंशांच्या लोकांचा कमी–अधिक भरणा आहे. त्यामुळं लोकांच्या देशांत फेरबदल आढळतो. तरी पण ऑफिसात जाणाऱ्या पुरुष मंडळींच्या वेशात साधारणपणे आपल्याकडल्यासारखा प्रकार आढळतो. थंडीच्या (हिम वर्षावाच्या) दिवसांत गरम लोकरी कपडयांचा वेगळा वेश तिकडे काय केला जातो तेवढाच.

पण अमेरिकेत एक गंमत पहायला मिळते. उन्हाळ्याच्या दिवसांत घरी व बाहेर फिरताना सुद्धा आपल्याकडच्या हनुमानचड्डीसारखी आखूड चड्डी मुख्यत: अमेरिकी तरुण स्त्री–पुरुष व मुलं–मुली वापरताना दिसतात. वर फक्त स्लीव्हलेस बनियन–कधी रंगीत फुलाफुलांनी नटलेलं.

भारताला एक सेवानिवृत्त शिक्षक अमेरिकेत गेला होता. त्याचा एक समवयस्क मित्र अमेरिकेत नोकरीला असलेल्या आपल्या मुलाकडे राहत होता. त्या मित्राकडे हा शिक्षक अल्प मुक्कामाला गेला होता. तर एके दिवशी सकाळी घराबाहेरच्या हिरवळीवर हे दोघे मित्र फिरायला निघाले, यावेळी या शिक्षकानं भारतातल्याप्रमाणं पट्ट्यापट्ट्यांचा पायजमा घातलेला होता. ते पाहून अमेरिकेतला मित्र त्याला म्हणाला–

"अरे, हा पायजमा घालून बाहेर जाता येणार नाही तुला. पँटचढव कशी ! मग वर काहीही घाल.'

" का ?" शिक्षक महाशयांनी नवल करीत विचारलं, " हा पायजमा तर नवीन आहे. भारतातून येताना मुद्दाम शिवून आणलाय मी हा ! इथं बाहेर तर जायचंय."

" नव्या–जुन्याचा प्रश्न नाही रे, बाबा !" समजावणीच्या स्वरात मित्र उत्तरला. " अशी पद्धत नाही इथं !"

" लांडी हनुमान चड्डी–तीसुद्धा कधी कधी कुठं कुठं फाटलेली अशी घालून फिरतात पोरं–थोरं इथं. ते ब्येस चालतं अं ? मग या नवीन पायजम्यानं काय पाप केलंय, म्हणतो मी ?" शिक्षक महाशय उसंत न घेता घडाघड बोलले.

" हे बघ, " मित्र शांतपणे पुन्हा समजावणीच्या स्वरात बोलला, " तू सुद्धा त्यांच्यासारखी लांडीचड्डी–फाटकीसुद्धा घातलीस तरी चालेल ! पण हा पायजमा नवा असला तरी नाही चालायचा. देश तसा वेश ! हा पायजमा घरातल्या घरात तेवढा ठीक आहे. बाहेर तुझं हसं होईल. शिवाय तुझ्या या वेशात तुझ्याबरोबर मला नाही फिरता येणार. तू काय दोन दिवसांनी निघून जाशील. पण मला इथं राहायचंय !"

" गहजबच आहे हा ! ऐकावं ते विचित्र !" शिक्षक महाशय हात झटकीत उद्‌गारले, " पण तुझी अडचण व्हायला नको, बाबा घालतो पँट ! आलिया भोगासी..."

आणि मग पँट चढवून तो शिक्षक बाहेर पडला. तर असा आहे हा 'देश तसा वेश' मामला. याचं आणखी एक गंमतीदार उदाहरण पाहा–

हाच अमेरिकेतला मित्र, नव्यानं अमेरिकेत मुलाकडे गेला होता, तेव्हाची गोष्ट. एका अमेरिकी माणसाची नि याची नव्यान ओळख झाली होती. तर त्याच्याच कसल्याशा कामासाठी त्याच्याबरोबर जवळच्या वॉशिंग्टन शहरात एके दिवशी सकाळी या मित्राने जायच असं ठरलं होतं.

त्या दिवशी ठरलेल्या वेळी सकाळी तो अमेरिकी माणूस दाराशी येऊन थडकला. हा मित्र त्याची वाटच बघत होता. दारावरची घंटी वाजताच यानं जाऊन दार उघडलं. तो माणूस आत आला. आणि गंभीर चेहऱ्यानं या मित्राकडे बघत, काळजीच्या स्वरात बोलला–

"हे बघा मिस्टर, तुमची तब्येत आज बरी नाही, असं दिसतंय. तर आपण आजचा बेत रद्द करूया. तुमची तब्येत बरी झाली म्हणजे जाऊ आपण."

या मित्राला त्याचे हे उद्गार ऐकून अजब वाटलं. त्याचा गैर-समज दूर करण्यासाठी मित्र हसतच बोलला.

"अहो पण... माझ्या तब्येतीला कुठं काय झालंय ? ठीकठाक आहे की मी !"

"हे बघा–तब्येत बरी नसली तर राहूद्या. आज माझी गैरसोय होते–खेप फुकट जातेय म्हणूत उगाच संकोच नका करू." तो माणूस काळजीचा स्वर कायम ठेवीत बोलला.

"छे–छे, हो !" मित्र निक्षून बोलला, "काही सुद्धा झालेलं नाही माझ्या तब्येतीला. आपण जायचं म्हणजे जायचं. कसलीही फिकीर करू नका तुम्ही बसा जरा. हा आलोच मी कपडे करून."

आणि जास्त काही बोलण्याच्या भरीस न पडता मित्र आतल्या खोलीत गेला आणि पँट–कोट चढवून बाहेर आला. त्या माणसावरोबर निघून गेला.

त्या दिवशी सध्याकाळी मुलगा नोकरीवरून घरी परतला, तेव्हा मित्रानं त्याला सकाळची गंमत सांगितली, तेव्हा मुलानं विचारलं, "तो आला तेव्हा तुम्ही पायजमा–सदरा हा घरचाच पोशाख घालून बसला असाल ! होय ना !"

बापानं कबूल केलं. तेव्हा मुलानं खुलासा केला. "तो यायच्या वेळेला कपडे घालून तयार राहायला हवं होतं. आपण येऊन ठाकलो

तरी तुम्ही घरच्या पोषाखात असलेले हे पाहून बेटचाची समजूत झाली की तुम्ही घरच्या साध्या वेषात म्हणजे आजारी असला पाहिजे. इकडे तसंच मानलं जातं. तुम्हाला हे ठाऊक नाही याची कल्पना मला असती तर मी आधीच सूचना दिली असती तुम्हाला."

–अमेरिकेतील 'देश तसा वेश' ही बाब अशी गंमतीची आहे.

मात्र अमेरिकेत सर्वसाधारणपणे आधी ठरल्याशिवाय किंवा आगावू फोन केल्याशिवाय कुणी दुसऱ्याच्या घरी आगंतुकपणे जात नाही. तरीपण एकादेवेळी अचानक कुणी आलंच तर आपली तयारी असावी म्हणून घरचा यजमान रात्री झोपेपर्यंत पँट वगैरे पेहरूनच घरात वावरत असतो, म्हणजे पहा !

भारतीय वगैरे परदेशी स्त्रियांनी त्यांच्या त्यांच्या देशातल्या पद्धतीनुसार पेहराव करायला अमेरिकेत तशी आडकाठी नाही, हिंडण्या-फिरण्याच्या बाबतीत तर सोडाच; पण कचेऱ्यांतून नोकरी करणाऱ्या परदेशी स्त्रियांनाही तशी मुभा असते. म्हणजे...महाराष्ट्रीय स्त्री चक्क साडी नेसून सुद्धा कचेरीत नोकरीला जाऊ शकते. आता...अमेरिकी वेश आपण आत्मसात केलाय हे दाखवून देण्याच्या नसत्या भरीस पडून काही महाराष्ट्रीय स्त्रिया अमेरिकी पद्धतीप्रमाणे झगे वगैरे घालून नोकरीवर जातात ही गोष्ट वेगळी. एवढंच काय पण रंगरंगोटी करायलाही कमी करीत नाहीत.

कुणी–कुणी भारतीय तरुणी तर उन्हाळ्याच्या दिवसांचं निमित्त साधून घरी किंवा बाहेर फिरायला जाताना अमेरिकी तरुणीप्रमाणे चक्क लांड्या चड्डया घालून खुशाल वावरतात. पेहरावात अमेरिकी तरुणीहून आपण तसूभरही मागे नाही, अशी थोरवी जणू काय त्यांना मिरवायची असते !

* *

# अफाट बाजारपेठा

अमेरिका हा अफाट देश आहे, तशी तिथल्या अनेक लोकांची बुद्धिमत्ताही अचाट आहे. सगळं काही अफाट, प्रचंड, वेगवान, जास्तीत-जास्त सोयीस्कर असं घडवल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. मोठ-मोठ्या शहरांतून उंचच-उंच इमारती उभारलेल्या आहेत. काही–काही शहरांत वस्तुसंग्रहालयं, कलासंग्रहालयं, मत्स्यालयं आहेत तीही प्रचंड अशी. एकाहून–एक वरचढ ठरणारे मनोरेसुद्धा उभारलेले आहेत.

अफाट शेतमळे आहेत. बागमळे आहेत. संकरित लागवडीच्या पद्धतींचा एवढा विकास झालेला आहे, की कांदे, बटाटे, सफरचंद, टमाटे...सारे भलेमोठे – वचक्याएवढे. कलिंगड आपल्याकडच्यासारखं वाटोळं नसतं. (तसं बनवण्याचे नवीन प्रयोग तिकडे चालू आहेत.) तर दोन-अडीच फूट लांब अन् फूटभर रुंद. अर्थात एवढं मोठं सबंध कलिंगड फार करून कुणी खरेदी करीत नाही, म्हणून ते कापून त्याचे चार तुकडे केले जातात, आणि ते पॉलिथिनच्या पिशव्यांत घालून दुकानात मांडून ठेवतात.

लहानसान शहरांत वेगवेगळी लहान-मोठी दुकानं असतात. पण साधारण मोठाल्या शहरांतून 'माल' (MALL) म्हटली जाणारी प्रचंड नगर-पेठ उभारलेली असते. ही बाजारपेठ म्हणजे अनेक प्रकारची शेकडो दुकानं असलेली आटोपशीर नगरीच असते. आणि तीही सबंध एअर-कन्डिशन्ड !

या पेठेत नाना तऱ्हेच्या वस्तूंची एकाहून–एक मोठी अशी अनेक दुकानं असतात. जुन्या-नव्या पुस्तकाची दुकानंही या पेठेत हजेरी लावून असतात. शिवाय खाद्यपदार्थांची नि पेयांची दुकानं.

गंमत अशी की, जुना माल गुदामात टाकून गुदामांची भर करण्याची प्रथा अमेरिकी दुकानदारांत फारशी रूढ नाही. हंगामा-प्रमाणं जरुरीनुसार जो-तो माल दुकानात भरला जातो. अमेरिकेत मुख्य हंगामी ऋतू दोन–एक उन्हाळा, तर दुसरा हिवाळा. उन्हाळी हंगामात अधूनमधून पाऊसही पडतो. तर हिवाळ्यात हिमवर्षाव होऊन हिम म्हणजेच बर्फ सगळीकडे पडतं. पूर्व अमेरिकेचा, अगदी दक्षिणेकडचा टोकाचा प्रदेश फ्लोरिडा म्हणून आहे, तो भाग सोडला, तर उरलेल्या सगळ्या अमरिकेत हिवाळ्यात कमी-अधिक हिमवर्षाव होतोच.

हां ! तर बाजारपेठांची गोष्ट सांगायची म्हणजे कपड्यांच्या दुकानांत हंगामानुसार माल भरतात. ऑक्टोबरपासून मार्च अखेरपर्यंत हिवाळा असतो. म्हणून ऑक्टोबरच्या आधीच्या एक–दोन महिन्यांत उन्हाळी हंगामाला चालणारा माल दुकानदार साधारणपणे २५ ते ४० टक्के सवलतीनं, सेल लावून जास्तीत जास्त खपवून टाकतात. वर्तमान-पत्रांतही सेलच्या मोठमोठ्या जाहिराती देतात. जाहिरातींचे रंगीत फोल्डर्सही वृत्तपत्रांतून वाटतात. या जाहिरातींतून सवलतीची कुपनंही देतात. ही कुपनं त्या-त्या दुकानात घेऊन गेल्यास आणखी सवलत मिळते. अर्थ असा, की–जास्तीत जास्त सवलत देऊन झालं तरी आदल्या सरत्या हंगामाचा माल दुकानातून शक्य तेवढा कमी केला जातो. आणि मग येणाऱ्या हिवाळ्याच्या नवीन हंगामाला लागणारा लोकरी कप-ड्यांचा वगैरे साठा दुकानात केला जातो. हीच पद्धत पुढं हिवाळ्याच्या हंगामाअखेरही अवलंबतात.

लोकहो अशा सेलचा फायदा घेऊन कपड्यांची वगैरे खरेदी करतात.

'माल' या नगरपेठांत, देशभर आपल्या दुकानांचं जाळं पसरणाऱ्या 'सीअर्स,' 'के–मार्ट' अशा कंपन्यांची खास दुकानं असतात. तयार खाद्यपदार्थ, जेवणाचे तयार पदार्थ (इन्स्टन्ट फूड) पुरवणाऱ्या मॅक्डोनल्डसारख्या कंपन्यांचीही दुकानं, अमेरिकेच्या शहरोशहरी अन् सफरींच्या ठिकाणी हटकून असतात.

डेट्रॉइट शहराजवळच्या एका उपनगरात तर मजेदार व्यवस्था दृष्टोत्पत्तीस आली. एका उपाहारगृहाच्या आवारात सरळ मोटारनं शिरायचं. तर आतल्या प्रवेशद्वाराशी एका अंगाला फोनसारखं एक नळकांडं असतं. आपल्याला तिथले कोणकोणते खाद्यपदार्थ पाहिजेत नि ते किती पाहिजेत याची तोंडी यादी (ऑर्डर) त्या नळकांड्यातून मोटरीत बसल्या जागेवरून सांगायची. आणि आपली मोटरकार थोडी पुढं सरकवून एका लांबरुंद खिडकीशी उभी करायची. तर तिथं, मोटरीत बसल्याजागी आपल्या हातात, आधी प्रवेशद्वाराशी ऑर्डर दिल्याबरहुकूम सगळे खाद्यपदार्थ त्या खिडकीतून दिले जातात. आणि अर्थातच सोबत त्यांचं बिल, बिलाचे पैसे जागच्या जागी चुकते करायचे आणि खाद्यपदार्थांचं पुडकं घेऊन आपली कार वळवून आवाराबाहेर काढायची.

घरी किंवा सहलीला जाता-जाता वाटेत, कारमधून खाली उतरावं न लागता विनाखोळंबा खाद्यपदार्थ मिळवण्याची अशी ही जलद सेवा.

खाद्यपदार्थ मिळण्याची छोटी उपाहारगृहं लहानमोठ्या शहरांत असतात, तिथं बहुतेक ठिकाणी हवे ते पदार्थ आणून गिऱ्हाइकापुढं टेबलावर ठेवणारे वेटर्स (वाढपी) नसतात. बोर्डावर ठळकपणं खाद्यपदार्थांची नावं अन् त्यांच्यापुढं त्यांचे दर अशी यादी लिहिलेली असते. तर उपाहारगृहाच्या मागच्या भागात लांबचलांब आडवा कौंटर असतो, तिथं आपण जायचं. बाजूला असलेल्या प्लॅस्टिकच्या ट्रेंच्या चळतीतला एक ट्रे उचलून घ्यायचा. कौंटरवर पदार्थ उघड्यावरच ठेवलेले असतात. तिथले हवे–ते पदार्थ उचलून ट्रेमधं भरून घ्यायचे. ते घेऊन थोडं पुढं

सरकायचं. तिथं कॅशियर असतो. तुमच्या ट्रेमधल्या पदार्थांच्या एकूण किंमतीचं बिल (यंत्रावर चटकन हिशेब करून) तो कॅशियर तुमच्या हाती देईल. ते तिथल्या तिथे चुकतं करायचं. मग खाद्यपदार्थांचा आपला ट्रे घेऊन एका टेबलाशी जाऊन बसायचं. प्लॅस्टिकचे चमचे तिथंच मिळतात. त्यांतले हवे तेवढे घेऊन ते पदार्थ खायचे. त्यानंतर ट्रेमधं उरलेला टाकाऊ भाग अन् वापरलेले प्लॅस्टिकचे चमचे अन् पेयांचे कागदी पेले, उपाहारगृहातच एका अंगाला असलेल्या कचऱ्याच्या उंचशा बंद पेटीत नेऊन टाकायचे. (कळ दाबताच ही पेटी उघडते, तशीच लगेच बंद होते.) मग प्लॅस्टिकचा तो ट्रे जवळच्या रिकाम्या टेबलावर ठेवून द्यायचा; अन् उपाहारगृहाबाहेर पडायचं. या उपाहारगृहातील या 'सेल्फ-सर्व्हिस' (स्वतःच पदार्थ घेऊन खाण्याच्या) पद्धतीत खाद्य-पदार्थ टेबलावर आणून देणाऱ्या वाढप्यांना फाटा दिलेला असतो. त्यामुळं नोकरांवरील खर्चात बरीच बचत होते. म्हणून अशा उपाहार-गृहात पदार्थ त्या मानानं स्वस्त मिळू शकतात. याउलट, वेटर (वाढपी) असलेल्या मोठ्या उपाहारगृहात पदार्थ बरेच महाग मिळतात. एवढंच नव्हे, तर पदार्थ खाऊन झाल्यावर बिल चुकतं करताना भरीला वेटरला 'टिप्' (बक्षिशी) पण द्यावी लागते. तसा दंडकच आहे. मात्र एक—अशा मोठ्या उपाहारगृहात आपण तिघांचौघांनी वाटून खाण्या-साठी 'पिझ्झा'सारखा खाद्यपदार्थ भलामोठा मागवला; आणि आपल्याला तो सगळा खाऊन संपवता आला नाही समजा. तर वेटरला सांगताच उरलेला तुकडा तो वेटर पुडक्यात बांधून देतो. तो आपल्याला घरी नेता येतो नि सवडीने खाता येतो. एरव्ही उरलेला तो पदार्थ नाहक फुकट गेला असता. उरलेला पदार्थ पार्सल बांधून असा घरी घेऊन जाणं अमेरिकेत बिलकूल लज्जास्पद मानलं जात नाही.

* *

# मुलांची कुचंबणा

अमेरिकेत सगळी सुबत्ता आहे. खायची-प्यायची, अन् उप-भोगाच्या साधनांची भारे चगळ आहे मोठ्या माणसांप्रमाणं मुलंही या सुबत्तेची वाटेकरी आहेत. पण अमेरिकेतील जीवनव्यवहारच असा आहे की तिथल्या लोकांच्या राहणीत बराचसा एकांडेपणा आढळतो. त्यातून मोठी माणसं आपापल्या काम-उद्योगांत गढलेली असतात. त्यामुळ त्यांचा वेळ धकून जातो. कुचंबणा होते ती बिचाऱ्या मुलांची

अमेरिकेत लोकांच्या वस्तीची गावं नेटक्या रचनेच्या कॉलनी-सारखी असतात; आणि ती मोठाल्या–नोकरीच्या वगैरे शहरापासून साधारणपणं पंधरा ते तीसेक मैल अंतरावर असतात. वस्तीच्या कॉल-नीत फक्त घरं असतात अन् तीही एका रांगेत बांधलेली. घरांसमोर मोटारचा नितळ रस्ता अन् त्या पलीकडे समोर पुन्हा घरांची रांग. प्रत्येक घराला लागून लहानशी आटोपशीर बाग असते. तर घराच्या प्रवेशद्वाराच्या एका अंगाला मोटार ठेवण्यासाठी गराज असते

घरांचा लहान-मोठा आकार सोडला, तर बहुतेक घरांची रचना अशी असते– तळघर, तळमजला व वरचा मजला. धुलाईयंत्र, घरच्या घरी सुतारकाम करण्याची हत्यारं वगैरे गोष्टी तळघरात ठेवलेल्या असतात. तळमजल्यावर बैठकीची खोली व स्वयपाकघर असतं. तर वरच्या मजल्यावर झोपायच्या खोल्या, स्नानगृह व प्रसाधनगृह अशी व्यवस्था असते. टी. व्ही. बहुधा तळमजल्यावरच्या बैठकीच्या खोलीतच असतो. वरच्या मजल्यावरच्या म्हणजेच माडीवरच्या खोल्यांत मुलां-साठीही वेगवेगळ्या खोल्या असतात.

जाता–जाता सांगायचं म्हणजे ... राहण्याची ही घरं पूर्णपणं लाकडी असतात. भिंती तर लाकडी असतातच; पण तळमजल्यापासून सगळ्या जमिनीही लाकडी फळ्यांच्या बनवलेल्या असतात. लाकडी भिंतीवर प्लॅस्टरचा पातळ गिलावा केलेला असतो. घरं लाकडी असल्यानं घरात विस्तव साहजिकच जपून वापरावा लागतो. नाहीतर एखाद्या ठिणगीसरशी घर पेटून जायचं की ! माझा एक वयस्क मित्र एकदा अमेरिकेत आपल्या मुलाकडे गेला होता. त्यानं आपल्याबरोबर आपल्या देव्हाऱ्यातले निवडक देव नेले होते. तर तिकडच्या त्या घरात तो आपल्या देवांपुढं निरांजन पेटवून लावू लागला. तर मुलगा बापाला निरांजन न लावण्याबद्दल सांगून म्हणाला–

" निरांजनाच्या ज्योतीची ठिणगी वाऱ्यानं भिंतीवर वगैरे उडाली तर लाकूड पेट घेण्याचा धोका संभवतो. म्हणून खबरदारी घ्यावी लागते. हयगय करून चालत नाही. नाहीतर अनवस्था प्रसंग ओढवायचा."

हा वेगळा भाग झाला. पण एका आळीत, एका ओळीत असणाऱ्या या घरांची एकमेकांपासून फारकत केलेली असते. प्रत्येकाचा जणू सवतासुभा ! शेजाऱ्याशीही कसला म्हणून संबंध नसतो. संभाषणच फार करून नसतं. अगदी समोरासमोरच गाठ पडली, तर उजवा हात वर करून, कसनुसं हसत ' हाय्य ' म्हणून अमेरिकी पद्धतीची शुभेच्छा व्यक्त करायची, अन् वेळ मारून न्यायची, हा एकूण तोंडदेखला खाक्या. एकमेकांची साधी चौकशी करणं म्हणजे दुसऱ्याच्या घरेलू व्यवहारात नाक खुपसणं, असं मानलं जातं.

हे झालं मोठ्या माणसांचं सर्वसाधारण वागणं. ती बहुधा सबंध दिवस नोकरी वा कामधंद्यानिमित्त घराबाहेरच असतात. पण माँटेसरीत किंवा शाळेत जाणाऱ्या मुलांनी शेजारच्या किंवा आळीतल्या मुलांशी खेळायची तर बातच सोडा; साधा बोलण्या-वागण्याचाही संबंध येऊ द्यायचा नसतो, असा जसा काही अलिखित करारच झालेला असतो !

पाच वर्षांपर्यंतची मुलं लगतच्या छोट्या शहरातल्या, माँटेसरीच्या धर्तीवरील 'डे–केअर' सारख्या छोट्याशा शाळावजा, मुलं सांभाळणाऱ्या संस्थेत पाठवली जातात. 'पाठवली जातात' म्हणजे काय, नेऊन पोचवली जातात, आणि संध्याकाळी परत आणली जातात. एक प्रकारे ही मुलं ठराविक वेळ अडकवून ठेवली जातात. कारण आई–बाबा...दोघांनाही बाहेरच्या शहरात नोकरीला जायचं असतं. मग मुलांची काय व्यवस्था लावायची हा प्रश्नच असतो. तसं म्हणजे बारा वर्षांखालील मुलाला एकटं घरी ठेवून जाण्याला तिकडे कायद्यानंच बंदी आहे. म्हणून आई किंवा बाबा आपल्या सोयीनुसार पाच वर्षांपर्यंतच्या आपल्या मुलाला 'डे–केअर' संस्थेत; नाहीतर त्याहून मोठ्या मुलाला सार्वजनिक (पब्लिक) किंवा खाजगी शाळेत नेऊन पोचवत असतात. आणि संध्याकाळी आपण कामावरून घरी परतत असताना मुलालाही घरी घेऊन येत असतात. अशा प्रकारं दिवसाचा काही तासांचा वेळ मुलाच्या दृष्टीनं निभावून गेलेला असतो. पण घरी अगदी सकाळचा व संध्याकाळचा त्याचा वेळ कसा जायचा हा प्रश्नच असतो. शाळेत जाणाऱ्या मुलाचा थोडाफार वेळ अभ्यासात जातो हे खरं; पण बाकीचा वेळ घरात बसून काय करणार ? घरी दूरदर्शनची सोय असते. पण शनिवार–रविवार हे सुट्टीचे दिवस सोडल्यास इतर दिवशी, मुलांनी पाहण्याजोगे कार्यक्रम फार करून नसतात.

अशा स्थितीत घरी एकच एक मूल असलं तर एकलेपणा त्याला खायला उठतो. कारण आई–बाबा घरी असल्या वेळीही बहुधा आपापल्या कामांत दंग असतात. मुलं त्यांच्या मागं लागली, त्यांचा वेळ घेऊ लागली म्हणजे ती वैतागतात. मग मुलं हिरमुसली होतात. कंटाळून रडतात–ओरडतात, हट्ट करतात. एकूण कसातरी आपला वेळ घालवण्याचा प्रयत्न करतात. तर अशा स्थितीत त्या मुलाचा वेळ जावा, त्याला विरंगुळा मिळावा म्हणून त्याला वारंवार नवनवीन खेळणी आणून दिली जातात. कारण जुन्या खेळण्यांशी खेळून मूल कंटाळून जातं. वरच्या माडीवर मुलाची स्वतंत्र खोली असते. त्या खोलीचा एक

कोपरा नाना तऱ्हेच्या खेळण्यांनी भरलेला असतो. मुलं मोठी होत जातात तसतशी त्यांना आवडणारी खेळणी बदलत असतात. थोडचा मोठचा मुलांना मेकॅनोसारखी प्रयोगशील खेळणी आणून दिली जातात.

एखाद्या घरात दोन भावंडं असली, तर मात्र एकमेकांशी खेळण नाहीतर आपसांत रुसणं–रागावणं नि भांडणं या गोष्टींत त्या दोघांचा वेळ जातो.

मुलं अधिक मोठी झाली, महाविद्यालयांत वगैरे जाऊ लागली, म्हणजे त्यांचे आवडीचे, आकर्षणाचे विरंगुळचाचे विषय वदलतात. त्यांना दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांत आणि आवडीच्या पुस्तकांच्या वाचनात रस घेता येतो. आई–बाबांशी त्यांचा जरुरीपुरताच संवाद घडत असतो.

आठवडचाचे पाच दिवस मुलांची घरी कुचंबणा होते म्हणून त्यांच्या, आणि एकपरी स्वतःच्याही विरंगुळचासाठी, आठवडचा-अखेरच्या शनिवार–रविवारच्या सुटीच्या दिवसांत काही कुटुंबं कुठंतरी सहलीला वगैरे जातात. तिथं मुलांना उघडचावर मोकळेपणानं खेळता–वागडता येतं. तेवढचापुरती तरी मुलं खूष असतात.

सर्वांत मोठा प्रश्न असतो तो, 'डे–केअर' मधल्या किंवा शाळे-तल्या मुलांना पडणाऱ्या दीर्घकाळच्या वार्षिक सुटीचा ! ही सुटी जूनच्या मध्यापासून थेट सप्टेंबरच्या पहिल्या आठवडचाअखेरपर्यंत असते. तीनेक महिन्यांची ही सुटी मुलांनी कशी घालवायची हा एक प्रश्न आई–बाबांपुढं उभा राहतो. अशा वेळी आई–बाबाही आपल्या नोकरीवरून रजा घेतात. आणि ऐपतीनुसार अमेरिकेतच एखादी लहान-मोठी सफर काढतात. तर एखादं भारतीय कुटुंब तीनचार वर्षांनी एखाद्या खेपेला भारताकडे महिन्याभराचा फेरफटका मारून वेळ निभावून नेतं. पण आई–बाबांना त्यांच्या नोकरीवर परत जायचं अस-ल्यानं महिन्याभरानं अमेरिकेतल्या घरी परतणं भाग पडतं.

भारतीय कुटुंबातल्या आई–बाबांना भारतातली ही पुनर्भेट तशी सुखावह होते. भारतातल्या त्यांच्या पूर्वायुष्यातल्या आठवणींना उजाळा मिळतो. पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो. आपल्या निकटच्या नातेवाइकांना भेटण्याचं सुख लाभतं. पण लहान मुलांचं काय ? जन्मल्यापासूनच ती अमेरिकेत लहानाची मोठी झालेली. त्यांची मातृभाषाही इंग्रजीच बनलेली. (मात्र क्वचित का होईना, एखादं असं तुरळक उदाहरण आढळतं, की...मराठीभाषी आई–बाबा आपल्या लहानग्या मुलांना घरी मराठीच बोलण्याचा सराव करतात. भारतीय संस्कृतीच्या गोष्टी यथाशक्ती मुलांच्या कानावर घालतात. पण ही उदाहरणं अपवादादाखल) अशा कुटुंबातील मुलं भारत–भेटीत चक्क उपऱ्यासारखी वागतात. आधी मराठी भाषेचं वाकडं, त्यात अमेरिकेच्या तुलनेनं भारतातल्या सगळ्या मागासलेल्या गोष्टी, मागासलेलं वातावरण...वगैरे पाहून ही मुलं भारतात गोंधळतात–भांबावून जातात, अमेरिकेतले नेहमीच्या खाण्यातले खाद्यपदार्थ इथं मिळत नसल्यानं तिकडूनही त्यांची कुचंबणा होते. अशा वेळी त्यांचे भारतीय आई–बाबा त्यांना कसं कुशलतेनं हाताळतात, त्यांची मनं कशी कळवतात यावर त्या मुलांचं मन इथं रमणं अवलंबून असतं. नाही तर आई–बाबांबरोबर राहायचं म्हणून राहायचं अशा निरुपायान ती मुलं इथल्या मुक्कामातील दिवस कंटाळवाणेपणानं घालवतात. कधी एकदा आपण अमेरिकेत आपल्या नेहमीच्या जीवनात परत जाऊन सामील होतो, अशी ओढ त्यांना लागलेली असते. मात्र ज्या मुलांवर मराठी भाषा, आपली भारतीय संस्कृती यांचे थोडेफार संस्कार त्यांच्या आई–बाबांनी केलेले असतात ती मुलं इथल्या वातावरणात बरीचशी समरस होतात. कारण बदललेल्या भारतीय वातावरणाशी ती मुलं जुळवून घेतात. इकडच्या गोष्टी ती कुतूहलानं पाहतात. त्यामुळं या मुलांना अमेरिकेला परत जाण्याची ओढ अशी लागत नाही. उलट अमेरिकेत खुराड्यात राहिल्यासारखी जी अवस्था होते ती पालटून आपणाला मोकळेपणानं मोकळ्या वातावरणात खेळायला–बागडायला मिळतं म्हणून ही मुलं काहीशी खूषच झालेली

असतात. एवढी की इथल्या काही मजेदार आठवणी ती मुलं अमेरिकेत बरोबर घेऊन जातात.

—तर अशी ही अमेरिकेतल्या मुलांच्या कुचंबणेची थोडक्यात हकीगत.

✳ ✳

८२० ३६२९२ ५।२५।९

# अमेरिकेतील ग्रंथविक्रीचे व्यवहार

नुकताच अमेरिकेत जाण्याचा योग आला, तेव्हा तिकडील ग्रंथ-विक्रीचे व्यवहार पाहण्याची संधी मिळाली, तर त्याबद्दलची माहिती आपल्याकडील ग्रंथविक्रेत्यांना व ग्राहकांना उद्बोधक ठरेल या अपेक्षेने इथं देत आहे.

तिकडे न्यूयॉर्कसारख्या मोठाल्या शहरांत भलेमोठे बुकडेपो आहेत. ललित पुस्तकांखेरीज इतर विषयांची पुस्तकं विभागवार वेगवेगळ्या दालनांत मांडलेला दिसतात. दालनं मोठीमोठी असल्यानं रॅक्सखेरीज लांब रुंद टेबलांवरही प्रदर्शनातल्यासारखी पुस्तकं आकर्षक रीतीनं मांडून ठेवलेली आढळतात. ललित पुस्तकं तर लेखकांच्या नावांनुसार क्रमानं एकत्र ठेवलेली असतात. त्यामुळं ग्राहकांना हवी ती पुस्तकं शोधून काढणं सोपं जातं. मुलांच्या पुस्तकांचा तर वेगळाच विभाग असतो.

नवनवीन पुस्तकं तसंच त्या त्या दिवसांतली सर्वांत जास्त खप होत असलेली पुस्तकं खास जागेवर मांडण्यात येतात. काही महिने हजारोंनी खपलेली पुस्तकं कमी–अधिक सवलतीनं विकतात. त्या पुस्तकांवर मूळ किंमत व सवलतीची किंमत नोंदवलेल्या बारीक बारीक चिट्ठ्या चिकटवलेल्या असतात. दुसरा 'बार्गेन' (Bargain) म्हणून एक विभाग ठेवलेला असतो. काही वर्षांपूर्वीची पुस्तकं ज्यांना चालू बाजार नाही अशी, या विभागात मांडलेली असतात. ही पुस्तकं मूळ किमतीच्या अर्ध्या-पाऊण किमतीला विक्रीस ठेवलेली असतात,

मात्र अशाच एका मोठाल्या बुकडेपोतले तरुण सेल्समन पुस्तकाचे चांगले जाणकार असल्याचं आढळून आलं नाही. 'अमुक एक पुस्तक तुमच्या इथं आहे का ! ते कुठं सापडेल ? ' अशी चौकशी त्यांच्याकडे केली तर त्यांना नीटसं काही सांगता येईना, मला स्वतःलाच सगळीकडे फिरून ते पुस्तक शोधून काढावं लागलं. त्यामानानं आपल्याकडे पुण्या-मुंबईतल्या अनेक बुकडेपोतले सेल्समन अधिक जाणकार आहेत.

काही बुकडेपोंच्या तळघरातही पुस्तकं मांडून ठेवलेली आढळतात. इंग्रजीत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या बरीच असल्यानं हा वाढता. व्याप अशा तऱ्हेनं सांभाळला जातो.

मिशिगन स्टेट विद्यापीठात एका भल्यामोठया तळघरात विद्यार्थ्यांसाठी डिपार्टमेन्ट स्टोअर ठेवलेलं आहे. त्यात पुस्तकांचाही एक विक्रीभाग आढळला. तिथंही सवलतीच्या पुस्तकांचा 'बार्गेन' विभाग होता. त्याचप्रमाणे लौकरच प्रसिद्ध होणाऱ्या काहीं पुस्तकांच्या प्रकाशन पूर्व नमुनाप्रती ठेवलेल्या पाहिल्या. त्यांतल्या आपल्या हव्या असलेल्या पुस्तकासाठी आपल्याला तिथं आर्डर नोंदवता येते.

लहानसान शहरांत सेकंडहँड बुकडेपो असतात. नेब्रास्का राज्यातील ओमाहा शहरात अशाच एका जुन्या पुस्तकांच्या दुकानात गेलो, तर तिथं जवळ जवळ नवीन असलेलीही काही पुस्तकं होती. बट्रांड रसेलचं 'मॅरेज अँड मॉरल्स' हे पुस्तक जवळ जवळ नव्या स्वरूपात पण पावपट किमतीला मिळालं. अमेरिकेत बरेचसे वाचक आपल्या घरात पुस्तकांचा संग्रह करीत नाहीत. हवं तेव्हा एखादं पुस्तक खरेदी करायचं आणि वाचून झाल्यावर ते स्वस्तात सेकंडहॅन्ड बुक डेपोला विकून टाकायचं, असं बहुतेक वाचक करतात. उपनगरांत 'गराज सेल' (Garage Sale) काही शेड्समधे चालतात. शनिवार रविवार या सुटीच्या दिवसांत इथं हा सेल चालतो. या सेलमधे कपड्यांसह घरातल्या इतर अनेक लहान मोठ्या चीजवस्तू स्वस्त विकल्या जातात. त्यांत नवी–जुनी पुस्तकंही असतात. जवळपासचे रहिवासी घरात नको

असलेल्या चिजा अगदी कमी किंमतीला या सेलवाल्यांना देऊन टाकतात. थोडासा फायदा घेऊन या चिजा सेलवाले विकतात. या सेलमधल्या चिजा खरेदी करण्यासाठी शनिवारी–रविवारी अनेक ग्राहक येतात. अशा काही सेलमधे मला जवळ जवळ नवीन अशी काही पुस्तकं अगदी माफक किंमतीला मिळाली.

साधारण मोठ्या शहरात 'माल' म्हणून वेगवेगळ्या वस्तूंच्या स्टोअर्सची लहानशी नगरीच असते. ऐसपैस पसरलेली ही सबंध नगरीच एअर–कंडिशन्ड असते. सर्व प्रकारच्या चीजवस्तूंच्या स्टोअर्सप्रमाणे इथं पुस्तकांची दुकानंही असतात ! इथल्या काही बुकडेपोंत नवीन पुस्तकां-प्रमाणं जुनी पुस्तकंही असतात.

दुसरी एक गोष्ट अशी आढळली, की लहानसान शहरांत विविध जीवनवस्तूंची जी मोठाली दुकानं असतात, त्यांतसुद्धा पुस्तकांच्या चार दोन रॅक्स ठेवलेल्या असतात. म्हणजे इतर वस्तू खरेदी करायला आलेल्या ग्राहकाला समोरची पुस्तकं पाहून त्यातलं एखादं खरेदी कर-ण्याचा मोह होतो. कारण मुद्दाम वेळ काढून एखाद्या बुकडेपोत जावं न लागता त्याला जाता–जाता सहज ही पुस्तकं हाताशी उपलब्ध होतात.

प्राणिसंग्रहालय, नॅचरल हिस्टरी म्यूझियम, एम्पायर स्टेट बिल्डिंग वर्ल्ड ट्रेड सेन्टर, सीअर्स टॉवर अशा जगातल्या एकाहून एक उंच इमा-रती, वगैरे प्रेक्षणीय स्थळांच्या ठिकाणीही कुठं पशु-पक्ष्यांची तर कुठं इतर ललित पुस्तकं जाड तारांच्या रॅक्सवर विक्रीसाठी ठेवलेली असतात.

हा झाला ग्रंथविक्रीचा व्यवहार. पण लोकांत वाचनाची आवड निर्माण व्हावी व ती वाढत जावी म्हणून तिथल्या लहानमोठ्या शहरांत एकेक मोठाली 'पब्लिक लायब्ररी' (सार्वजनिक ग्रंथालय) असते. त्या त्या शहराच्या महापालिकेतर्फे चालविल्या जाणाऱ्या या ग्रंथालयात सर्व विषयांवरची पुस्तकं असतात. एकेका खेपेला दहा–दहा पंधरा-पंधरा

पुस्तकं मोफत वाचायला दिली जातात. मात्र ही पुस्तकं ठरलेल्या मुदतीत परत करावी लागतात. नाही तर दंड भरावा लागतो. या ग्रथालयात संदर्भग्रंथ वगैरे पुस्तकं बसून वाचण्याचीही सोय केलेली असते. खुर्च्या-टेबलं भरपूर मांडलेली असतात. मुलांच्या पुस्तकांचा वेगळा विभाग असतो; आणि त्यांच्यासाठी लहान लहान खुर्च्या टेबलं ठेवलेली असतात.

अनेक शहरांतल्या ग्रंथालयांत अलीकडे संगणकांचा (कॉम्प्युटसंचा) वापर करण्यात येतो. या योजनेमुळं ग्रंथालयांच्या सभासदाला रीतसर नोंदून दिलेल्या पुस्तकांखेरीज दुसरं एखाद पुस्तक गुपचूपपणं चोरून न्यायला आडकाठी झाली आहे.

म्हणजे असं की, ग्रंथालयातून ठराविक दरवाज्यातून बाहेर जावं लागतं. तर तिथं दाराशी साधारणपणं हातभर लांबीची एक पोलादी दांडी आडवी ताठ उभारलेली असते. तशी ती असताना अर्थातच कुणाला सहजासहजी बाहेर पडता येत नाही, संगणकामार्फत त्या दांडीचं नियंत्रण मॅग्नेटिक इफेक्टनं केलं जातं. ग्रंथालयानं रीतसर नोंदून घेतलेली तेवढीच ती दांडी सैल होऊन आपोआप बाजूला सरकते आणि तो सभासद मोकळेपणानं दाराबाहेर पडू शकतो. पण तेच एखाद्या सभासदानं नोंदणी करून घेतलेल्या पुस्तकांखेरीज एखादं जादा पुस्तक गुपचूप आपल्या बॅगेत सारलं असेल (म्हणजेच चोरटा व्यवहार केला असेल) तर तो सभासद दरवाज्यापाशी येताच ती आडवी दांडी जागची हलणारच नाही, अर्थात तो सभासद महाशय बाहेर न पडता आल्यानं आतच अडकून पडणार ! असं झालं म्हणजे त्याचं चोरीचं बिंग फुटतं. त्यान गुपचूप बळकावलेलं ते नोंदणी बाहेरचं जादा पुस्तक ग्रंथपालाकडे एक तर परत करावं लागतं, नाही तर ते रीतसर नोंदून घ्यावं लागतं, त्यानंतरच त्या दारातून सुटका होऊ शकते. कारण मग दारातली ती आडवी दांडी त्याला बाहेर जायला आडकाठी न करता बाजला सरकते.

संगणकाचा हा चमत्कार तर आहेच. पण या योजनेमुळे ग्रंथ चोरीला अर्थातच आळा बसला आहे.

लोकल रेल्वेगाड्यांच्या स्टेशनावरील फलाटावर जाण्याच्या प्रवेश दाराशीही अशीच आडवी ताठ दांडी असते. त्या दांडीलगतच्या एका पोकळ खांबाच्या वरच्या बंद झाकणाला एक खाच असते. त्या खाचेत रेल्वेगाड्यांच्या ठरलेल्या भाड्याएवढी नाणी टाकावी तेव्हाच ती दांडी ढिली होऊन बाजूला सरते; आणि मग प्रवाशाला स्टेशनच्या फलाटा-वर जाता येतं तो प्रवासी आत जाताक्षणीच पुन्हा ती दांडी आडवी ताठ होऊन प्रवेश रोखून धरते. तसाच काहीसा हा प्रकार थोड्या वेगळ्या तऱ्हेनं ग्रंथालयात संगणकाच्या साहाय्यानं अवलंबण्यात आलेला आहे.

* *

# रद्दीची सद्दी, पण...कचऱ्याची भरती

अमेरिकेतील प्रमुख शहरांतली प्रमुख वृत्तपत्रं रोज साधारणपणं पाऊणशे पृष्ठांची निघतात. (त्यांतली बहुसंख्य पृष्ठं जाहिरातींनी भरलेली असतात म्हणा.) तर रविवारचे अंक तब्बल दीडेकशे पृष्ठांचे असतात. पण एवढे भरगच्च अंक निघत असूनही रद्दीच्या दृष्टीनं त्यांना अक्षरशः काडीइतकीही किंमत नाही. रद्दीला तिकडे कुणी ढुंकूनसुद्धा विचारीत नाही. त्यामुळं बहुतेकजण आपल्या घरची रद्दी गार्बेजच्या (कचऱ्याच्या) प्लॅस्टिकच्या पोत्यात टाकून त्या रद्दीची चक्क विल्हेवाट लावतात. खरं तर घरोघर वृत्तपत्र घेतलं जातं असं नाही. टी. व्ही. वरच्या अनेक वाहिनींवर (चॅनेल्सवर) दिवसातून अनेक वेळा बातम्या सांगतात. त्यामुळं बातम्यांसाठी वेगळं वृत्तपत्र घेण्याची जरुरी अनेक-जणांना वाटत नाही. घटनांचा तपशील व राजकारणाचा मागोवा यांबद्दल अगत्य बाळगणारे लोकच काय—ते वृत्तपत्र घेतात. पण रद्दीला मुळीच भाव नसल्यानं कुणीकुणी, वाचून झालेले आपले अंक खुशाल भुयारी रेलगाडीत किंवा बसमधं बाकावर टाकून निघून जातात.

आपल्याकडे रद्दीला विशेषतः महिन्याअखेर मध्यमवर्गीय माण-साला केवढं महत्त्व असतं ! त्यावेळी पगाराचे पैसे संपत आलेले असतात. त्यामुळं रद्दीच्या पैशांचा थोडासा तरी हातभार निकड भागवायला लागतो. साहजिकच त्यामुळ रद्दीचं मोल विशेष वाटतं. पण अमेरिकेत रद्दी मुबलक असूनही तिला तिकडे कस्पटासमान लेखलं जातं. (हे पाहून माझ्या मनात अशी गमतीची कल्पना आली, की—फुकट जाणारी ही टनांवारी रद्दी मोठ्या प्रमाणात जमवायची, आणि बोट भरून भारतात

पाठवायची. हो ! भारतात या रद्दीचे हजारो रुपये मिळतील की...! )

कुणीकुणी मात्र आपल्या घरची रद्दी घरीच जमवून ठेवतात. आणि रद्दीचा लगदा बनवणारी कागदगिरणी असते, तिला ही रद्दी देऊन टाकतात. गिरणीचा माणूस ठराविक दिवशी दारावर येतो आणि वाहनातून रद्दीचा गठ्ठा घेऊन जातो. अर्थात् ही रद्दी फुकटच दिली जाते. एरव्ही कचऱ्यात टाकण्याऐवजी कुणाच्या तरी ती उपयोगी पडते, सत्कारणी लागते, एवढंच समाधान मानायचं.

### टी. व्ही. ची अखंड सोबत

अमेरिकेत टी. व्ही. वर वेगवेगळे कार्यक्रम आणि सचित्र बातम्या सादर करणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. टी. व्ही. चं जाळं या खासगी कंपन्यांमार्फतच चालतं. सरकारचं त्यांच्यावर नियंत्रण नाही. त्यामुळं चांगले–चांगले कार्यक्रम व दृश्यांसह ताज्या–ताज्या बातम्या, आपापल्या वाहिनीवर सादर करण्याच्या बाबतीत त्यांची चढाओढ लागलेली दिसते. समाजातली गैर कृत्यं चव्हाट्यावर आणली जातात. तशीच सरकारच्या कसुरीवरसुद्धा बेधडक टीकेची झोड उठवली जाते.

विशेष म्हणजे कार्यक्रम सादर करण्याबद्दल ग्राहकांकडून या कंपन्या मूल्य मुळीच आकारत नाहीत. कारण आपापल्या वाहिनीवर त्या दाखवीत असलेल्या सर्व प्रकारच्या जाहिरातींपोटी त्यांना अमाप उत्पन्न मिळतं. चांगले कार्यक्रम, मालिका सादर करणाऱ्या चॅनेलला (वाहिनीला) अधिक लोकप्रियता लाभते. त्यामुळं साहजिकच त्यांचं जाहिरातीचं उत्पन्न वाढतं.

दोन-तीन प्रमुख वाहिनींपैकी एक आहे 'ए. बी. सी.' ही वाहिनी. १९८४ साली मी अमेरिकेत गेलो होतो, तेव्हा तिकडे ऑलिम्पिकचे सामने चाललेले होते. तर ते टी. व्ही. वर दाखवण्याचे मुख्य हक्क घेतले होते या 'ए. सी.' वाहिनीनं. त्यासाठी अर्थातच लाखो डॉलर्स द्यावे लागले. तर त्याची भरपाई करण्यासाठी या कंपनीनं,

आपल्या कार्यक्रमांतून जाहिरातींचा अक्षरशः पाऊस पाडला. तो पाऊसही साधासुधा नव्हता. तर होता मुसळधार. ऑलिम्पिकचे सामने दाखवताना तर या पावसाला ऊतच यायचा. म्हणजे सामन्यांपूर्वी व सामन्यांनंतर जाहिरातींच्या जलधारा तर कोसळायच्याच. पण त्याखेरीज चालू सामन्यातही वारंवार सरी पडायच्या. कारण सामने चालू असताना मध्ये दिसणाऱ्या जाहिरातींकडे प्रेक्षकांचं कटाक्षानं लक्ष जातं; म्हणून प्रायोजक कंपन्यांच्या नावांच्या पाट्या त्यावेळी तत्परतेनं दाखवल्या जात. सामन्याच्या दृश्यांवरच ठळकपणं गोंदल्यासारख्या. या खास व्यवस्थेसाठी मुबलक दर आकारलेले असतात.

एखाद्या रात्री जुना नावाजलेला चित्रपट एखाद्या चॅनेलवर दाखवला जातो. पण या वेळी जाहिरातीच्या भडिमाराचा कळस होतो. कारण चालू चित्रपटात अधूनमधून जाहिरातींचा एवढा भडिमार चालू असतो, की—जेवणात पक्वान्नाचा घास खाताना दातांत खडा सापडावा तसा कथानकाचा रसभंग होतो. आणि जेवढ्या वेळाचा चित्रपट असतो त्याच्या जवळजवळ दीडपट वेळ त्या चित्रपटाला प्रत्यक्षात लागतो.

मात्र अमेरिकेत एक बरं आहे. सर्व वाहिनीवरच्या दैनंदिन कार्यक्रमांचं तारीखवार वेळापत्रक देणारी पुस्तिका दर आठवड्याला निघते. तिची वर्गणी भरली म्हणजे ती पुस्तिका टपालानं घरपोच येऊन पडते. यामुळं चांगली सोय होते. आपण बघायचे कार्यक्रम खुणा करून आगाऊ नोंदून ठेवता येतात.

एका वाहिनीवर रविवारी सकाळी छायागीतासारखा भारतीय हिंदी चित्रपटगीतांचा कार्यक्रम होतो. तर अधूनमधून एखादा हिंदी चित्रपटही दाखवतात. या कार्यक्रमांच्या निमित्तानं, अमेरिकेतल्या अनेक शहरांत असलेल्या भारतीय दुकानांची जाहिरात केली जाते. खास भारतीय पदार्थ व वस्तू अमेरिकेतल्या भारतीयांना पुरवणारी ही दुकानं असतात. पापड—लोणचं, धान्यं, डाळी, इडली-डोसा वगैरे पदार्थांची तयार पिठं, असे नाना भारतीय जिन्नस ही दुकानं पुरवतात. भारतीय

साड्यासुद्धा. कुतूहल म्हणून अमेरिकी लोकही काही-काही भारतीय पदार्थ व वस्तू या दुकानांतून खरीदतात, बरं का !

एकूण काय निरनिराळ्या लोकांच्या निरनिराळ्या गरजा भागवाव्या आणि येन केन प्रकारेण आपलीही कमाई वाढवावी, अशी अमेरिकेतल्या टी. व्ही. वाहिन्या चालवणाऱ्या कंपन्यांची धडपड चाललेली असते

* *

# अमेरिकेतील वनसंपत्ती

मनुष्यप्राणी हा निसर्गातल्या इतर प्राण्यांसारखाच निसर्गाचा एक अंश आहे, याची नीट जाणीव आपल्याकडे क्वचितच एखाद्या माणसाला असेल ! ही जाणीव नसल्यामुळेच माणूस निसर्गाशी फटकून वागताना दिसतो परिणामी माणूस दिवसेंदिवस निसर्गाशी आपली अधिकाधिक फारकत करून घेत चाललेला आहे.

**अमेरिकेतील परिस्थिती**

आपल्या देशाच्या उलट अमेरिकेत किती आस्थेनं वनसंगोपन व संवर्धन केलं जातं याची प्रचीती, नुकत्याच केलेल्या अमेरिकेच्या धावत्या फेरफटक्यानंतर झाली. खरं तर अठराव्या शतकापर्यंत तिकडेही सर्रास झाडतोड होत होती. इंग्रजादि युरोपीय लोकांनी तिथं जाऊन प्रथम वसाहती केल्या. तेव्हापासून झाडतोडीला ऊत आला होता. पण या झाडतोडीचा धोका दाखवून इशारा देणारे वनश्रीचा आदर करणारे जाणकार तिकडे अधूनमधून उपजले. १६८१ साली विल्यम पेन यानं दूरदृष्टी बाळगून आपल्या भू–खरेदीच्या करारात असं नमूद केलं होतं की पेन्सिल्व्हानिया आणि न्यूइंग्टन शहरात प्रत्येक सहा एकरांच्या क्षेत्रात किमान एका एकरातील झाड-झाडोरा कटाक्षानं राहू द्यावा. न्यूहॅम्पशायरमधे तर १७१० साली सामाजिक मालकीचं जंगल स्थापन केलेलं होतं. अर्थात त्या काळात हे अपवादच होते. बहुतेक ठिकाणी झाडांची लांडगेतोडच चालायची.

अठराव्या शतकात जंगलाच्या बेसुमार विध्वंसाचे अनिष्ट परिणाम स्पष्ट दिसू लागले. झाडतोड झालेल्या मॅसाचुसेट्स भागात जमि-

नीची धूप होऊ लागली. ती पाहून तिथल्या शासकांना झाडतोडीवर निर्बंध घालावे लागले. जंगल संपत्तीचा वाढता संहार थोपवायला हवा हा विचार जाणकारांत अधिकाधिक रुजू लागला. त्यांच्यापैकी वेरमाँटचा कायदेपंडित जॉर्ज पर्किन्स मार्श यानं तर १८६४ साली ' मनुष्य आणि निसर्ग ' नावानं पुस्तक लिहून जंगलसंहाराविरुद्ध जोरदार आवाज उठवला, तो स्वत:ला ' वनपुत्र ' म्हणवून घेई. त्याचं हे पुस्तक म्हणजे, आपल्या आयुष्यात त्यानं जो वृक्षसहार पाहिला त्यावरची त्याची इशारेवजा प्रतिक्रिया होती.

मार्शच्या पाठोपाठ अशाच जाणकारांच्या एका गटानं वृक्षसंहार, थांबवून नवीन झाडांची लागवड करण्यासाठी आणि जंगलाचं संरक्षण करण्यासाठी जरूर तो कायदा करण्यात यावा, असं आवाहन अमेरिकी काँग्रेसला एका अर्जाद्वारे केलं. मग १८७५ साली वृक्षसंपत्तीचा विकास करण्याच्या उद्दिष्टानं अमेरिकेत एक संघटना स्थापन झाली, पुढं १८७६ साली शेतकी खात्यात वनरक्षक अधिकारी नेमायला काँग्रेसनं मंजुरी दिली, नंतर पाचेक वर्षांत तर त्या खात्यात वनविषयक विभाग स्थापन करण्यात आला. शेतकी महाविद्यालयांतूनही वन-विषयक अभ्यासक्रम सुरू झाले.

यानंतर राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांनी वन संपत्तीचं संवर्धन करण्याच्या कामाला अग्रक्रम देऊन त्या दृष्टीनं वेगानं हालचाली सुरू केल्या. वनरक्षणाच्या शास्त्राच्या नव्या युगाची नांदीच रुझवेल्ट यांनी सुरू केली, म्हटलं जातं. रुझवेल्ट आणि त्यांनी नेमलेले प्रमुख वनमंडळ अधिकारी गिफोर्ड पिन यांनी वृक्षसंहाराचं सत्र तर थोपवलं शिवाय नवीन वृक्षांची लागवड करून संगोपन व जोपासना यांना चालना दिली. जंगलसंपत्तीसाठी रुझवेल्ट यांनी तब्बल कोटी २० लक्ष एकर सार्वजनिक जमीन मुवलक केली. राष्ट्राला त्यांनी दिलेली ही कायम स्वरूपाची देणगी मानली जाते.

पुढं १९१६ साली ' नॅशनल पार्क सर्व्हिस ' मडळाची स्थापना करण्यात आली. त्याने १९३३ साली आर्थिक मंदीचं संकट अनुभवलं.

# अमेरिकेतील वनसंपत्ती

मनुष्यप्राणी हा निसर्गातल्या इतर प्राण्यांसारखाच निसर्गाचा एक अंश आहे, याची नीट जाणीव आपल्याकडे क्वचितच एखाद्या माणसाला असेल ! ही जाणीव नसल्यामुळेच माणूस निसर्गाशी फटकून वागताना दिसतो. परिणामी माणूस दिवसेंदिवस निसर्गाशी आपली अधिकाधिक फारकत करून घेत चाललेला आहे.

**अमेरिकेतील परिस्थिती**

आपल्या देशाच्या उलट अमेरिकेत किती आस्थेनं वनसंगोपन व संवर्धन केलं जातं याची प्रचीती, नुकत्याच केलेल्या अमेरिकेच्या धावत्या फेरफटक्यानंतर झाली. खरं तर अठराव्या शतकापर्यंत तिकडेही सर्रास झाडतोड होत होती. इंग्रजादि युरोपीय लोकांनी तिथं जाऊन प्रथम वसाहती केल्या. तेव्हापासून झाडतोडीला ऊत आला होता. पण या झाडतोडीचा धोका दाखवून इशारा देणारे वनश्रीचा आदर करणारे जाणकार तिकडे अधूनमधून उपजले. १६८१ साली विल्यम पेन यानं दूरदृष्टी बाळगून आपल्या भू-खरेदीच्या करारात असं नमूद केलं होतं की पेन्सिल्व्हानिया आणि न्यूइंग्टन शहरात प्रत्येक सहा एकरांच्या क्षेत्रात किमान एका एकरातील झाड-झाडोरा कटाक्षानं राहू द्यावा. न्यूहॅम्पशायरमधे तर १७१० साली सामाजिक मालकीचं जंगल स्थापन केलेलं होतं. अर्थात त्या काळात हे अपवादच होते. बहुतेक ठिकाणी झाडांची लांडगेतोडच चालायची.

अठराव्या शतकात जंगलाच्या बेसुमार विध्वंसाचे अनिष्ट परिणाम स्पष्ट दिसू लागले. झाडतोड झालेल्या मॅसाचुसेट्स भागात जमि-

नीची धूप होऊ लागली. ती पाहून तिथल्या शासकांना झाडतोडीवर निबंध घालावे लागले. जंगल संपत्तीचा वाढता संहार थोपवायला हवा हा विचार जाणकारांत अधिकाधिक रुजू लागला. त्यांच्यापैकी वेरमाँटचा कायदेपंडित जॉर्ज पर्किन्स मार्श यानं तर १८६४ साली ' मनुष्य आणि निसर्ग ' नावानं पुस्तक लिहून जंगलसंहाराविरुद्ध जोरदार आवाज उठवला, तो स्वतःला ' वनपुत्र ' म्हणवून घेई. त्याचं हे पुस्तक म्हणजे, आपल्या आयुष्यात त्यान जो वृक्षसहार पाहिला त्यावरची त्याची इशारेवजा प्रतिक्रिया होती.

मार्शच्या पाठोपाठ अशाच जाणकारांच्या एका गटानं वृक्षसंहार, थांबवून नवीन झाडांची लागवड करण्यासाठी आणि जंगलाचं संरक्षण करण्यासाठी जरूर तो कायदा करण्यात यावा, असं आवाहन अमेरिकी काँग्रेसला एका अर्जाद्वारे केलं. मग १८७५ साली वृक्षसंपत्तीचा विकास करण्याच्या उद्दिष्टानं अमेरिकेत एक संघटना स्थापन झाली, पुढं १८७६ साली शेतकी खात्यात वनरक्षक अधिकारी नेमायला काँग्रेसनं मंजुरी दिली, नंतर पाचेक वर्षांत तर त्या खात्यात वनविषयक विभाग स्थापन करण्यात आला. शेतकी महाविद्यालयांतूनही वन-विषयक अभ्यासक्रम सुरू झाले.

यानंतर राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांनी वन संपत्तीचं संवर्धन करण्याच्या कामाला अग्रक्रम देऊन त्या दृष्टीनं वेगानं हालचाली सुरू केल्या. वनरक्षणाच्या शास्त्राच्या नव्या युगाची नांदीच रुझवेल्ट यांनी सुरू केली, म्हटलं जातं. रुझवेल्ट आणि त्यांनी नेमलेले प्रमुख वनमंडळ अधिकारी गिफोर्ड पिन यांनी वृक्षसंहाराचं सत्र तर थोपवलं शिवाय नवीन वृक्षांची लागवड करून संगोपन व जोपासना यांना चालना दिली. जंगलसंपत्तीसाठी रुझवेल्ट यांनी तब्बल कोटी २० लक्ष एकर सार्वजनिक जमीन मुबलक केली. राष्ट्राला त्यांनी दिलेली ही कायम स्वरूपाची देणगी मानली जाते.

पुढं १९१६ साली ' नॅशनल पार्क सर्व्हिस ' मडळाची स्थापना करण्यात आली. त्याने १९३३ साली आर्थिक मंदीचं संकट अनुभवलं.

त्यानं वनरक्षणाच्या व संवर्धनाच्या पद्धतशीर कार्याला अतिवेगानं पुष्टी दिली. सहस्रावधी बेकार तरुणांना मंदीच्या काळात काम मिळत नव्हत. त्यांना रोजगार पुरवण्यासाठी काँग्रेसनं सिव्हिलियन कॉर्पोरेशन कोअर निर्माण केलं. या संघटनेच्या रक्षणाचं प्रशिक्षण देणाऱ्या छावण्यांत लक्ष माणसं सामील झाली.

## खाजगी वनभूमी

अशा प्रकारं वनरक्षणाची तजवीज केली व राज्य शासनाखालील अरण्यभूमीत सुधारणा झाल्या तरी खासगी मालकीच्या असलेल्या छोटचा वनभागांची समस्या सुटली नव्हती. खासगी क्षेत्राखालची ही अरण्यभूमी थोडीथोडकी नव्हती. (१९७० साली अमेरिकेतल्या अरण्यभूमीच्या निम्म्याहून अधिक एकर क्षेत्र खासगी मालकीखाली होते.) तरी खासगी वनक्षेत्रात सुधारणा घडवून आणून त्याची व्यवस्था नीट व्हावी यासाठी १९५० सालापासून खास लक्ष देण्यात येऊ लागलं. वनसंवर्धनाचा कार्यक्रम आखण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की १९६९ साली तब्बल ८० कोटी झाडांची लागवड करण्यात आली. या क्षेत्रात विशेषकरून इमारती लाकूड पुरवणाऱ्या झाडांची लागवड केलेली आहे. इमारती लाकडाचा व्यापार करणाऱ्या काही कंपन्यांनीही या लागवडीला सक्रिय साहाय्य केलेलं आहे.

मुख्यत: १९३० सालापासून वनसंवर्धनाला वाढती चालना मिळत गेली. झाडांची वाढती लागवड करून त्यांचं सरक्षण करणं एवढचान आजकालच्या नवव्यवस्थापकाचं काम पुर होत नाही. प्रयोग करून लौकर वाढणारी झाडं तयार करणं आवश्यक झालं आहे. यासाठी एकेका जातीच्या झाडाचं आयुष्यमान, त्याचे गुणधर्म, त्याला लागणार पोषक वातावरण, चांगलं बियाणं कसं निवडायचं याचा अभ्यास करणं भाग झालंय. या अभ्यासांमुळं संकरित बियाणं वापरून कमी काळात जोरानं वृक्षवाढ करता येऊ लागलीय. झाडं पुरेशा अंतरावर लावणं अगत्याचं असतं हे त्यामुळं लक्षात आलं. काही वेळा मोठ्या क्षेत्रात

बियाणं विमानातूनही पेरण्यात येतं. इतर झाडांना उपद्रव देणारी व प्रयत्न करूनही पुरेशी न वाढणारी झाडं आधी तोडली जातात.

एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी वा प्रसंगाशीही एखाद्या वृक्षाची सांगड घातली जाते. त्या व्यक्तीच्या वा घटनेच्या नावानं ते वृक्ष ओळखले जातात. अमेरिकेत असे प्रकार अनेक आढळतात. क्रांतीच्या पूर्वी व क्रांतिकाळात अमेरिकेतल्या जवळजवळ प्रत्येक वसाहतीत एकेक 'स्वातंत्र्य वृक्ष' गणला गेलेला होता. क्रांतीनंतर ग्रामीण भागात अनेक वृक्ष, पहिला राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन याच्याशी संबंधित असल्याचं मानलं गेलं. यांपैकी 'एल्म' या जातीचा केंब्रिज इथला एक वृक्ष 'वॉशिंग्टन एल्म' म्हणून विख्यात होता. १७७५ साली या वृक्षाखाली त्यानं क्रांतिकारी सेनेचं आधिपत्य वारंवार स्वीकारलं होतं, त्या घटनेचं हे स्मारक होय. वॉशिंग्टनच्या जीवनकाळात लावलेली असंख्य झाडं अजूनही माउंट व्हेरनॉम इथं आहेत.

वृक्षांबद्दलच्या प्रेमाचा वारसा जॉर्ज वॉशिंग्टनकडून घेणाऱ्या राष्ट्राध्यक्ष जेफर्सन यांनी अनेक जातींच्या लहान-मोठ्या अनेक झाडांचे उल्लेख आपल्या 'जर्नल्स' मधे केलेले आढळतात. त्यानं जगभरातून नाना जातींच्या वृक्षांची रोपं आयात केली होती· आणि आपल्या उद्यान विकासासंबंधीच्या 'गार्डन बुक' (उद्यान ग्रंथ) या ग्रंथात त्यांची नोंद त्यानं कटाक्षानं करून ठेवलेली आढळते.

अमेरिकेत अनेक अफाट राष्ट्रीय वनउद्यानं राखीव ठेवलेली आहेत. शिवाय वॉशिंग्टनप्रमाणेच सर्व लहान-मोठ्या शहरांत जागोजागी लहान-मोठी उद्यानं विखुरलेली आहेत. तशीच झाडंही ठिकठिकाणी असतात. बहुसंख्य विद्यापीठांची अफाट आवारंही झाडं, फुलझाडं व हिरवळीचे पट्टे (लॉन्स) यांनी निसर्गरम्य बनलेली आढळतात. मोटारींच्या रहदारीच्या राष्ट्रीय हमरस्त्यांवर आणि रेल्वे मार्गांवरही दुतर्फा तीस एक फूट उंचीपर्यंतच्या झाडांच्या रांगा बहुश: दृष्टीस पडतात. उपनगर व लहानसान गावं तर झाडं आणि गवत किंवा हिरवळ यांनी

व्यापलेली असतात. राहण्याच्या घरांच्या वसाहती असतात. तर त्या सर्व घरांलगत छोटे बगिचे व तुरळक झाडंही असतात. प्रसन्न प्रसन्न वाटतं.

अमेरिकेत मोठाल्या शहरांतील काही उंच, भव्य इमारती सोड-ल्यास लहानसान शहरांतली आणि उपनगरादी लहानमोठ्या गावांतली जवळ जवळ सर्व घरं लाकडाची बनवलेली असतात. भिंती, जमीन, छत वगैरे सर्व काही लाकडी मामला (काही घरांच्या भिंतींना बाहेरच्या बाजूनी तेवढ पातळ विटांचं आवरण चढवल जातं. लाकडाच्या सर्व प्रकारचं घरबांधणीचं साहित्य मुबलक तयार मिळतं. त्यामुळं घरंही लौकर बांधून होतात.) भिंतींना गिलावा देण्यापुरता सिमेंटचा वगैरे वापर केला जातो. बहुतेक घरांना तळघर असतं. शिवाय तळमजल्यावर आणखी एक मजला. वरचं छप्परही लाकडीच. घराघरातलं फर्निचरही बहुतेक सर्व लाकडीच असतं. (अशा प्रकारं घरं फारशी उंच नसल्यामुळं जिन्याखेरीज विजेचे पाळणे असण्याची गरजच उरत नाही.) सांगायचा मुद्दा असा की अशा प्रकारच्या लक्षावधी नवनवीन घरांसाठी प्रचंड इमारती लाकूड सतत सारखं लागत असतं. तर पद्धतशीर संवर्धन केलेल्या अरण्यांतून हे सारं लाकूड सहज, सुरळीत उपलब्ध होतं. तोडण्यायोग्य झाडं तोडलेल्या जागी नवीन झाडांची लागवड सतत चालू राहत असल्यानं लाकडाची कमतरता मुळीच पडत नाही. तशीच एकूण वनसंपत्तीला बाधाही येत नाही.

मात्र निसर्ग संपत्ती लाभली असूनही बऱ्याच अमेरिकी लोकांचं जीवन निसर्गाशी फारसं मिळतं-जुळतं असलेलं दिसत नाही. त्यांचं जीवन धावपळीचं, यांत्रिक बनल्याचा प्रत्यय येतो. मोटारीशिवाय कुणाचं पाऊल हलत नाही. बाजारी तयार खाद्य-पेयं मटकावण्यावर बहुतेकांचा भर असतो. नोकरीनिमित्त शहरात पाच दिवस धावपळ केल्यानंतर शनिवार-रविवारच्या सुट्टीच्या दिवसांत काही स्त्री-पुरुष आपल्या घरच्या बगीच्यात बागकाम करतात. पण ते बहुधा निसर्गाशी नातं जुळवण्यापेक्षा इतरांना आपल्या बगीचा चांगला दिसावा या हेतूनं.

अर्थात याला अपवाद असतात पण ते थोडे. सुट्टीच्या दिवसांत विरंगुळा म्हणून पैसेवाले काही लोक बायकोमुलांसह एखाद्या समुद्र किनाऱ्यावर किंवा निसर्गरम्य ठिकाणी जातात. पण निसर्गाचा खराखुरा आस्वाद घेण्याऐवजी, बरोबर आणलेल्या मुबलक खाद्य-पेयांनी यथेच्छ पोटपूजा करण्यातच ते मुख्यतः मग्शूल असतात. ट्रान्झिस्टरच्या गाण्याबजावण्याच्या साथीवर नाचून वगैरे करमणूक करून घेण्याकडे त्यांचा कल असतो. मौजमजा लुटण्याच्या त्यांच्या कल्पना या अशा अपुऱ्या असतात. या प्रकारांमुळं निसर्गाच्या शांत वातावरणाला बाधा मात्र येते. अमेरिकेत सुबत्ता आणि सोयी-सुविधांचा सुकाळ असल्यानं त्यांचा यथेच्छ उपभोग घेण्याकडं बहुतेकांची एकूण प्रवृत्ती असते. उपऱ्या सुधारणांच्या आहारी जाऊन वागणं अंगवळणी पडलेलं. अर्थात विचारवंत, समजदार, आणि खऱ्या अर्थाने सुशिक्षित असलेले लोक याला अपवाद आहेत. ते मात्र सुसंस्कृतपणानं, संयमानं जीवनाचा आनंद लुटतात.

* *

# गड्या आपुला गाव बरा !

जूनच्या सुरुवातीपासून ऑगस्टच्या मध्यापर्यंत म्हणजे अडीचेक महिने अमेरिकेत माझं वास्तव्य झालं होतं. तेवढ्या मुदतीत माझ्या निकटच्या नातेवाईकांनी मला तत्परतेनं अन् आस्थेनं पूर्व अमेरिकेपासून पश्चिमेकडे—मध्य अमेरिकेपर्यंतची अनेक निवडक प्रेक्षणीय स्थळं दाखवली.

न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, शिकागो या प्रमुख शहरांतून तर अनेक वेळा फेरफटका मारला पण—

—पण प्रेक्षणीय स्थळं सोडल्यास एरव्ही अमेरिकेत माझं मन रमलं नाही. उलट, तिथलं कमालीचं धावपळीचं अन् यांत्रिक जीवन पाहून मी बावरून गेलो. खरं तर इथं—आपल्याकडे मुंबईच्या एकूण धावपळीच्या जीवनाला सुद्धा मी बुजतो. आणि मुंबईच्या मानानं अमेरिकेतलं जीवन तर कितीतरी पटींनी अधिक धावपळीचं, तसंच यांत्रिक आहे. तशा त्या वातावरणात माझ्या जिवाला कुठलं चैन पडायला ?

हां . . . ! एरवी अमेरिकेत खायची-प्यायची अन् सुखसोयी-सुविधांची रेलचेल. पण अशा गोष्टींचं मला मुळीच आकर्षण नव्हतं. त्यामुळं कधी एकदा भारतात——आपल्या गावी परततो, अशी ओढ मला लागली. तसं म्हणजे विमानाच्या परतीच्या तिकिटाची मुदत चार महिन्यांची असते. म्हणजे. . .माझी मुदत अजून दीडेक महिना बाकी होती, माझी मुलगी अन् जावई, मी पुरते चार महिने राहावं, म्हणून

मला आग्रह करीत होते. पण शक्य तेवढी प्रेक्षणीय स्थळं त्यांनी नि इतर नातेवाइकांनी दाखवली होती. तेव्हा घरच्या घरी केवळ आरामात राहून, टी. व्ही. वगैरे बघत उरलेले दिवस घालवायला मन घेईना. त्यापेक्षा भारतात--आपल्या गावी परत जाऊन आपलं नेहमीचं शांत-निवांत जीवन पत्करावं, असं तीव्रतेनं वाटत होतं. कारण, अमेरिकेतल्या कमालीच्या वेगवान तशाच यांत्रिक जीवनात, पाण्याबाहेर फेकल्या गेल्यामुळं तळमळणाऱ्या मासोळीसारखी माझी गत झाली होती.

आणि म्हणून लगेच अमेरिकेतून निघायचा निर्णय मी घेतला, परतीचं तिकीट आधीच घेतलेलं असलं तरी परतीच्या विमानप्रवासाची तारीख विमानकंपनीतून निश्चित करायला हवी होती. एअर इंडियाचं तिकीट न मिळाल्यानं 'पॅनॲम' या अमेरिकी विमानकंपनीच्या विमानाचं परतीचं तिकीट घेऊनच मी अमेरिकेला आलो. तर त्या कंपनीच्या अमेरिकेतल्या कचेरीत जाऊन परतीच्या विमानप्रवासाची, त्याच आठवड्यातली तारीख निश्चित केली.

आणि अशाप्रकारे अमेरिकेतल्या माझ्या वास्तव्याला तीन महिने पुरे होण्याच्या आधीच मी अमेरिकेला राम-राम ठोकून परत निघालो. मात्र परतीच्या विमानप्रवासात थोडी गडबड झाली. 'पॅन ॲम्'च हे विमान वाटेत लंडनऐवजी जर्मनीतल्या फ्रॅंकफुर्टच्या विमानतळावर पहिल्या टप्प्याला थांबायचे तर, आमच्या त्या विमानात कुणीतरी घातपात्यांनी बॉंब ठेवला असावा, किंवा विमानात चांचे चढले असावेत अशी शंका व्यक्त करणारा संदेश मिळाला असावा ! साहजिकच, धोका न पत्करता फ्रॅंकफुर्टला विमान बदलण्याचा निर्णय विमानकंपनीनं घेतला.

त्या विमानतळावर विमान उतरताच, सर्व उतारूंना खाली उतरवण्यात आलं. कुणाच्या अंगावरच्या कपड्यांत पिस्तूल वगैरे हत्यार नाही ना -याची खात्री करून घेण्यासाठी तशा तपासणीचा इलेक्ट्रॉनिक रॉड प्रत्येक उतारूच्या अंगावरून अन् त्याच्याबरोबरच्या छोट्या बॅगेवरून फिरवून नीट तपासणी करण्यात आली. (एकूण तपासणीचा निष्कर्ष काय निघाला, किंवा धोका कसला होता, याची काहीच कल्पना

उतारूंना शेवटपर्यंत देण्यात आली नाही. उतारू घाबरतील अन् गोंधळ माजेल म्हणून ही खबरदारी घेण्यात आली असावी ! शिवाय बॉंबची वगैरे अफवाच ठरली असावी ! )

तपासणीनंतर सर्व उतारूंना काही वेळ वेटिंगहॉलमध्ये बसवून ठेवण्यात आलं. दरम्यान दुसऱ्या विमानाची व्यवस्था करण्यात आली. आणि मग सगळ्या उतारूंना त्या नवीन विमानात बसवण्यात आलं.

उतारूंना कसलीच काही कल्पना देण्यात आली नाही, तरीसुद्धा फ्रँकफुर्टला सगळ्या उतारूंची केलेली खास तपासणी, आणि विमान बदलून सुरू केलेला पुढचा प्रवास या गोष्टी उतारूंना थोडी फार कल्पना द्यायला पुरेशा होत्या. त्यामुळं, विमान बदललं तरी त्यांच्या मनात थोडीतरी धाकधूक होतीच; प्रवास संपेपर्यंत काय होतंय अन् काय नाही ? .अखेर मुंबईच्या सहार विमानतळावर विमान सुखरूप पोचलं, तेव्हा कुठं हायसं वाटल.

तरीपण विमानातल्या सामानाची काळजी वाटत होती. फ्रँकफुर्टला विमान बदलताना सर्व उतारूंचं सर्व सामान दुसऱ्या विमानात दक्षतेनं नीट भरलं गेलं की नाही– ही शंका मनात घर करून होती. म्हणून आपल्या सामानाच्या बॅगा हाती पडेपर्यंत थोडीशी धाकधूक वाटत होतीच. पण सुदैवानं सामानाच्या फिरत्या गोल पट्ट्यावर माझ्या दोन्ही बॅगा मला मिळाल्या नि माझी चिंता दूर झाली. तेव्हा मात्र मी सुटकेचा सुस्कारा सोडला. तरीपण–

–तरी पण विमानतळाबाहेर पडण्याऱ्या मार्गात अजून एक अडसर होताच. तो म्हणजे कस्टमच्या तपासणीपासून होणारी कडक तपासणी. खरं तर माझ्याकडे जकातीच्या अशा इलेक्ट्रॉनिकच्या खास वस्तू नव्हत्याच. पण आपण तशी निक्षून ग्वाही दिली तरीही तपासनीस आपल्या बॅगांतलं सर्व सामान विस्कटून पाहतात. ते विस्कटलेलं सामान मग त्या बॅगांत तिथल्या–तिथ पुन्हा नीट भरणं हे वेळखाणारं, वैतागाचं काम असतं. या कटकटीतून मी कसा निभावून जातो ही चिंता होती. आणि–

–आणि एका जकात–तपासनीसाच्या समोरच्या उतारूंच्या रांगेत मी उभा असताना, माझ्या पुढच्या माणसावर ओढवलेली संक्रान्त पाहून तर माझी चिंता आणखीनच वाढली. माझ्या पुढच्या त्या माणसानं त्या तपासनीसाला सांगितलं की आपल्याकडे जकातीचं असं कसलंच सामान नाही. पण त्याला त्याची पहिलीच बॅग उघडून दाखवायला सांगितली, तेव्हा तो म्हणाला, की त्या बॅगेची आपली चावी हरवलीय. आता कस्टमचे तपासनीस ते ! पक्के वस्ताद असतात. अशा लंगड्या सबबी-वर ते विश्वास ठेवतात थोडेच ! त्या तपासनीसाला साहजिकच शंका आली की–इथं काही तरी पाणी मुरतंय. आपली चावी हरवल्याचा बहाणा करणारे उतारू त्यांना अधून मधून भेटतच असतील की !... त्या दृष्टीनं त्या अडचणींतून मार्ग काढायला ते हत्यारांनिशी सज्जच असतात, आता...बाजूलाच ठेवलेली हत्यारं त्यानं घेतली अन् त्या बॅगेचं कुलूप चक्क फोडलं. अन् तो ती बॅग उघडून पाहू लागला.

हा अनपेक्षित प्रकार पाहून बॅगेच्या मालकाचा चेहरा कावरा-बावरा झाला. तो मुळी हबकलाच. प्राप्त प्रसगाला तोंड देणं आता त्याला भाग होतं. कारण चावी हरवल्याची त्याची सबब खोटीच होती, याच प्रत्यंतर लौकरच आलं, त्या बॅगेत कॅसेट–प्लेअर, कॅसेट रेकॉर्डर अन् ट्रॅन्झिस्टर अशा तिहींचा एकच संच असलेली (थ्री-इन्-वन्) पेटी सापडली. मग काय ? त्याच्या दोन्ही बॅगांतलं सर्व सामान त्या तपा-सनीसानं उचकटून–विस्कटून टाकायला सुरुवात केली

हा एकूण प्रकार पाहून इकडे माझी धास्ती वाढली. माझ्या बॅगांतल्या सामानात इलेक्ट्रॉनिक वस्तू नसली तरी ती, आहे की नाही ते पाहण्यासाठी बॅगांतलं सामान उचकटून टाकण्याचा धोका होता. तेवढ्यात माझ्या मनात वेगळीच कल्पना आली, मी आजूबाजूला पाहिलं तर पलीकडे समोरच त्या सगळ्या तपासनीसांवरचा प्रमुख कस्टम–अधिकारी उभा होता. त्याच्याकडे जायचं मी क्षणात ठरवलं.

माझ्याकडे, नाही म्हटल तरी, एक छोटा कॅसेट–प्लेअर होता–

आणि तो कस्टमला दाखवण्यासाठी मी माझ्या खांद्यावरच्या छोटया बॅगेतच घेऊन ठेवलेला होता. सोयीस्करपणं दाखवता यावा म्हणून. खांद्यावरच्या त्या बॅगेसह मी त्या प्रमुख अधिकाऱ्याकडे गेलो. आणि बॅगेतला कॅसेट.प्लेअर काढून दाखवीत म्हणालो—

"माझ्या स्वत:साठी घेतलेला हा कॅसेट-प्लेअर सोडला तर दुसरी कसलीही इलेक्ट्रॉनिक वस्तू माझ्या सामानात नाही, तेव्हा याची योग्य ती जकात घेऊन मला मोकळा कराल, तर बरं होईल. माझ्या बॅगांतले सामान तुम्ही खुशाल पाहा. ते उचकटून टाकू नका म्हणजे झाले. अमेरिकेतल्या साध्या भेटवस्तू या बॅगात भरलेल्या आहेत. बॅगा उघडून पाहून तुम्ही खात्री करून घ्या.

'महाराष्ट्र टाइम्स' दैनिकाचा माजी वृत्तसंपादक आहे मी !" आणि त्यांना मी माझा पासपोर्ट दाखवला.

माझ्याकडे त्यानं कुतूहलानं पाहून घेतलं, माझ्याकडे बघून अन् माझी विनंती ऐकून त्याचा माझ्याबद्दल विश्वासाचा अनुकूल ग्रह झाला असावा ! तो स्वत:च पुढे सरसावला, आणि मला त्यानं माझ्या बॅगा उघडून दाखवायला सांगितले. अर्थातच मी तत्परतेनं माझ्या बॅगा उघडून दाखवल्या. त्यांच्यातलं सामान त्यानं नजर टाकून पाहून घेतले. आणि मला बॅगा बंद करायला सांगितलं. मग तो माझ्यासमोरच्या तपासनीसाकडे वळून म्हणाला. "यांचं सामान मी तपासलंय. यांना सही करून द्या, जाऊद्या यांना."

त्या तपासनीसानं सही केल्यावर तो अधिकारी मला म्हणाला, "तुम्ही जा आता तुमच्या बॅगा घेऊन बाहेर."

कृतज्ञतेच्या भावनेनं मी त्या अधिकाऱ्याचे आभार मानले, आणि माझ्या बॅगा ढकलगाडीवर घेऊन मी बाहेर पडलो.

आता मात्र माझा प्रवासाचा शीण कुठल्या कुठं निघून गेला, आणि सुटकेचा नि:श्वास सोडीत मी बाहेर पडलो.

अमेरिकेतल्या सुखसोयी अन् ऐषआराम यांची आपल्याकडे उणीव असली तरी पाण्याबाहेर तळमळणारा मासा पुन्हा पाण्यात गेल्यावर त्याला जिवात जीव आल्याचं जे समाधान वाटतं, तसं आपल्या गावी परतल्यावर मला वाटलं. गैरसोयीची तमा वाटली नाही मला. मनोमन वाटलं–अमेरिकेतलं ते तथाकथित वैभव तिथं राहणाऱ्या लोकांना लखलाभ होवो !...शांत, समाधानी जीवनाचा लाभ देणारा इथला आपला रहिवास, ' गड्या आपुला गाव बरा ! ' असेच उद्गार काढायला लावतो.

* *

REFBK-0026292

REFBK-0026292

## आमची उपलब्ध प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| अफलातून | सुहास शिरवळकर | ४०–०० |
| थोडक्यात असं | सुहास शिरवळकर | ४५–०० |
| हेरगिरी की हाराकिरी | एम. के. ढेरे | ३०–०० |
| फरारी | देवदत्त पाटील | ५५–०० |
| अशी मने असे नमुने | शिवाजी सावत | ५०–०० |
| बळजोरी | देवदत्त पाटील | ९०–०० |
| मोहिनी | देवदत्त पाटील | ६०–०० |
| निष्णात | प्रतिभा आडगावकर | ५५–०० |

## कुमार साहित्य

| | | |
|---|---|---|
| विज्ञान विचार माला (भाग १ ते १०) | प्रा. भालबा केळकर | १२०–०० |
| गोष्टींचा खजिना (भाग १ ते १०) | पंढरीनाथ रेगे | १००–०० |
| बिलंदर बाळू (भाग १ ते ३) | पंढरीनाथ रेगे | ४८–०० |
| चौफुली कपूचा धाडसी मोहिमा (भाग १ ते ४) | लीलावती भागवत | १००–०० |
| पाच महान क्रांतिकारक (भाग १ ते ५) | नयनतारा देसाई | १००–०० |
| बालगीत | विश्वास सोहनी | १२–०० |
| साईगीत | शिवाजी सावंत | १०–०० |

सुवर्ण प्रकाशन

सुवर्ण प्रकाशन, ७९०, सदाशिव पेठ, पुणे ३०.